दै.महाराष्ट्र टाईम्स

दि.१० नोव्हेंबर,२०२५

# शाही मिरवणूक मार्गाची पाहणी

## आयुक्तालयात सिंहस्थाचा आढावा; मुख्य सचिवांचे त्र्यंबकला दर्शन

मटा वेध सिंहस्थाचे

म. टा. वृत्तसेवा,
त्र्यंबकेश्वर/नाशिकरोड

[illegible]

### 'व्हीआयपी'च्या वाहनामुळे भाविक वेठीस

[illegible]



[illegible]

# सापत्न वागणूक, वारंवार अपमान

## वसतिगृहातील विद्यार्थिनींचा पायी मोर्चा

म. टा. वृत्तसेवा, सटाणा

सटाणा येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहातील गृहपालकडून विद्यार्थिनींना सापत्न वागणूक मिळत आहे. त्याचबरोबर वारंवार अपमान व मानसिक त्रास दिला जात आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या ५० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी रविवारी (दि. ९) कळवण येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयाकडे पायी मोर्चा काढला.

सदर प्रकरणाची माहिती आमदार दिलीप बोरसे यांना मिळताच त्यांनी तत्काळ पुढाकार घेत मोर्चातील मुलींना सटाण्यातील नाशिक नाका येथे थांबवून नगर परिषद सभागृहात विश्रांतीची व्यवस्था केली. त्यावेळी आमदार बोरसे यांनी कळवण आदिवासी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधत संबंधित अधिकाऱ्यांना सटाणा येथे पाचारण केले. अधिकाऱ्यांशी चर्चा झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून पुढील तीन दिवसांत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर आमदार बोरसे यांच्या मध्यस्थीने विद्यार्थिनींनी मोर्चा मागे घेतला.

### यापूर्वीही तक्रारी, उपयोग शून्य

विद्यार्थिनींनी यापूर्वीही तोंडी आणि लेखी तक्रार कळवण प्रकल्प कार्यालयात दिली होती. मात्र, कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे अखेर त्यांनी रविवारचा दिवस पाहून पायी मोर्चा काढण्याचा निर्णय केला. आमदार दिलीप बोरसे यांच्या तत्काळ हस्तक्षेपामुळे वसतिगृहातील मुलींचा मोर्चा शांततेत माघारी घेण्यात आला असला, तरी शासकीय वसतिगृहातील परिस्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे चौकशी व कार्यवाही वेळेत न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा विद्यार्थिनींनी दिला आहे.



वसतिगृहातील गृहपालकडून सतत अपमानास्पद वागणूक दिली जाते. गृहपाल आपल्या कुटुंबीयांमध्ये रमणार असल्याने आमच्याकडे दुर्लक्ष केले जाते असा आरोप करीत विद्यार्थिनींनी पूर्वी कार्यरत असलेल्या गृहपाल पवार यांचीच पुन्हा नियुक्ती करण्याची मागणी केली. मोर्चात कुजन घेडे, जानवी कोल्हे, रीना ठाकरे, आशा चौरे आदींसह ५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

# बेशिस्तांची भरणार 'शाळा'

## नियमभंग केल्यास वाहतूक पोलिस शिकविणार 'धडे'

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



शहरात खिळखिळी झालेली वाहतूक व्यवस्था वठणीवर आणण्यासाठी रिक्षाचालकांवर धडक कारवाई केल्यानंतर आता पोलिसांनी सर्व प्रकारच्या वाहनचालकांच्या दिशेने मोर्चा वळविला आहे. तत्कालीन पोलिस आयुक्तांनी बेशिस्तांकडून निबंध लेखनासह परीक्षा घेत शिस्त लावण्याच्या राबविलेल्या 'पॅटर्न'ची राज्यात चर्चा झाल्यानंतर आता पुन्हा 'बेशिस्तांची शाळा' भरणार आहे.

वाहतुकीच्या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांना ट्रॅफिक एज्युकेशन पार्कमध्ये सक्तीने दोन तासांचे प्रशिक्षण देण्याच्या निर्णयाची आता अंमलबजावणी होणार आहे. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये वाहतूक पोलिस उपायुक्त किरिथिका सी. एन. आणि सहाय्यक आयुक्त अदिता शिंदे यांची पथके शहरात बेशिस्त वाहनचालकांसह रिक्षाचालक व मालकांवर दंडात्मक कारवाईसह भारतीय न्याय संहितेनुसार (बीएनएस) गुन्हे नोंदवत आहेत. 'मटा'ने द्वारका, नाशिकरोडसह इतर ठिकाणच्या वाहतूक समस्यांबाबत वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर त्या ठिकाणीदेखील तातडीने धडक कारवाई करून शिस्त लावण्यात आली. त्यामुळे शहरात 'सिटी लिंक' वगळता इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बऱ्यापैकी शिस्त लागल्याचा प्रत्यय येत आहे. दरम्यान, आता पुढील टप्प्यात सर्व प्रकारच्या बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई होणार आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला पुन्हा शिस्त लावण्याचा हा 'प्रयोग' कितपत यशस्वी होणार याकडे सुजाण नाशिककरांचे लक्ष लागले आहे.



"बेशिस्तांना केवळ दंड करण्याऐवजी वाहतूक नियमांचे पालन करण्याची शिस्त लावण्याचा उद्देश आहे. बेशिस्तांना एकत्रित करून दोन तासांचे प्रशिक्षण देणार आहोत. आरटीओ, वाहतूक पोलिसांची एकत्रित कारवाईदेखील नियोजित आहे.

– अदिता शिंदे,
सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक

### ..यांच्यावर होणार कारवाई

सिग्नल तोडणारे, झेब्रा क्रॉसिंगवर वाहने उभे करणारे, विरुद्ध दिशेने वाहने चालविणारे, सीटबेल्ट न लावणारे, हेल्मेट परिधान न करणारे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणारे, ट्रिपलसीट वाहतूक, काळ्या काचा असलेली वाहने, फॅन्सी नंबरप्लेट असलेली वाहने, विना नंबरप्लेट वाहने, कालबाह्य मुदतीचे वाहन चालविणारे, वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे, वाहन चालविण्याचे परवाने सोबत न बाळगणारे, वाहनाचे 'आरसी बुक' नसलेले, अतिरिक्त प्रवासी वाहतूक करणारे, गणवेश परिधान न करणारे रिक्षाचालक व मालक, बेशिस्तरीत्या रिक्षा चालविणारे व इतर नियमभंग करणाऱ्या सर्व वाहनचालकांवर कारवाई होईल.

- बेशिस्त रिक्षाचालक व मालकांवर बीएनएस कलम २८५ अन्वये १०३ गुन्हे
- मोटार वाहन कायद्यानुसार ५०३ गुन्हे
- २० ऑक्टोबर ते आतापर्यंत ८९९ रिक्षांवर कारवाई, ३५ रिक्षा 'स्क्रॅप'
- दोन हजार ४१५ वाहनांवर कारवाई; १८ लाख ७४ हजार ८५० रुपये दंड वसूल
- पोलिस व्हॉट्सअॅप हेल्पलाइन : ९९२३३२३३११ (येथे बेशिस्त वाहनांबाबत मेसेजद्वारे कळविता येईल.)

### तत्कालीन आयुक्तांचे शिस्तीचे 'प्रयोग' आणि सद्यस्थिती

- **डॉ. रवींद्रकुमार सिंगल**
- (२८ ऑगस्ट २०१६ ते मार्च २०१९)
- दोस्त ऑफ नाशिक (डॉन) संकल्पना : बंद
- हेल्मेट, सीटबेल्ट न वापरणाऱ्यांकडून निबंध लेखन : बंद
- 'नो हॉकिंग' राज्यभरात लागू : बंद

- **विश्वास नांगरे-पाटील** (२ मार्च २०१९ ते सप्टेंबर २०२०)
- पोलिस ठाण्यांकडेही वाहतूक सुरक्षेची जबाबदारी : बंद

- **दीपक पांडे**
- (४ सप्टेंबर २०२० ते २१ एप्रिल २०२२)
- नो हेल्मेट, नो पेट्रोल', 'नो हेल्मेट, नो एन्ट्री'चे आदेश : न्यायप्रविष्ट बाब
- हेल्मेट, सीटबेल्ट न वापरणाऱ्यांची लेखी परीक्षा : बंद
- वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे २ तास प्रबोधन : बंद

- **जयंत नाईकनवरे** (२१ एप्रिल ते १४ डिसेंबर २०२२)
- 'ट्रॅफिक माइल'चा प्रस्ताव : रखडला
- महामार्गावर सतत वाहतूक पोलिसांची गस्त : क्वचितच
- महामार्गावर अवजड वाहने केवळ डाव्या बाजूने जातील : बंद

- **अंकुश शिंदे** (१४ डिसेंबर २०२२ ते २३ नोव्हेंबर २०२३)
- दुचाकी सायलेन्सर कारवाई : क्वचितच
- ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती : रखडली.

# 'मिनी मंत्रालय' स्थलांतराचं ठरेना

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

जिल्हा परिषदेची शहरातील त्र्यंबकरोडवरील बहुचर्चित इमारत पूर्णत्वास येऊनसुद्धा लोकार्पण सोहळ्यासाठी मुख्यमंत्र्यांची तारीखनिश्चिती, आचारसंहितेचा तांत्रिक अडसर आदी कारणांमुळे जिल्ह्याच्या या 'मिनी मंत्रालया'चे नूतन वास्तूतील स्थलांतर रखडले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या नवीन वास्तूचे लोकार्पण करण्याचे प्रशासनाचे नियोजन होते. मात्र, आता नगरपंचायती आणि नगरपरिषदांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लोकार्पणाची शक्यता पडताळून बघितली जात असल्याने हे स्थलांतर आणखी रखडण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, नूतन वास्तूत स्थलांतराबाबत सर्व विभागांना प्रशासनाच्या सूचना गेलेल्या आहेत. काही विभागांनी तशी तयारीही केली आहे. जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीमधील कागदपत्रे, फायली आणि इतर साहित्य टप्प्याटप्प्याने नवीन इमारतीत हलविण्याच्या सूचना विभागांना देण्यात आल्या आहेत. मात्र, यासंदर्भातील तांत्रिक बाबींचा अभ्यास करून शासन स्तरावरूनच योग्य निर्णय होणार आहे. जुनी इमारत सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणास भाडेतत्त्वावर देण्याबाबत नियोजन आहे.



## नूतन इमारतीची वैशिष्ट्ये

- त्र्यंबकरोडवरील एबीबी सर्कलनजीक सहामजली नूतन वास्तू
- जिल्हा नियोजन समितीच्या निधीद्वारे सौरऊर्जा प्रणाली बसविणार
- सुमारे ३५० किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रणालीचे नियोजन
- विविध अद्ययावत सेवा-सुविधांची नूतन वास्तूत उपलब्धता

**सामाजिक न्याय विभागाकडून १३ कोटींचा निधी मंजूर**

# वामनदादांच्या दुर्लक्षित स्मारकाचे भाग्य उजळणार

म. टा. वृत्तसेवा, सिन्नर

'सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा, कुठं हाय हो, सांगा धनाचा साठा न् आमचा वाटा कुठं हाय हो', असे सवाल आपल्या गीतांमधून मांडणारे लोककवी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी वामनदादा कर्डक यांच्या जन्मगावी देशवंडी (ता. सिन्नर) येथे भव्यदिव्य स्मारक उभारले जाणार आहे. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून या स्मारकासाठी १३ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



देशवंडी येथील लोककवी वामनदादा कर्डक यांच्या स्मारकाची कमान.

## ...असे होणार स्मारक, संग्रहालय

देशवंडी गावात वामनदादा कर्डक यांच्या नावाने ५६ गुंठे जमिनीचा ७/१२ उतारा आहे. त्याच लागून ग्रामपंचायतीचे २१ हेक्टर क्षेत्र आहे. या जागेवर वामनदादांचे स्मारक व्हावे यासाठी ग्रामपंचायतीने एकमुखाने ठराव दिला आहे. या निधीतून स्व. वामनदादा कर्डक यांचे भव्यदिव्य स्मारक उभारले जाणार आहे. [illegible], त्यांचा जीवनपट उलगडणारे अत्याधुनिक संग्रहालय, त्यांच्या साहित्य संपदेची लायब्ररी, [illegible] केले जाणार आहे. [illegible] टाकण्यात येणार आहे. आतील भागात [illegible] करून साजेशा भिंती उभारली जाणार आहे.

राज्याचे क्रीडा व युवक कल्याणमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या प्रयत्नातून व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत वामनदादा कर्डक यांच्या स्मारकासाठी हा निधी मंजूर केला आहे. देशवंडी येथील लोककवी वामनदादा कर्डक यांच्या स्मारकाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, त्यांचे भव्यदिव्य स्मारक व्हावे, अशी तालुक्यातील जनतेची अपेक्षा होती. मंत्री कोकाटे यांनी यासंदर्भात संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यासंदर्भात त्यांनी समाजकल्याण आयुक्त, पुणे तसेच मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला.

### ...असा मिळणार तीन वर्षांत निधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत देशवंडी येथे लोककवी वामनदादा कर्डक यांचे स्मारक बांधण्याच्या प्रस्तावाच्या रकमेस १३.६० कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. चालू वर्षी (२०२५-२६) ४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२६-२७ ला चार कोटी व सन २०२७-२८ या आर्थिक वर्षात ५.६० कोटी निधी वितरित केला जाणार आहे.

### आंबेडकरी चळवळ घराघरात...

तालुक्यातील देशवंडी येथे १५ ऑगस्ट १९२२ रोजी लोककवी वामनदादा कर्डक यांचा जन्म झाला. ते मराठी शाहीर, कवी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते होते. त्यांच्या हयातीत त्यांचे चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले होते. त्यांनी डॉ. आंबेडकरांवर १० हजारांहून अधिक गीते रचली आहेत. लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लेखणीतून महाराष्ट्राच्या घराघरात, [illegible] मोठ्या निष्ठेने केले. गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार हा वामनदादांचा श्वास होता, तेच त्यांचे ऊर्जास्रोत होते.

**निकषांत बसत नसल्याचे कारण**

# भरपाईपासून वनपट्टेधारक वंचित

**म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक**

जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांची हानी झालेल्या आदिवासी भागातील वनपट्टेधारक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे यंत्रणेने केलेले नाहीत. परिणामी, नुकसानग्रस्तांना मदतीपासून वंचित राहावे लागणार आहे. याबाबत दिंडोरी तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. जिल्ह्यातील सात तालुके अदिवासी बहुल असून, या तालुक्यांमध्ये पावसाचे प्रमाण आणि नुकसानीची तीव्रताही अधिक होती. सप्टेंबरमधील नुकसानीच्या धक्क्यातून सावरत नाही तोच ऑक्टोबरमध्ये देखील अवकाळीने पुन्हा तडाखा दिला. परिणामी, शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. जिल्ह्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ३१७ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. महसूल यंत्रणेमार्फत सप्टेंबरमधील नुकसानभरपाईचे अनुदान बाधितांच्या बँक खात्यामध्ये वर्ग करतानाच यंत्रणाकडून ऑक्टोबरमधील अवकाळीचे पंचनामे सुरू करण्यात आले. परंतु, हे पंचनामे करताना वनपट्टेधारकांना त्यातून वगळण्यात आल्याने ओरड सुरू झाली आहे.

जिल्ह्यात वनपट्ट्यांचे ३३ हजार २०३ दावे मंजूर आहेत. त्यापैकी लाभार्थींना २१ हजार ५७४ हेक्टर क्षेत्राचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी बहुतांश लाभार्थींचे उदरनिर्वाहाचे साधन शेतीच आहे. अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे वनपट्टेधारक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अन्य शेतकऱ्यांप्रमाणेच या वनपट्टेधारक बाधित शेतकऱ्यांना देखील सरकारकडून मदतीची अपेक्षा होती. परंतु, अशा क्षेत्राचे पंचनामे करायचे नाहीत असे सरकारी निकष असल्याने या वनपट्टेधारकांना मदतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

### जिल्ह्यातील स्थिती

| | |
|---|---|
| एकूण प्राप्त दावे | ५९,५६० |
| पात्र दावे | ३३,२०३ |
| अपात्र दावे | २४,६९२ |
| प्रलंबित दावे | १,६६५ |
| सातबारा नोंदणी झालेले दावे | ३३,११४ |
| सातबाऱ्यावर नोंद बाकी दावे | ८९ |
| मंजूर क्षेत्र | २१,५७४ हे. |

# १९ हजार तपासी अंमलदार

## सात वर्षे सेवापूर्ण पदवीधरांचे प्रशिक्षण सुरू; राज्यातील पाच केंद्रांत नियोजन

मटा विशेष

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

राज्य पोलिस दलातील तपासी अंमलदारांच्या कमतरतेमुळे गुन्ह्यांच्या तपासांवर दोषसिद्धीवर परिणाम होत असल्याने सात वर्षे पूर्ण झालेल्या पदवीधर पोलिसांना प्रशिक्षित करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. त्यासाठी शहर, ग्रामीण व लोहमार्ग पोलिस दलातील सर्व घटकांतील १९ हजार ३८२ पात्र अंमलदारांपैकी १ हजार ६७५ अंमलदारांचे राज्यातील पाच केंद्रांत प्रशिक्षण सुरू आहे. महिनाभराच्या निवासी प्रशिक्षणानंतर पोलिसांना नियमांच्या प्रमाणपत्रानुसार हवालदारांप्रमाणे शिपायांनाही तपासाचे अधिकार प्राप्त होणार आहेत.

राज्य पोलिस दलाच्या प्रशिक्षण व खास पथके विभागाचे अपर पोलिस महासंचालक प्रवीणकुमार पडवळ यांच्या आदेशान्वये अकोला, धुळे, सांगली जिल्ह्यातील तुरची, दौंड येथील नानवीज आणि नाशिक येथील गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयात (डीटीएस) पदवीधर अंमलदारांचे प्रशिक्षण सुरू आहे. या प्रशिक्षण वर्गाचा प्रवीणकुमार पडवळ यांनी नुकताच नाशिकमध्ये आढावा घेतला. बदलत्या गुन्हेगारीचे स्वरूप, आधुनिक तपास पद्धत, सायबर गुन्हे, तांत्रिक पुरावे संकलन, कायदेशीर बाबींचे पुरेसे ज्ञान यासंदर्भात अधिकारी व प्रशिक्षणार्थी अंमलदारांशी त्यांनी संवाद साधला. दरम्यान, राज्य पोलिस दलातील नाईक पद रद्द झाल्याने शिपायांना थेट हवालदार पदावर बढती मिळणार आहे. त्यातच हवालदारांसह अधिकाऱ्यांकडे अनेक गुन्हे तपासाधीन असल्याने ढकल व दोषसिद्धीवर परिणाम जाणवत आहे. त्यामुळे सात वर्षे पूर्ण व पदवीधर शिपायांना प्रशिक्षित केल्यानंतर पुढील काही महिन्यांत सध्या सर्व घटकांत कार्यरत एकोणावीस हजार नवे 'तपासी अंमलदार' नव्याने प्राप्त होतील.

### ...अन्यथा, दंड वसुली

प्रशिक्षणात अपात्र ठरणाऱ्या अंमलदारांना तपासाचे अधिकार देण्यात येणार नसल्याचेही पोलिस विभागाने स्पष्ट केले आहे. मात्र, एखादा अंमलदार परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याच्या सेवापुस्तिकेत त्यासंदर्भात नोंद होईल. शिवाय त्याच्यावर प्रशिक्षणादरम्यान झालेला सुमारे तीस हजार रुपयांचा खर्च शासन दंड स्वरूपात वसूल करेल. पालक पुढील टप्प्यात त्याला पुन्हा प्रशिक्षणात उपस्थित राहावे लागू शकते. त्यामुळे प्रशिक्षणात पोषक अभ्यास करून तपासी अंमलदार होणे, हा एकमेव पर्याय असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

> “प्रशिक्षणानंतर परीक्षा उत्तीर्णांना त्वरित प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये संबंधित अंमलदारांकडे गुन्ह्यांचे तपास सोपविण्यात येतील.
>
> – चंद्रकांत गवळी, पोलिस अधीक्षक तथा प्राचार्य, डीटीएस



| तपासी अधिकारी | निकषांनुसार गुन्ह्यांचे स्वरूप |
|---|---|
| सहाय्यक पोलिस आयुक्त | ॲट्रॉसिटी व वरिष्ठांच्या आदेशान्वये गंभीर गुन्हे |
| पोलिस निरीक्षक | खून, दरोड्यासह सर्व गुन्हे |
| सहाय्यक व पोलिस उपनिरीक्षक | खंडणी, खुनाचा प्रयत्न, पोक्सो, बलात्कार, फसवणुकीसह सर्व गुन्हे |
| सहाय्यक उपनिरीक्षक व हवालदार | घरफोडी, चोरी, जबरी चोरी, अकस्मात मृत्यूसह कमी शिक्षेचे गुन्हे |

| महत्त्वाचे घटक | प्रशिक्षणास पात्र अंमलदार |
|---|---|
| मुंबई शहर | ५,५७४ |
| ठाणे शहर | २,१७५ |
| पुणे शहर | ९७५ |
| सोलापूर शहर | ४८९ |
| नाशिक शहर | ४७५ |
| पिंपरी चिंचवड | ४०९ |
| नागपूर शहर | ११५ |
| मीरा - भाईंदर - वसई - विरार | ८७ |

# ‘पोलिसपुत्र’ नशेच्या तस्करीत

## ३२ ग्रॅम 'एमडी' जप्त; तिघांना अटक, हॉटेल मालकावरही गुन्हा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

फार्मासिस्ट, मार्केटिंग करणाऱ्या दोघांना मॅफेड्रॉन (एमडी) तस्करीत चार दिवसांपूर्वी पोलिसांनी अटक केल्यानंतर आता पोलिसपुत्रासह तीन बेरोजगारांना एका हॉटेलात 'एमडी'ची विक्री करण्याच्या प्रयत्नात बेड्या ठोकल्या आहेत. अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना खोली उपलब्ध करून दिल्याने संबंधित हॉटेल मालकावरही गुन्हा दाखल केला आहे. संशयितांकडून ३२ ग्रॅम 'एमडी'सह २ लाख २३ हजार ३८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नाशिक पोलिसांनी शोएब मुराद खान (वय ३९, रा. वडाळा), शेख मुस्तफा अफजल (१९, रा.




खोडेनगर), मोफिज मुज्जमिल खान (१९, रा. वडाळा चौक) या संशयितांना अटक केली आहे. तिघांकडून १ लाख ६० हजारांचे ३२ ग्रॅम एमडी आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, नाशिक-पुणे रस्त्यावरील हॉटेल नाशिक इन येथे 'एमडी' तस्कर लपल्याची गोपनीय माहिती पोलिस आयुक्तालयास प्राप्त झाली. गुन्हे विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांच्यासह अमली पदार्थ विरोधी पथक, नाशिकरोड आणि उपनगर पोलिस ठाण्याच्या पथकांनी संयुक्तरित्या हॉटेलात धाड टाकली. त्यावेळी खोली क्रमांक ३०५ मध्ये तिघे संशयित 'एमडी' बाळगताना आढळून आले. त्यांच्याकडून कसून चौकशी केली असता शोएबचे वडील ग्रामीण पोलिस दलातून सेवानिवृत्त झाल्याचे पथकाला समजले. तर, उर्वरित दोघांपैकी एकजण टपरीचालक असून, दुसरा कारच्या शोरूममध्ये कार्यरत होता. सध्या तिघेही बेरोजगार असून, नशेच्या आहारी गेल्याने त्यांनी ठाणे जिल्ह्यातील डोंगरी येथून 'एमडी' खरेदी करून स्वतःच्या नशेसह विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली. तिघांनाही ताब्यात घेऊन उपनगर पोलिसांच्या ताब्यात देत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



### हॉटेलमालकावरही गुन्हा

ड्रग्ज तस्करांना हॉटेलात जागा उपलब्ध करून दिल्याने हॉटेलमालक संशयित कपिल देशमुख यालाही सहसंशयित करण्यात आले आहे. त्याचाही गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याचा ठपका ठेवत त्याच्याविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यापूर्वीदेखील द्वारका परिसरातील एका हॉटेलात महिलेसह सराईत गुन्हेगाराला एमडी तस्करीच्या गुन्ह्यात अटक झाली होती. शहरातील बऱ्याच हॉटेलांमध्ये अवैधरित्या नशेखोरी होत असल्याचे त्यातून उघड होत असून, हॉटेलांची धडक तपासणी मोहीम राबविण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# नांदुरमध्यमेश्वर अभयारण्यात १२ हजार पाणपक्षी

**थंडीचा सांगावा; साडेबारा हजार गवतात पक्षी**

म. टा. वृत्तसेवा, निफाड

### पक्ष्यांची संख्या वाढणार...



### ...हे पक्षी आढळले



# शिधापत्रिका वितरणास 'ब्रेक'

## 'सर्व्हर डाउन'ने दोन हजारांवर अर्ज प्रलंबित

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

नवीन शिधापत्रिका (रेशनकार्ड) मिळावी किंवा आहे त्या शिधापत्रिकेत काही दुरुस्त्या करून मिळाव्यात यासाठी नागरिकांनी अर्ज केले असले, तरी ते महिनोनमहिने प्रलंबित राहत आहेत. त्यामुळे शिधापत्रिका वितरणास 'ब्रेक' लागल्याची स्थिती आहे.

'आरसीएमएस' प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे अर्ज निकाली काढण्यास विलंब होत असून, शिधापत्रिकेअभावी नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ मिळण्यातदेखील अडचणी येत आहेत. जिल्हा पुरवठा विभागाकडे शिधापत्रिकांशी संबंधित दोन हजार २६९ अर्ज प्रलंबित असून, त्यापैकी ३० टक्के अर्ज नाशिक शहर आणि तालुक्यातील आहेत. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत केंद्र सरकारद्वारे गरीब गरजू कुटुंबांना गेल्या कित्येक वर्षांपासून स्वस्त धान्य पुरविण्यात येत आहे. परंतु, त्याकरिता पात्र कुटुंबाकडे पिवळे किंवा केशरी रंगाचे रेशनकार्ड असणे अनिवार्य आहे. कोविड काळात अशा लाखो लाभार्थी कुटुंबांना सरकारने मोफत धान्य पुरविले. अनेक सरकारी योजनांचा लाभ देण्यासाठीदेखील असे शिधापत्रिकाधारक असणे हा महत्त्वाचा निकष असतो. कुटुंबांमधील सदस्यांची संख्या वाढत चालल्याने स्वतंत्र शिधापत्रिका काढून घेण्याकडे नागरिकांचा कल वाढतो आहे.

याशिवाय रेशनकार्डामधील मृतांची नावे वगळणे, नवीन सदस्यांची नावे नोंदविणे, तसेच रहिवासी पत्त्यामध्ये दुरुस्ती करणे अशा विविध कारणांकरिता नागरिक पुरवठा विभागाकडे अर्ज करीत असतात. हे काम ऑनलाइन पद्धतीने सुरळीत पार पाडण्याकरिता जिल्हा पुरवठा विभागाने रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टीम (आरसीएमएस) कार्यान्वित केली आहे. परंतु, 'सर्व्हर' ठप्प पडणे व तत्सम तांत्रिक समस्यांमुळे अर्ज प्रलंबित राहण्याचे प्रमाण वाढत आहे.

### अर्जदारांना मारावे लागताहेत हेलपाटे

जिल्हा पुरवठा विभागाकडे ऑक्टोबरअखेरपर्यंत पाच हजार ४९९ अर्ज दाखल झाले होते. त्यामध्ये नवीन रेशनकार्ड मिळावे या मागणीसह दुरुस्तीसाठीच्या अर्जांचा समावेश होता. त्यापैकी तीन हजार २३० अर्ज निकाली काढण्यात आले असून, अजूनही दोन हजार २६९ अर्ज प्रलंबित आहेत. प्रलंबित अर्जांचा लवकरात लवकर निपटारा व्हावा याकरिता अर्जदार तहसील कार्यालयांमध्ये हेलपाटे मारत असून, त्यांना उत्तरे देताना अधिकारी, कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे.



### ठिकाण व प्रलंबित शिधापत्रिकांचा तपशील

| ठिकाण | प्रलंबित शिधापत्रिका | ठिकाण | प्रलंबित शिधापत्रिका |
| --- | --- | --- | --- |
| नाशिक | ६५४ | देवळा | ८४ |
| सुरगाणा | २७० | नांदगाव | ७७ |
| नाशिक धाविअ | २०८ | पेठ | ७२ |
| मालेगाव धाविअ | १६६ | दिंडोरी | ३८ |
| येवला | १४७ | इगतपुरी | ३७ |
| सिन्नर | १४६ | बागलाण | २८ |
| मालेगाव | १२१ | त्र्यंबकेश्वर | २१ |
| चांदवड | १०२ | निफाड | १० |
| कळवण | ८८ | एकूण | २,२६९ |

# ५५ हजार हेक्टरवर कांदा लागवड

## नुकसानानंतरही उत्पादकांची नगदी पिकाला पसंती

म. टा. प्रतिनिधी, नाशिक



### दरांत सुधारणा

गेल्या काही आठवड्यांतील सततच्या पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांद्याचा पुरवठा घटला आहे. घाऊक कांदा भावात वाढ झाली आहे. गेल्या दोन आठवड्यांत सरासरी घाऊक भाव १,०७५ रुपये क्विंटलवरून १,६५० रुपये क्विंटलपर्यंत वाढले आहेत. लासलगाव बाजार समितीत सरासरी घाऊक भाव १,६०० रुपयांदरम्यान आहेत. किमान ६०० रुपये, तर कमाल २,२०० रुपये क्विंटल दर मिळत आहे.

सप्टेंबरमधील अवकाळी पावसाने जिल्ह्यात खरीप कांद्याचे सुमारे ५० हजार हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले. कांद्याच्या एकूण क्षेत्रापैकी सुमारे ८० टक्के इतके हे नुकसान होते. या तडाख्यानंतरदेखील शेतकरी कांदा लागवडीकडे वळाले आहेत. यंदा लेट खरीप लागवडीत मोठी वाढ दिसत असून, आतापर्यंत सुमारे ५५ हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. आणखी १० हजार हेक्टर क्षेत्रावर लागवड होणे अपेक्षित आहे.

सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने बळीराजाचे अतोनात नुकसान झाले. दरम्यान, सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून नोव्हेंबर अखेरपर्यंत केली जाणारी 'लेट खरीप कांदा लागवड' यंदा वाढत्या प्रमाणात दिसत आहे. सप्टेंबरमधील अतिवृष्टीमुळे लेट खरीप कांद्याचे ११ हजार हेक्टर क्षेत्र प्रभावित झाले. पैकी ४२ हजार हेक्टर क्षेत्र वाचले आहे. याशिवाय पुढील दोन-तीन आठवड्यांत आणखी १५ हजार हेक्टरवर कांदा लागवड अपेक्षित आहे. खरीप कांदा १५ जुलै ते १५ सप्टेंबरदरम्यान, तर उशिराचा खरीप कांदा १५ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबरदरम्यान लावला जातो. यंदा दोन्ही हंगामांना अनियमित हवामानामुळे विलंब झाला आहे. आगामी तीन महिने हवामान अनुकूल राहिल्यास कृषी अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात डिसेंबर ते मार्चदरम्यान सुमारे १२ लाख टन कांदा उत्पादन होईल.

- लेट खरीप कांदा लागवडीचे उद्दिष्ट : ६५ हजार हेक्टर
- आतापर्यंत झालेली लागवड : ५५ हजार हेक्टर
- पाऊस व अवकाळी पावसामुळे कांदा लागवडीला उशीर
- पावसामुळे कांदा रोपांवर परिणाम

पन्नास हजार हेक्टरवर नुकसान

दै.सकाळ

दि.१० नोव्हेंबर,२०२५



# तिसऱ्या भाषेचे ओझे कशासाठी?

## साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, भाषा अभ्यासकांचा सवाल

सकाळ

# भाविकांना येण्या-जाण्यास स्वतंत्र मार्गिका हव्यात

## राजेशकुमार : त्र्यंबकेश्वर येथे तयारीची पाहणी, कुंभमेळ्यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करावे

■ सकाळ वृत्तसेवा

**त्र्यंबकेश्वर, नाशिक, ता. ९ : नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे सूक्ष्म नियोजन करावे. त्र्यंबकेश्वर येथे भाविकांना येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असाव्यात, अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या आहेत.**

तयारी सिंहस्थाची

सिंहस्थ कुंभमेळा तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव राजेशकुमार दोन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यावर आहेत. पहिल्या दिवशी (ता. ९) त्यांनी त्र्यंबकेश्वर येथे भेट दिली. कुंभमेळा विकासकामे, त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराची त्यांनी पाहणी केली. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वरचे मुख्याधिकारी [illegible] ठाकूर पाटील, पोलिसांच्या [illegible] विभागांचे अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राजेशकुमार यांनी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व भाविकांची गर्दी लक्षात घेता सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक असल्याचे सांगत, हे नियोजन करताना भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना केली. डॉ. गेडाम यांनी त्र्यंबकेश्वर शहर व परिसरातील सुरू असलेली व नियोजित कामे, तसेच नियोजनाची माहिती दिली.





**त्र्यंबकेश्वर :** कुशावर्त परिसरातील पेशवेकालीन अधिकाऱ्यांना सूचना करताना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार. सोबत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव आदी. दुसऱ्या छायाचित्रात नियंत्रण कक्षाची माहिती घेताना राजेशकुमार.

### कामे वेळेत पूर्ण करा : राजेशकुमार

साधू-महंत व भाविकांना आवश्यक सोयीसुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात. [illegible]

सकाळ

# मुख्यमंत्री गुरुवारी नाशिक दौऱ्यावर



**नाशिक :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी (ता. १३) नाशिक दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन होणार आहे. मुख्यमंत्र्यांसह अर्धा डझन मंत्री या दिवशी नाशिकमध्ये असतील. नाशिक व त्र्यंबकेश्वर शहरातील कुंभमेळ्याच्या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याचे प्राधिकरणाने नियोजन केले आहे. मात्र, पालिका आचारसंहिता लागू झाल्याने त्र्यंबकेश्वरची कामे वगळण्यात आली. आता फक्त नाशिक शहरातील कामांचा विषय शिल्लक राहिल्याने त्यासाठी मुख्यमंत्री नाशिकला येणार असल्याचे सांगण्यात येते. नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यासाठी त्यांनी २० मिनिटांची कालावधी दिला आहे. त्याकरिता प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोहळ्याचे निमंत्रण दिले जाणार आहे.

सकाळ

# अर्ज भरण्यास आजपासून प्रारंभ

## ११ पालिकांची रणधुमाळी : महायुती, महाआघाडीकडे लक्ष

रणधुमाळी निवडणुकांची

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ९ : जिल्ह्यातील ११ पालिकांमध्ये थेट नगराध्यक्षांसह सदस्यपदांसाठी सोमवार (ता. १०) पासून उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ होत आहे. तब्बल आठ वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका होणार असल्याने इच्छुकांमध्ये चुरस आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचा निर्णय अद्यापही घोषित होणे बाकी असल्याने मतदारांचे त्याकडे लक्ष लागले आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल ४ नोव्हेंबरला वाजला आहे. राज्यातील २४६ पालिका व ४२ नगरपंचायतींमध्ये पहिल्या टप्प्यात निवडणुका होत आहेत. त्यामध्ये जिल्ह्यातील ११ पालिकांतील एकूण २६६ जागांसह थेट नगराध्यक्षांच्या निवडीसाठी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी सोमवारपासून इच्छुकांना उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यप्रणालीनुसार इच्छुकांना आयोगाच्या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरायचा असून, त्याची प्रत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करायची आहे. सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळेत अर्ज सादर करता येणार असून, १७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरण्याची मुदत असेल. अर्ज दाखल करताना शक्तिप्रदर्शनाने जाण्याची तयारी केली जात आहे.

### युती, आघाडी की स्वबळ

- उमेदवारी अर्ज भरण्यास सुरवात होत असताना महायुतीकडून निवडणुका एकत्रित लढण्याबद्दल अद्यापही कोणतीच घोषणा झालेली नाही. महाविकास आघाडीमध्येही जागावाटपाची चर्चा थंडबस्त्यात आहे. त्यामुळे निवडणुकांमध्ये युती व आघाडी होणार की सर्वच पक्ष स्वबळाचा नारा देणार, याबाबत मतदारांमध्ये उत्सुकता आहे.

### निवडणूक कार्यक्रम असा

- उमेदवारी अर्जाची मुदत : १० ते १७ नोव्हेंबर
- अर्जांची छाननी : १८ नोव्हेंबर
- अर्ज माघारीची अंतिम मुदत : २१ नोव्हेंबर
- चिन्हवाटप : २६ नोव्हेंबर
- मतदान : २ डिसेंबर
- मतमोजणी : ३ डिसेंबर

### पालिकांमधील सदस्य

| पालिका | प्रभाग | संख्या |
|---|---|---|
| मनमाड | १६ | ३३ |
| ओझर | १३ | २७ |
| सिन्नर | १५ | ३० |
| येवला | १३ | २६ |
| पिंपळगाव ब. | १२ | २५ |
| चांदवड | १० | २० |
| इगतपुरी | १० | २१ |
| सटाणा | १२ | २४ |
| भगूर | १० | २० |
| त्र्यंबकेश्वर | १० | २० |
| नांदगाव | १० | २० |

### गुन्हेगारीची माहिती लपविल्यास छाननीतच अर्ज बाद

पान २ वर »

सकाळ

# जिल्ह्यात रेशनकार्डचे २२६९ अर्ज प्रलंबित

## ऑनलाइन प्रणालीमध्ये अडचणी

■ सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. ९ : शासकीय योजनांसाठी आवश्यक रेशनकार्ड हा महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येते. त्यामुळे नव्या रेशनकार्डसह दुरुस्तीसाठी हजारो अर्ज दाखल होत आहेत. पण, सरकारच्या 'आरसीएमएस' प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे अर्ज विलंबाने निकाली निघत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. जिल्हा पुरवठा विभागाकडे सध्या दोन हजार २६९ अर्ज प्रलंबित असून, वेळेत रेशनकार्ड हाती लागत नसल्याने लाभार्थ्यांची परवड होत आहे.**

सरकारतर्फे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतर्गत रेशनकार्डधारक लाभार्थींना महिन्याकाठी मोफत धान्याचे वितरण केले जाते. तसेच आरोग्यादायीसह वेगवेगळ्या योजनांमधूनही जनतेला लाभ दिला जातो. या योजनांकरिता रेशनकार्ड महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाते. त्यामुळे अलीकडे नवीन रेशनकार्ड काढण्याकडे जनतेचा ओढा वाढला आहे. त्यासोबत मृतांची नावे वगळणे आणि नव्याने सदस्यांची नोंद घेणे, नाव तसेच रहिवासी पत्त्यामधील दुरुस्ती अशा विविध कारणांसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होत असतात. मात्र, सरकारच्या रेशनकार्ड मॅनेजमेंट सिस्टिममधील (आरसीएमएस) सर्व्हर ठप्प पडणे व तांत्रिक समस्यांमुळे सदरचे अर्ज निकाली काढताना पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची दमछाक होत आहे.

जिल्हा पुरवठा विभागाकडे एकूण पाच हजार ४९९ अर्ज दाखल झाले होते. त्यामध्ये नव्या रेशनकार्डसह दुरुस्तीसाठीच्या अर्जांचा समावेश होता. पुरवठा विभागाने आतापर्यंत तीन हजार २३० अर्ज निकाली काढले असले तरी अद्यापही दोन हजार २६९ अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे हे नागरिक रेशनकार्डसाठी तहसील कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत. परंतु अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सर्व्हरचे कारण पुढे केले जात आहे. परिणामी, या नागरिकांना पुरवठा विभागाच्या धान्यासह शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे.



सकाळ

# गुन्हेगारीची माहिती लपविल्यास छाननीतच अर्ज बाद

## मतदारयादीत नाव आवश्यक, पक्षीय उमेदवाराला एक, अपक्षांना पाच सूचक गरजेचे

**संतोष विंचू** : सकाळ वृत्तसेवा

येवला, ता. ९ : नगरपालिका व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सोमवारपासून (ता.१०) सुरवात होत असून अर्ज भरताना अपराधसिद्धी, गुन्हेगारी पार्श्वभूमी संदर्भातील शपथपत्र सादर न केल्यास छाननीतच अर्ज नामंजूर होणार आहे. वयाची २१ वर्षे पूर्ण झाल्याचा पुरावाही द्यावा लागणार आहे. पक्षीय उमेदवाराला एक तर अपक्षांना पाच सूचकांच्या सह्या लागतील. लढणाऱ्याचे मतदारयादीत नाव असणे आवश्यक आहे.

उमेदवारी अर्ज सोमवार (ता.१७) पर्यंत सकाळी ११ ते दुपारी तीनपर्यंत सुटीचे दिवस वगळून दाखल करता येतील. उमेदवारांनी ओळखपत्रासाठी स्वतःचे पासपोर्ट आकाराची छायाचित्रे अर्जासोबत जमा करावेत. प्रथम ऑनलाइन भरलेल्या फॉर्मची व शपथपत्राची प्रत आवश्यक त्या सर्व ठिकाणी स्वाक्षरीसह सादर करावी. भाग एकमधील घोषणापत्रावर स्वाक्षरी न केल्यास छाननीदरम्यान अर्ज फेटाळला जाईल. राष्ट्रीयकृत बँकेत निवडणुकीसाठी नवीन बँक खाते उघडून पासबुकची छायांकित प्रत जोडावी लागणार आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करताना उमेदवारासह पाचच व्यक्तींना प्रवेश दिला जाणार आहे.

### अर्ज दाखल करतानाची काळजी

- मूळ जातप्रमाणपत्र, पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य
- राखीव प्रवर्गातील उमेदवारांचा खुल्या जागेवरून निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे.
- अपत्य व दायित्व, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे शपथपत्र नामनिर्देशन पत्रासोबत सादर करणे बंधनकारक
- अर्जासोबत अपूर्ण, अर्धवट माहितीचे शपथपत्र छाननीच्या वेळेपूर्वी सादर करण्याची संधी.
- इतर उमेदवार शपथपत्रातील तपशिलाबाबत आक्षेप घेऊ शकतात.
- १२ सप्टेंबर २००१ नंतर तीन अपत्य झालेले असतील तर निवडणूक लढविण्यास अपात्र.
- अपत्यासंदर्भातील शपथपत्र मुदतीत सादर न केल्यास छाननीमध्ये अर्ज नामंजूर होणार

### उमेदवारीबाबतचे इतर निकष

- एका उमेदवारास एका मतदारसंघात जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात.
- एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक मतदारसंघातून निवडणूक लढवू शकते.
- एकच व्यक्ती पात्र असल्यास कितीही प्रभागांमध्ये नामनिर्देशन पत्र भरू शकेल.
- एकदा स्वाक्षरी केल्यानंतर सूचक राजीनामा देऊ शकत नाही किंवा माघार घेऊ शकत नाही.
- एकाच उमेदवाराच्या एकापेक्षा जास्त अर्जांवरील सूचक वेगवेगळे असणे आवश्यक आहे.
- सूचक त्याच प्रभागात उमेदवार म्हणून निवडणूक लढवू शकतो.
- एखादा उमेदवार अन्य उमेदवारास सूचक होऊ शकतो.

> निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांची माहिती इच्छुकांना व राजकीय पक्षांना दिली आहे. प्रथम ऑनलाइन अर्ज दाखल करून त्याची प्रत कार्यालयात जमा करायची आहे. राखीव जागेवरील उमेदवारांसाठी जात प्रमाणपत्र निवडून आल्याच्या सहा महिन्यांच्या आत जमा करण्याची मुदत आहे, मात्र हमीपत्र द्यावे लागेल.
>
> \- **बाबासाहेब गाढवे,** निवडणूक निर्णय अधिकारी, येवला

Nashik, Main
10/11/2025 Page No. 2

सकाळ

# बिऱ्हाड आंदोलकांच्या पदरी निराशाच

## मागण्या राज्यपालांनी फेटाळल्या; आचारसंहितेमुळे धोरणात्मक निर्णय शक्य नसल्याची अडचण

सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. ९ : आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांतील बाह्यस्रोत भरतीविरोधात ठराव घेऊन राज्यपालांकडे गेलेल्या बिऱ्हाड आंदोलकांच्या पदरी निराशाच पडली आहे. राज्यपालांनी त्यांच्या मागण्या फेटाळल्याने आंदोलकांनी मुंबईतील आझाद मैदानावरील मोर्चा पुन्हा आदिवासी विकास विभागासमोर आणला. राज्यात आता आचारसंहिता लागू झाल्याने धोरणात्मक निर्णय घेणे शक्य नसल्याने हा प्रश्न सुटणार तरी केव्हा, असा प्रश्न उभा ठाकला आहे.**



नाशिक : बिऱ्हाड आंदोलक भरपावसात मुंबईत पोहोचल्यानंतर त्यांना शेडखाली झोपावे लागले. (संग्रहित छायाचित्र)

आश्रमशाळेतील रोजंदारी (तासिका) तत्त्वावरील वर्ग ३ व वर्ग ४ या कर्मचाऱ्यांच्या जागेवर खासगी कंपनीमार्फत कंत्राटी पद्धतीने १७९१ पदांची भरती करण्यात येत आहे. त्याच्या विरोधात महाराष्ट्र राज्य शासकीय आश्रमशाळा कर्मचारी संघटनेने ९ जुलै २०२५ पासून आदिवासी विकास विभागासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू केले आहे. त्याला चार महिने पूर्ण झाले. मात्र कुठलाही तोडगा निघालेला नाही. आंदोलकांनी शहरात मोर्चे काढले, आदिवासी महापंचायत घेतली. त्यात मंजूर ठराव घेऊन आंदोलक पायी मुंबईपर्यंत पोहोचले. ऐतिहासिक पायी मोर्चा मुंबईपर्यंत घेऊन गेले. मुंबईच्या वेशीवर ठाण्यात पुन्हा आंदोलकांनी बैठका घेत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु, राज्य शासनाने त्यांच्या मागण्यांची दखल घेतली नाही.

आंदोलक आझाद मैदानावर पोहोचल्यानंतर त्यांनी राज्यपालांची भेट मागितली. त्यांनी बिऱ्हाड आंदोलकांना पत्र पाठवत आपल्या मागण्या राज्य शासनाच्या पातळीवरील आहेत. त्यांच्याशी याविषयी चर्चा झाल्याचे सांगितले. त्यामुळे मंत्रिमंडळस्तरावर याविषयी अंतिम निर्णय घ्यावा लागेल. राज्यात आता आचारसंहिता लागू झाली आहे. काही दिवसांत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची आचारसंहिता लागू होईल. या निवडणुका होण्यापूर्वीच महापालिकांच्या आचारसंहितेची घोषणा होणार असल्याने साधारणतः डिसेंबर ते जानेवारीपर्यंत शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे या बिऱ्हाड आंदोलनाचे पुढे काय होणार, असा बिकट प्रश्न निर्माण झाला आहे.

### विद्यार्थी, आंदोलकांचेही नुकसान

गेल्या चार महिन्यांपासून नोकरीच्या प्रवाहापासून आंदोलक दूर आहेत. यामुळे त्यांची पूर्वीची रोजंदारीतील सेवा खंडित झाल्याने त्याच पदांच्या सेवेसाठी त्यांना दावा सादर करता येईल का, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. दुसऱ्या बाजूला रोजंदारी शिक्षकांच्या जागेवर खासगी कंपनीमार्फत नियुक्त केलेले शिक्षक काम करण्यास तयार नाहीत. खासगी कंपनीला ठेका मिळूनही त्यांना व्यवस्थितरीत्या सेवा देता आलेली नाही. परिणामी, विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक नुकसान झाले. सहा महिन्यांपासून शाळेतील शिक्षण प्रभावित झाले आहे.

सकाळ

# हॉटेलमध्ये 'एमडी'चा अड्डा उद्ध्वस्त

## एनपीडीएसची कारवाई : चौघांना बेड्या; सेवानिवृत्त पोलिसपुत्राचाही समावेश

[illegible]



नाशिक : [illegible]

### 'डोंगरी' कनेक्शन

[illegible]

### हॉटेलमालकाच्या नावावर खोली

[illegible]

### एमडी किट आता हॉटेलमधून

[illegible]

सकाळ

# प्रगणनेत साडेपाच हजार गवताळ, तर बारा हजार पाणपक्ष्यांची नोंद

## नांदूरमध्यमेश्वर अभयारण्यात पक्षी सप्ताहानिमित्त मोहीम

■ सकाळ वृत्तसेवा

चांदोरी, ता. ९ : रामसर स्थळाचा दर्जा नांदूरमध्यमेश्वर अभयारण्य पक्ष्यांचे स्वर्गस्थान मानले जाते. दर वर्षी हिवाळ्यातील प्रारंभी स्थलांतरित पक्ष्यांचे थवे येथे येऊन धडकतात, आणि संपूर्ण परिसर त्यांच्या किलबिलाटाने गुंजून जातो. या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या 'पक्षी सप्ताह'च्या निमित्ताने दिनांक ८ नोव्हेंबर रोजी पक्षी प्रगणना हा उपक्रम उत्साहात पार पडला.

उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक, सहायक वनसंरक्षक हेमंत उबाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी [illegible] यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रगणना [illegible] आली. [illegible] आणि आजूबाजूच्या परिसरात वनकर्मचारी, पक्षी अभ्यासक आणि स्थानिक पक्षिमित्रांनी मिळून सकाळच्या वेळेत निरीक्षण केले.



नांदूरमध्यमेश्वर : अभयारण्यात प्रगणनेत आढळलेले पक्षी.

प्रगणनेत १२ हजार पाणपक्षी आणि पाच हजार ५०० गवताळ पक्ष्यांची नोंद झाली आहे.

### संख्या वाढणार

■ वन विभागाच्या माहितीनुसार, थंडीचे प्रमाण वाढू लागल्याने येत्या काही दिवसांत स्थलांतरित पक्ष्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. उत्तर भारत, तसेच सायबेरिया आणि मध्य आशियातून येणारे पक्षी लवकरच या परिसरात दाखल होतील. पक्ष्यांच्या प्रगणनेद्वारे केवळ संख्येचा अंदाज नव्हे, तर त्यांच्या निवासपद्धती, खाद्यसवयी व पर्यावरणीय संतुलनाबाबत महत्त्वाची माहिती मिळते.

यामध्ये प्रामुख्याने बदक, [illegible] बदक, भुवई बदक, तलवार बदक, मोठा [illegible], [illegible], लाल डोक्याचा [illegible], [illegible] करकोचा, [illegible] करकोचा, कॉमन क्रेन, [illegible] पाणकोंबडी, [illegible], कमळ पक्षी, [illegible], हळदीकुंकू, [illegible], राखी बगळा आणि तरंग अशा विविध प्रजातींचा समावेश आहे.

या उपक्रमात वनपाल [illegible], वनरक्षक गोरख पाटील, के. डी. [illegible], तसेच स्थानिक कर्मचारी [illegible], [illegible], [illegible], [illegible], [illegible] आणि [illegible] यांनी सहभाग नोंदविला.

लोकमत

# जुन्या मनपा इमारतीत जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी वणवण; जुनी नोंदणी सापडत नसल्याने वांधा

## नागरिकांना करावा लागतो अनेक समस्यांचा सामना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महापालिकेतील जन्म-मृत्यू विभागात दाखले घेण्यासाठी नागरिकांची तनवण सुरूच आहे. आता ज्येष्ठ नागरिकांच्या जुनी नोंदणीच सापडत नसल्याचे चित्र आहे. अनेकांनी जुने दाखले देऊनही रेकॉर्ड जीर्ण झाल्याचे कारण देत कोर्टातून आदेश आणण्याचे सांगितले जात आहे. त्यासंदर्भात शहर ए खतीब हाफिज हिसामुद्दीन खतीब यांच्याकडून महापालिका आयुक्तांना निवेदनही देण्यात आले आहे.

महापालिकेच्या पूर्व विभागीय कार्यालयात शहराच्या १८३४ पासून ते १९६० पर्यंतच्या महापालिकांची स्थापना झाल्यानंतरच्या पूर्व विभागातील नागरिकांच्या जुने रेकॉर्ड असल्यामुळे या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक नाव शोधण्यासाठी अर्ज करतात या ठिकाणी दररोज किमान शंभर अर्ज येतात. मात्र, गेल्या काही शोधानंतर अर्जच स्वीकारले जात नसल्याची बाब समोर आली आहे. त्याचबरोबर, अनेक ज्येष्ठ नागरिकांच्या जुनी नोंदणीच सापडत नसल्याने त्यांना कार्यालयात चकरा माराव्या लागत आहे, तर अनेकांनी जुने दाखले देऊनही रेकॉर्ड जीर्ण झाल्याचे कारण देत कोर्टातून आदेश आणण्याचेही सांगितले जातात. तसेच, पूर्व विभागीय कार्यालयात कोणत्याही नावात दुरुस्तीचा अर्ज भरण्यापूर्वी लिपिकांची सही घ्यावी लागते.



महापालिकेच्या पूर्व विभागात जुने जन्म व मृत्यू रेकॉर्ड जीर्ण झाले आहेत, यामुळे शेकडो नागरिकांची नोंद सापडत नाही.

### अर्ज आणण्याची सक्ती

ज्या नोंदींचे रेकॉर्ड पालिकेकडे उपलब्ध नाही, त्या नोंदीसाठी जर अर्ज आला, तर संबंधित व्यक्तीकडून त्याबाबतची कागदपत्रे, शपथपत्र घेऊन त्यांना रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचा शेरा असलेले दाखले दिले जातात. दाखला मिळविण्यासाठी करण्यात येणारा अर्ज हा नियमानुसार जन्म-मृत्यू विभागाकडून योग्य त्या फॉरमॅटमध्ये मिळणे आवश्यक असते. मात्र, या विभागाकडून तो अर्ज मिळत नाही. त्यासाठी नागरिकांना अर्ज लिहून आणण्याची सक्ती केली जाते.

"

१८३४ पासून ते १९६० पर्यंतचे मोडी भाषेतील दाखले मराठीत करण्याची प्रक्रिया महापालिकेने तातडीने सुरू करावी. रेकॉर्ड जाणूनबुजून खराब केला जात असल्याचे चित्र असून, यामुळे अनेक ज्येष्ठांची नावे सापडत नसल्याचे चित्र आहे. याकडे महापालिका आयुक्तांनी लक्ष घालण्याची गरज आहे.

**हाफिज खतीब**, खतीब ए शहर

# यंत्रणा बंद, रुग्णांना खासगीचा 'संदर्भ'

## विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय : तिन्ही विभागांतील महत्त्वाची उपकरणे बंद; महिनाभरात ३५० रुग्ण केले रेफर

लोकमत विशेष

जहीर शेख
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** हृदयरोग विभागातील कॅथलॅब बंद, मूत्रपिंड विभागातील लिथोट्रिप्सी यंत्रणा बंद, कर्करोगावरील उपचारात रेडिओथेरपीकरिता वापरण्यात येणारे लिनॅक मशीनदेखील बंद. ही परिस्थिती सध्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात आहे. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना खासगी रुग्णालयात 'रेफर' केले जात असल्याची धक्कादायक बाब 'लोकमत'च्या पाहणीत उघडकीस आली.

राज्य शासनाकडून २००८ मध्ये नाशकात उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा पुरविण्याच्या हेतूने विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय सुरू केले आहे. या रुग्णालयात केवळ उत्तर महाराष्ट्रातीलच नाही, तर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातूनही नागरिक उपचारासाठी येतात. मात्र, रुग्णालयामधील विविध वैद्यकीय उपकरणे बंद असल्याने तब्बल दोन महिन्यांपासून या रुग्णालयातील हृदयरोग विभाग, मूत्रपिंड विभाग व कर्करोग विभागाच्या महत्त्वाच्या शस्त्रक्रियादेखील बंद झाल्या आहेत. रुग्ण आल्यावर खासगी रुग्णालयात पाठवा अशी परिस्थिती संदर्भ रुग्णालयात असून याकडे कोणाचेच लक्ष नसल्याने चित्र आहे. यापूर्वी रुग्णालयात खाटांची कमतरता होती, तर आता रुग्णच नाहीत.



नादुरुस्त असलेली कॅथलॅब.



तिन्ही विभागांतील यंत्रणा बंद असल्यामुळे ओपीडीसाठीचा कॉरिडॉर निर्मनुष्य.



मूत्रपिंड विभागाची 'लिथोट्रिप्सी' यंत्रणा बंद.

### सर्व उपचार ठप्प..

'अँजिओप्लास्टी'साठी डॉक्टरांकडून जवळच्या खासगी रुग्णालयात 'रेफर' केले जात असल्याचे प्रकार घडत आहेत. हृदयविकाराचे निदान करणाऱ्या अँजिओग्राफी मशीनसह उपचारांसाठीचे कॅथलॅब मशीन बंद आहे. त्यामुळे अँजिओप्लास्टी, बायपास शस्त्रक्रियांसारखे उपचार ठप्प झाले. त्यांना थेट अँजिओप्लास्टी करण्यास 'रेफर' केले जात असल्याचे दिसून आले.

### या महत्त्वाच्या यंत्रणा बंद

१. हृदयरोग विभागातील अतिशय महत्त्वाची असलेली कॅथलॅब यंत्रणा दोन महिन्यांपासून बंद

२. कर्करोग विभागातील कर्करोगग्रस्तांवर उपचारासाठी असलेले रेडिओथेरपीकरिता वापरण्यात येणारे लिनॅक मशीन व मॅमोग्राफी मशीन तीन महिन्यांपासून बंद आहे.

३. मूत्रपिंड विभागातील किडनी स्टोनचे तुकडे तुकडे करणारी 'लिथोट्रिप्सी' यंत्रणा सहा महिन्यांपासून बंद आहे.

### दिवसाला किमान १० ते १२ रुग्ण खासगी रुग्णालयाकडे

रुग्णालयात आलेल्या रुग्ण तपासणी करून खासगी रुग्णालयात पाठवले जात आहे. रुग्णालयातील मूत्रपिंड, हृदयरोग व कर्करोग विभागातील यंत्रणा बंद पडल असल्याचे व तेथे डॉक्टरांची कमतरता असल्याचे सांगून डॉक्टरांकडून सर्रास रुग्णालयाचे लेटरहेडवर खासगी रुग्णालयाचे नाव लिहीत रुग्ण रेफर केले जात आहेत, हे 'लोकमत'च्या पाहणीत समोर आले.

**प्रकरण १ :** शहरातील वडाळा गाव परिसरातील राहणाऱ्या एका रुग्णाला छातीत दुखायला लागल्याने त्यांना मंगळवारी (दि.४) तातडीने विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या ठिकाणी उपस्थित असलेल्या एका डॉक्टरांनी त्यांना अँजिओग्राफी करण्याचे सुचविले. मात्र, रुग्णालयातील कॅथलॅब बंद असल्याने अँजिओग्राफी खासगी रुग्णालयात करावे लागणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र, रुग्णालयात रुग्णांची नोंद व्हावी म्हणून एक दिवस येथे थांबविण्याचे सांगून त्यांची महात्मा फुले जीवनदायी योजनेची मंजुरी घेण्यात आली व दुसऱ्या दिवशी वडाळा नाक्यावरील खासगी रुग्णालयात पाठविण्यात आले.

**प्रकरण २ :** गेल्या आठवड्यात कर्करोग ग्रस्त असलेले नाशिकरोड येथील एक रुग्ण रेडिओथेरपीसाठी रुग्णालयात आल्यानंतर त्यांना यंत्रणा बंद असल्याचे सांगण्यात आले. तसेच, संबंधित रुग्णांना पंचवटी येथील खासगी रुग्णालयात पाठविण्यात आले.

> दोन महिन्यांपासून यंत्रणा बंद ठेवून संदर्भ रुग्णालयात येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना खासगी रुग्णालयात पाठवले जात आहे. याकडे आता मुख्यमंत्र्यांनीच लक्ष देण्याची गरज आहे.
>
> **अनील पिसाळे,** रुग्णसेवक

> यंत्रणा दुरुस्तीसाठी पाठपुरावा करून तातडीने उपचार सुरू करण्याचा प्रयत्न केले जात आहेत. कॅथलॅब दुरुस्तीलाही सुरुवात होणार आहे.
>
> **डॉ. अरुण पवार,** वैद्यकीय अधीक्षक, संदर्भ रुग्णालय

लोकमत

# मुलींना मोफत शिक्षण देण्यास काही वैद्यकीय महाविद्यालयांचा नकार

## ५७ विद्यार्थिनींनी केली शुल्क नियामक समितीकडे तक्रार, सर्वाधिक नाशिकच्या विद्यार्थिनी

जहीर शेख
लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यातील मुलींना सर्व प्रकारचे शिक्षण निःशुल्क देण्याचे शासनाचे धोरण आहे. २०१७ साली शासनाने बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या राज्यातील मुलींना शिक्षण व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ केले होते. आता जुलै २०२४च्या निर्णयानुसार, व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत देण्याची घोषणा करण्यात आली. सक्षम केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींना १०० टक्के शुल्क माफ करण्यात आले. त्यासाठी कुटुंबाचे उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असावे, असा निकष आहे. मात्र, काही आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी आणि होमिओपॅथी महाविद्यालयाकडून विद्यार्थिनींकडून पूर्ण शैक्षणिक शुल्क मागितले जात आहे. तसेच शुल्क न दिल्यास प्रवेश रद्द केले जात असल्याच्या ५७ तक्रारी शुल्क नियामक समितीकडे प्राप्त झाल्या आहेत. यात सर्वाधिक तक्रारी नाशिक जिल्ह्यातील असल्याचे समोर आले आहे.

मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने राज्य सरकारने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मोफत शिक्षण योजना लागू केली. याअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईडब्ल्यूएस), सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आणि इतर मागासलेल्या (ओबीसी) प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत मिळत आहे. राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित, कायम विनानुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतन, सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे याअंतर्गत व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही सवलत लागू आहे. या विद्यार्थिनींच्या शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थिनींकडून शुल्क आकारणी करण्यात येऊ नये, अशा सूचना सर्व महाविद्यालयांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. तरीही काही संस्था, महाविद्यालये पात्र लाभार्थी विद्यार्थिनींकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्क घेत असल्याच्या तक्रारी येत आहेत.


एआय इमेज

### मुलींना प्रवेश नाकारणाऱ्या सहा महाविद्यालयांची चौकशी

मुलींना वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या पदवी, पदव्युत्तर शिक्षण मोफत देण्यात आडकाठी आणणाऱ्या खासगी वैद्यकीय शिक्षण संस्थांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. आयुष संचालनालयाने राज्यातील सहा महाविद्यालयांची सखोल चौकशी करण्यासाठी नुकतीच तज्ज्ञांची समिती नेमली आहे. ही समिती संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांत मुलींना तसेच राखीव घटकातील मुलांना प्रवेशादरम्यान शुल्कासाठी केलेल्या अडवणुकीची माहिती घेऊन संचालनालयाकडे अहवाल सादर करणार आहे. त्यामुळे या अहवालाकडेही लक्ष असणार आहे.

“ राज्यातील खासगी महाविद्यालयांकडून मुलींची अवाजवी शुल्कापोटी अडवणूक केली जात होती. याबाबत आलेल्या तक्रारींवर विभागाकडून चौकशी समिती गठीत केली आहे.मात्र, तरी नाशिक जिल्ह्यातील अनेक २०हून अधिक मुलींना आयुषच्या महाविद्यालयाने प्रवेश नाकारल्याच्या तक्रारी आहेत.

**कलीम खान,**
मिशन अवेअरनेस फाउंडेशन

“ प्रवेश यासंदर्भातील तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, संबंधित महाविद्यालयांची सखोल चौकशी करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमून त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

**प्रा. डॉ. डी. रमण घुंगराळेकर,**
संचालक, आयुष संचालनालय

“ बीएएमएससाठी मालेगाव महाविद्यालयात प्रवेशासाठी गेल्यानंतर पूर्ण शैक्षणिक शुल्काची मागणी करण्यात आली. मुलींच्या मोफत शिक्षणासंदर्भात त्यांना सांगितल्यानंतर पैसे भरल्यानंतरच प्रवेश होणार असल्याचे संबंधित महाविद्यालयाकडून सांगण्यात आले. यानंतर मी शुल्क नियामक समितीकडे तक्रार केली आहे.

**तक्रारदार विद्यार्थिनी**

लोकमत

मस्ट READ

# पुरोहित कर्म अभ्यासक्रमाला अद्यापही लाभेना 'मुहूर्त'

## शिक्षकांना नाही नियुक्ती; ३० जागांवर खुला प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण संस्थेत सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर वैदिक शिक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अल्प मुदतीच्या अभ्यासक्रमाला होत असलेल्या विरोधामुळे प्रत्यक्ष शिकवणुकीला अद्याप्ही मुहूर्त लाभलेला नाही. शिक्षक, प्रवेशाच्या अटी आणि शिकवण याबाबत पूर्णत: स्पष्टता आलेली नसतानाही फेब्रुवारी २०२६ पासून त्याचा श्रीगणेशा होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



**२४०** तासांचा प्रशिक्षण कालावधी निश्चित केला आहे.

उज्जैन येथील महर्षि सांदिपनी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान यांनी वैदिक संस्कार - कनिष्ठ सहायक या नावाने नवीन कौशल्याधारित अभ्यासक्रम तयार केला आहे. हा अभ्यासक्रम राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखड्यांतर्गत तयार करण्यात आला असून, याचा उद्देश विद्यार्थ्यांना वैदिक साहित्य, गृह्यसूत्र, वेदसंस्कार, वैदिक दैनंदिन दिनचर्या, पूजन पद्धती आदींचे मूलभूत ज्ञान देत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण २४० तासांचा असून, ११० तास सिद्धांत, १०० तास प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि ३० तास ऑन द जॉब प्रशिक्षण, असे त्याचे स्वरूप आहे. कार्यक्रमासाठी किमान पात्रता ८वी उत्तीर्ण असून, उमेदवाराचे वय किमान १४ वर्षे असावे, असे म्हटले असून समानतेचे प्रशिक्षण असल्याने ते सर्वांसाठी खुले राहणार आहे. मात्र, हा अभ्यासक्रम शिकविणार कोण, तो कोण शिकविणार हे प्रश्न अद्यापही अनुत्तरीत असून, महर्षि सांदिपनी वेदविद्या प्रतिष्ठानच्या अध्यापकांकडेच त्याची धुरा सोपविली जाण्याची दाट शक्यता आहे.

### या प्रशिक्षणाचा समावेश...

वैदिक संस्कार कनिष्ठ सहाय्यकाची भूमिका, वेद व सूक्त यांची ओळख, गृह्यसूत्र परिचय, वैदिक संस्कारांचे मूलतत्त्व, वैदिक दिनचर्या, वैदिक पूजनाची तयारी, जातकर्म संस्कार, नामकरण संस्कार, निष्क्रमण संस्कार.

> सिंहस्थात पूजा करण्यासाठी पुरेसे पुरोहित आहेत. त्यांची कमतरता अजिबात नाही. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली केल्यानंतर हा अभ्यासक्रम आणणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. आत्ताचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही तसे संकेत दिले आहेत.
>
> **मनोज थेटे, अध्यक्ष, त्र्यंबक पुरोहित संघ**

> संस्कृत विद्यालयांतर्गत सामान्य पूजा प्रशिक्षण या अभ्यासक्रमात आहे. कुंभमेळ्यात पुरोहित कमी पडणार ही अफवा आहे. यासंदर्भात संबंधितांशी चर्चा करून ही बाब निदर्शनास आणून देण्यात आली आहे. नाशिक आणि त्र्यंबक येथील सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर हे प्रशिक्षण नसून देशभरात ते देण्यात येणार आहे. पुरोहित संघाच्या वतीनेही प्रशिक्षणही सुरू करण्यात येणार आहे.
>
> **चंद्रशेखर पंचाक्षरी,**
> अध्यक्ष पंचकोशी पुरोहित संघ

Hello Nashik
Page No. 1 Nov 10, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# अंगावर चढणार खाकी वर्दी; जिल्ह्यात २६२ पदांसाठी भरती

## कारागृह दलात शिपायांच्या स्वतंत्र ११८ जागा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** ग्रामीण पोलिस दलात २१० पोलिस शिपाई, ५२ वाहनचालक अशा एकूण २६२ रिक्त पदांची, तर कारागृह दलात स्वतंत्रीत्या ११८ शिपायांची भरती करण्यात येणार आहे. ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, ३० तारखेपर्यंत त्याची मुदत आहे.

राज्याच्या गृह खात्याकडून महाराष्ट्र पोलिस दलामध्ये १५ हजार पदांपेक्षा जास्त रिक्त जागांवर भरतीची घोषणा करण्यात आली. यानंतर भरती प्रक्रियेला सर्वच जिल्ह्यांमध्ये वेग आला आहे. नाशिक ग्रामीण पोलिस दलासह कारागृह दलाकडून विविध संवर्गातील रिक्त पदांकरिता अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याबाबतची सविस्तर माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे अधीक्षक कार्यालयाच्या सूत्रांनी सांगितले. तरुणाईचा सराव शहरासह जिल्ह्यातील मैदानांवर वाढल्याचे चित्र आहे.



**५०**

गुणांची शारीरिक मैदानी चाचणी, तर १०० गुणांच्या लेखी परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. मैदानी चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवार एकास दहा या प्रमाणानुसार लेखी परीक्षेसाठी पात्र ठरणार आहेत.

### शिपाई पदाच्या जागा

| प्रवर्ग | जागा |
|---|---|
| अनुसूचित जाती | १७ |
| अनुसूचित जमाती | २४ |
| विमुक्त जमाती | १० |
| भटक्या जमाती (ब) | ९ |
| भटक्या जमाती (क) | ७ |
| विशेष मागास | ४ |
| इतर मागास | ७१ |
| एसईबीसी | २३ |
| ईडब्ल्यूएस | १८ |
| खुला | २९ |

ग्रामीण पोलिस दलात २१० शिपाई, ५२ वाहनचालकांची पदे भरली जाणार आहेत. २०२३ साली १५० शिपाई तर गेल्यावर्षी ३२ शिपाई पदांची भरती करण्यात आली होती.

### वाहनचालक पदाच्या जागा

| प्रवर्ग | जागा |
|---|---|
| अनुसूचित जाती | ५ |
| अनुसूचित जमाती | ११ |
| विमुक्त जमाती | २ |
| भटक्या जमाती (ब) | १ |
| भटक्या जमाती (क) | २ |
| विशेष मागास | १ |
| इतर मागास | ८ |
| एसईबीसी | ४ |
| ईडब्ल्यूएस | ४ |
| खुला | १३ |

### १०० गुणांच्या लेखी परीक्षेत ४० टक्के गुण अनिवार्य

लेखी परीक्षा शंभर गुणांची असून, उमेदवाराला ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. बारावी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपासून पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या युवकांकडून सुद्धा भरतीची तयारी केली जात आहे.

### वयोमर्यादा संपलेल्यांनाही मिळणार एक संधी

२०२२ ते २०२५ या कालावधीत वयोमर्यादा संपलेल्या इच्छुकांनासुद्धा आपले नशीब मैदानात आजमावण्याची संधी उपलब्ध झाली आहे. वयोमर्यादा २०२२ ते २५ साली संपुष्टात आली आहे, अशा उमेदवारांच्याही आशा पल्लवित झाल्या आहेत.

लोकमत

# मुख्य सचिवांकडून त्र्यंबकला सिंहस्थ कामांचा आढावा



त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा कामाचा आढावा घेण्यासाठी आलेले मुख्य सचिव राजेशकुमार मीना व इतर अधिकारी.

लोकमत न्यूज नेटवर्क

**त्र्यंबकेश्वर :** राज्याचे प्रधान सचिव राजेशकुमार मीना यांनी रविवारी (दि. ९) येथील सिंहस्थ कुंभमेळा कामांचा पाहणी दौरा केला. रविवार असल्याने विविध विभागांचे प्रमुख अधिकारी हजर नव्हते. यावेळी मीना यांनी येथील सिंहस्थ कुंभमेळा तयारीचा आढावा घेतला.

यावेळी त्यांच्यासमवेत विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखरसिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव पाटील, पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल पाटील आदी उपस्थित होते.

## सुविधांचा घेतला आढावा

या दौऱ्यादरम्यान राजेशकुमार यांनी भगवान त्र्यंबकेश्वरांचे दर्शन घेतले. आगामी कुंभमेळ्याच्यानियोजनासंदर्भात त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच सिंहस्थासाठी सुरू केलेली व करावयाची विकासकामे याचा आढावा घेतला. मुख्य सचिवांनी कुंभमेळ्याचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा, स्वच्छता व भाविकांसाठी आवश्यक सुविधांचा आढावा घेतला व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्यात. यावेळी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे विश्वस्त कैलास घुले, पुरुषोत्तम कडलग, मनोज थेटे, स्वप्निल शेलार आदींनी पाहुण्यांचे स्वागत करून सर्व अधिकाऱ्यांचा देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

लोकमत

मस्ट READ

# दुसऱ्या टप्प्यात होणार ४१ रस्त्यांची कामे !

काउंट डाउन महाकुंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** सिंहस्थ प्राधिकरणाने महापालिकेला साडेनऊशे कोटींच्या १८ रस्ते कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर या कामांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सिंहस्थासाठी अवघा २१ महिन्यांचा कालावधी शिल्लक राहिल्याने इतर रस्त्यांची कामेही मार्गी लागावी, या उद्देशाने मनपाच्या बांधकाम विभागाने अन्य ४१ रस्त्यांच्या कामांना देखील मंजुरी मिळावी, यासाठी प्राधिकरणाला पत्र पाठवले आहे.

महापालिकेने सिंहस्थाच्या अनुषंगाने जवळपास १७ हजार १७२.४२ कोटी रुपयांचा सिंहस्थ कृती आराखडा तयार करून तो राज्य शासनाकडे सादर केला आहे. या आराखड्यात सर्वाधिक आर्थिक तरतूद ही बांधकाम विभागाने रस्त्यांसाठी केलेली असली, तरी प्राधिकरणाने मात्र शहरातील दळणवळणाच्या दृष्टीने तसेच वाहतूक व्यवस्थेच्या अनुषंगाने महापालिका आणि पोलिस आयुक्तालय यांना रस्त्यांचे प्राधान्यक्रम ठरवून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

**५९**
रस्त्यांपैकी पहिल्या टप्प्यात ९५० कोटी रुपयांच्या १८ कामांना मंजुरी.

> प्राधान्यक्रम ठरवलेल्या ५९ रस्ते कामांपैकी १८ कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन आर्थिक देकार उघडले जाणार आहेत. उर्वरित रस्ते कामांना देखील मंजुरी मिळावी, यासाठी प्राधिकरणाला पत्र सादर केले आहे.
>
> **संजय अग्रवाल**, शहर अभियंता, मनपा

## अहवाल सादर

पोलिस प्रशासनाने शहरातील ५९ रस्त्यांचा समावेश असलेला अहवाल तयार करून तो सादर केला होता. त्यानुसार, महापालिकेने निविदा प्रक्रिया हाती घेतली असून, ठेकेदारांवर शिक्कामोर्तब होणार आहे.

## १८ कामे मार्गी लागणार

1. १८ कामे मार्गी लागली असल्याने मनपाच्या बांधकाम विभागाने सिंहस्थ प्राधिकरणाला पत्र पाठवून अन्य राहिलेल्या ४१ रस्त्यांना प्रशासकीय मंजुरी मिळावी, अशी मागणी केली आहे.
2. प्राधान्यक्रमानुसार ५९ रस्त्यांच्या कामांसाठी सुमारे २१५० कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. १८ कामे मार्गी लागल्याने आता ४१ कामांसाठी जवळपास १२०० कोटींच्या निधीची गरज पडणार आहे.
3. कामांची गरज आणि उपलब्ध निधी पाहता, दुसऱ्या टप्प्यात आणखी साडेसहाशे ते सातशे कोटी रुपयांच्या रस्ते कामांना प्रशासकीय मंजुरी मिळू शकते, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

# सिव्हिलमधील एक्स-रे, सोनोग्राफीसह सीटीस्कॅनच्या तपासण्या वर्षभरात दुप्पट

## महिन्याला दहा हजारांवर एक्स-रे काढले जाताय

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** शासकीय जिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गोरगरीब रुग्णांची संख्या मोठी आहे. ग्रामीण व आदिवासी भागातून रुग्ण या ठिकाणी उपचार घेण्यासाठी येतात. रुग्णालयात गेल्या वर्षभरात एक्स-रे सीटीस्कॅन आणि सोनोग्राफी तपासण्यांमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. महिन्याला दहा हजार एक्स-रे, सहा हजार सोनोग्राफी, तर पंधराशेवर सीटीस्कॅन केल्या जात असल्याची माहिती रेडिओलॉजिस्ट डॉ. मंगेश थेटे यांनी दिली.

जिल्हाभरातील कोनाकोपऱ्यातून येणाऱ्या गोरगरीब रुग्णांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयांतील विविध तपासण्या डिजिटल यंत्रणांच्या माध्यमातून केल्या जात असल्याने त्यांच्या आजाराचे निदान लवकर होत आहे. तसेच, त्यांना या तपासण्यांमार्फत उपचारास मदत मिळत आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयातील सीटी स्कॅन सोनोग्राफी व एक्स-रेच्या सुविधांचा लाभ नाशिकमधील अनेक रुग्णांना मिळत आहे. खासगी रुग्णालयातील अवाजवी दरामुळे या महत्त्वाच्या चाचण्यांसाठी हजारो रुपये मोजावे लागतात. मात्र, आता जिल्हा शासकीय रुग्णालयात दिल्या जाणाऱ्या या सुविधेमुळे नाशिककरांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## सीटीस्कॅन यंत्रणा दहा वर्षे जुनी

जिल्हा शासकीय रुग्णालयातील सीटी स्कॅन यंत्रणेला दहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने, तसेच या यंत्रणेवर क्षमतेपेक्षा जास्त तपासण्या झाल्याने यात वारंवार तांत्रिक बिघाड येत असल्याचे चित्र आहे. यामुळे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयात नवीन सीटीस्कॅन यंत्रणा खरेदी करण्याची मागणी केली जात आहे.

## मनपाकडे एकही रेडिओलॉजिस्ट नाही

महापालिकेच्या बिटको रुग्णालयात सीटी स्कॅन व एमआरआयची सुविधा आहे, तर इतर रुग्णालयांमध्ये एक्स-रे व सोनोग्राफीची सुविधा देखील आहे. मात्र, महापालिकेकडे एकही रेडिओलॉजिस्ट नसल्याने रुग्णांना अहवाल देण्यास अडचणी येत आहेत.

> **खासगी रुग्णालयांमध्ये गोरगरीब रुग्णांना सीटीस्कॅन, सोनोग्राफी व एक्स-रेसारख्या तपासण्यांसाठी हजारो रुपये खर्च करावे लागते. मात्र, जिल्हा शासकीय रुग्णालयात या तपासण्या होत असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रुग्ण वाढलेले आहे.**
>
> **डॉ. मंगेश थेटे,** रेडिओलॉजिस्ट, जिल्हा शासकीय रुग्णालय

Hello Nashik
Page No. 4 Nov 10, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

# अतिवृष्टीमुळे पिकांबरोबर विहिरींचेही झाले नुकसान

लोकमत न्यूज नेटवर्क

**येवला :** तालुक्यात २२ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीमुळे तालुक्यातील हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून त्यात विहिरींचेही नुकसान झाले होते. मात्र त्यातील २ विहिरी पूर्णपणे बुजल्या आहेत. महसूल यंत्रणेने बुजलेल्या विहिरीचा पंचनामा केला असून शासनाकडून ३५ हजार रुपयापर्यंत अनुदान दिले जाणार असल्याचे सांगितले आहे. मात्र प्रत्यक्षात अनुदान अजून मिळालेले नाही.

वाघाळा येथील भाऊसाहेब सोमासे, सायगाव येथील विश्रांती पठारे यांच्या विहिरीचे प्रत्येकी १ दीड लाखापर्यंत नुकसान झालेलं आहे. सद्यस्थितीत एक ६० फुट पर्यंतची विहीर खोदण्यासाठी सुमारे ४ ते ४.५० लाख रुपये खर्च येतो. त्यावर विद्युत पंप आदी खर्च धरला तर तो खर्च सहा ते सात लाखांच्या पुढे जातो. तुटपुंजी मदत येणार असली तरी कधी मिळणार याबद्दल स्पष्टता नाही.



संग्रहित

“

विहीर, मोटर, पाइपलाइनचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले. अजूनही चिखलातून मोटार काढू शकलो नाही. नाला बांध फुटून विहिरीत वाहून पूर्ण गाळ साचलेला आहे.

**भाऊसाहेब सोमासे, शेतकरी, वाघाळा**

अतिवृष्टीमुळे तालुक्यातील झालेल्या नुकसानीची पूर्ण नोंद घेण्यात आली आहे. दोन विहिरींचे पूर्ण नुकसान झाले आहे. शासनाच्या नियमांना अधीन राहून संबंधित शेतकऱ्यांना लवकरच नुकसान भरपाई मिळणार आहे.

**आबा महाजन, तहसीलदार, येवला**

लोकमत

# कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पूर्व विभागात काढली अतिक्रमणे

लोकमत न्यूज नेटवर्क

**इंदिरानगर :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा एक भाग म्हणून नाशिक महापालिकेच्या पूर्व विभागाने अतिक्रमणविरोधी मोहिमेला मोठा वेग दिला आहे. सलग दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या कारवाईमुळे शहरातील प्रमुख मार्ग मोकळे होत असून, वाहतुकीला मोठा दिलासा मिळाला आहे.

द्वारका-काठे गल्ली त्रिकोणी गार्डन, तपोवन लिंक रोड, अशोका मार्ग, इंदिरानगर, गुरुगोविंदसिंग महाविद्यालय परिसर, जगन्नाथ चौक, रथचक्र चौक आणि दूध बाजार या भागांत ही मोहीम राबविण्यात आली. अतिक्रमण हटविल्यानंतर या परिसरात शिस्त पुन्हा प्रस्थापित झाली असून, महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या आदेशानुसार या मोहिमेचे नेतृत्व उपायुक्त डॉ. संगीता नांदुरीकर व विभागीय अधिकारी राजाराम जाधव यांनी केले. पथक प्रमुख जीवन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरू गायधनी, अनिल लोहकरे, राजू कस्तुरे, नाना सोनवणे, प्रवीण वरखडे आदी कर्मचाऱ्यांनी कारवाई केली.



## जप्त भाजीपाला बालकांसाठी रवाना

त्यात १ लोखंडी छोटी टपरी, ७ जाहिरात बोर्ड, १ पोल बॅनर, ५ स्टँड बोर्ड, १८ प्लास्टिक कॅरेट, १ वजन काटा, २ लोखंडी टेबल, प्लास्टिक बादल्या, खुर्च्या, कपडे तसेच होर्डिंग्ज फ्रेम-बॅनर यांचा समावेश आहे. मोहिमेदरम्यान जप्त केलेला टोमॅटो, आलं, कोथिंबीर, कांदे, कारले, मिरची, मेथी व पुदिना यांसारख्या भाजीपाला सामाजिक उपक्रम म्हणून बालनिरीक्षण गृहांना सुपूर्द करण्यात आला.

लोकमत

# त्र्यंबकेश्वर मार्ग विस्तारावर निर्णय लागेना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** आगामी कुंभमेळ्यात नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्ता भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, परंतु या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असतांना रस्त्याच्या विस्तारीकरणाचा मार्ग सापडत नसल्याने वाहनधारकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रीय महामार्गाच्या निकषांनुसार, रस्त्याच्या मध्यभागापासून ५० मीटर मोकळा करणे आवश्यक आहे. त्यासाठी अतिक्रमणे आणि घरे काढावी लागतील. मात्र, स्थानिकांनी केवळ २५ ते ३० मीटरपर्यंतच जागा उपलब्ध करावीत, अशी मागणी व्यक्त केली आहे. रुंदीकरणाच्या बाबतीत दोन दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले होते.

## अतिक्रमण हटाव कारवाई

रविवारी (दि.९) रस्त्याच्या कामाबाबत निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात होती, मात्र कोणताही निर्णय झाला नाही. अतिक्रमणे हटविण्याची कारवाई सुरू केली होती. हा विषय मुख्यमंत्र्यांसमोर मांडला जाईल, तसेच येत्या दोन दिवसांत, गुरुवारी, यावर निर्णय होईल, अशी हमी मंत्री महाजन यांनी दिली होती.

Nashik Main
Page No. 2 Nov 10, 2025
Powered by: erelego.com

# विभागीय लोकशाही दिनाचे आज आयोजन

**नाशिक** : येथील विभागीय आयुक्त कार्यालयात सोमवारी (दि. १०) विभागीय लोकशाही दिनासह महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालय येथे सकाळी ११ वाजता होणारा विभागीय लोकशाही दिन कार्यक्रम विभागातील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात दाखल झालेली प्रकरणांबाबत तक्रारदार समाधानी नसतील तर तेच या लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल करू शकतात. पीडित महिलांनी तालुकास्तर व जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनात अर्ज केलेले असतील व त्यांच्या समस्येचे उत्तर मिळाले नसेल, त्यांनी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाच्या टोकन नंबरसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

साईमत

# राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना यांचा त्र्यंबकेश्वर कुंभमेळा पाहणी दौरा



**त्र्यंबकेश्वर। प्रतिनिधी**

रविवार दि. ९ नोव्हें. रोजी महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव राजेशकुमार मीना यांनी त्र्यंबकेश्वर येथील सिंहस्थ कुंभमेळा कामांचा पाहणी दौरा केला. रविवार असल्याने शासकीय सुट्टीनिमित्ताने कर्मचारी किंवा विविध विभागांचे प्रमुख अधिकारी हजर नव्हते. येथील सिंहस्थ कुंभमेळा तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार मीना यांनी आज त्र्यंबकेश्वर येथे पाहणी दौरा केला.

त्यांच्या समवेत नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखरसिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसिलदार गणेश जाधव, पालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल पाटील आदी अधिकारी उपस्थित

होते. या दौऱ्या दरम्यान प्रथम त्यांनी भगवान त्र्यंबकेश्वरांचे दर्शन घेतले. आगामी आगामी कुंभमेळ्याच्या नियोजना संदर्भात विविध अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कामासंदर्भात आढावा घेतला

या वेळी त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे विश्वस्त कैलास घुले, पुरुषोत्तम कडलग, मनोज थेटे, स्वप्नील शेलार आदिंनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करुन मंदिर परिसरातील सुविधा व चालू कामांची माहिती दिली. दरम्यान मुख्य सचिवांनी कुंभमेळ्याच्या नियोजन, वाहतूक व्यवस्था सुरक्षा स्वच्छता व भाविकांसाठी आवश्यक सुविधांचा सखोल आढावा घेतला व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यानंतर त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या वतीने राज्याचे

प्रधान सचिव राजेशकुमार मिणा, विभागिय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखरसिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसिलदार गणेश जाधव पाटील आदींचा देवस्थान ट्रस्ट तर्फे विश्वस्तांनी सत्कार केला.

लोकमत



# सोमवारी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन

**नाशिक :** येथील विभागीय आयुक्त कार्यालयात सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ रोजी विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विभागीय महसूल अपर आयुक्त जितेंद्र वाघ यांनी दिली आहे. नाशिक रोड येथील विभागीय आयुक्त कार्यालय येथे सकाळी ११ वाजता होणारा विभागीय लोकशाही दिन कार्यक्रम विभागातील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हास्तरावरील लोकशाही दिनात दाखल झालेली प्रकरणांबाबत तक्रारदार समाधानी नसतील तर तेच या लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल करु शकतात. विभागीय महिला लोकशाही दिनदरम्यान, याच वेळेस विभागीय महिला लोकशाही दिनाचेही आयोजन करण्यात आले आहे. महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेद्वारे सोडवणूक करण्यासाठी या दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वी ज्या समस्याग्रस्त व पीडित महिलांनी तालुकास्तर व जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनात अर्ज केलेले असतील व त्यांच्या समस्येचे उत्तर मिळाले नसेल, त्यांनी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे टोकन नंबरसह त्यांचे अर्ज दिनांक १० नोव्हेंबर रोजी विभागीय महिला लोकशाही दिनात सकाळी ११ वाजता सादर करावेत, असे आवाहन चंद्रशेखर पगारे, विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास विभाग, नाशिक यांनी केले आहे.

सार्वमत

# कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करावे

## » मुख्य सचिव राजेशकुमार यांची त्र्यंबकेश्वर येथे भेट

।नाशिक । प्रतिनिधी।

**नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणारा आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे सूक्ष्म नियोजन करावे. त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांना येण्यासाठी आणि जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असाव्यात, अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या आहेत. मुख्य सचिव राजेश कुमार दोन दिवस नाशिक जिल्हा दौऱ्यावर असून त्यांनी रविवारी सकाळी त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा विकास कामे तसेच त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली.**



यावेळी विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, मंदिराचे विश्वस्त यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेशकुमार यांनी सांगितले की, कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व भाविकांची गर्दी लक्षात घेता सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच साधू, संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयीसुविधा वेळेत उपलब्ध होतील. तसेच आरोग्याच्या पुरेशा सुविधा व आपत्ती निवारणाची सुविधा

त्याचबरोबर विविध बाजूंनी त्र्यंबकेश्वर कडे येणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, पार्किंगसाठी लागणारी जागा, नदी किनारी बांधण्यात येणारे घाट आदि कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येणारी कामे वेळेत सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्यात.

यावेळी कुंभमेळ्यानिमित्त त्र्यंबकेश्वर शहर व परिसरात सुरू असलेली कामे, नियोजित कामे, कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येत असलेले नियोजन याबाबत विभागीय आयुक्त डॉ. गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी माहिती दिली.

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
10 Nov 2025 - Page 5

# कुंभ मेला सुरक्षा के लिए भीड़ प्रबंधन की योजना बनाई जाए :राजेश कुमार

## त्र्यंबकेश्वर में कुंभ मेला विकास कार्यों का मुख्य सचिव ने किया निरीक्षण

महानगर नेटवर्क

त्र्यंबकेश्वर

त्र्यंबकेश्वर में आयोजित होने वाले आगामी कुंभ मेले को सुरक्षित बनाने के लिए श्रद्धालुओं की भीड़ के प्रबंधन हेतु सावधानीपूर्वक योजना बनाई जाए। त्र्यंबकेश्वर में कुंभ मेला विकास कार्यों का राज्य के मुख्य सचिव राजेश कुमार ने निरीक्षण किया। मुख्य सचिव ने निर्देश दिए हैं कि त्र्यंबकेश्वर आने वाले श्रद्धालुओं के लिए अलग-अलग मार्ग बनाए जाएँ। मुख्य सचिव राजेश कुमार नाशिक जिले के दो दिवसीय दौरे पर हैं और आज सुबह उन्होंने त्र्यंबकेश्वर में कुंभ मेला विकास कार्यों के साथ-साथ त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष और कुशावर्त परिसर का दौरा कर उनका निरीक्षण किया। इस अवसर पर संभागीय आयुक्त एवं नाशिक



त्र्यंबकेश्वर कुंभ मेला विकास प्राधिकरण के अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिला कलेक्टर आयुष प्रसाद, पुलिस अधीक्षक बालासाहेब पाटिल, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगर परिषद के मुख्य अधिकारी राहुल पाटिल, मंदिर के न्यासी एवं विभिन्न विभागों के अधिकारी उपस्थित थे। मुख्य सचिव राजेश कुमार ने कहा कि कुंभ मेले की पृष्ठभूमि में त्र्यंबकेश्वर में उपलब्ध स्थान और श्रद्धालुओं की भीड़ को ध्यान में रखते हुए गहन योजना बनाना आवश्यक है। श्रद्धालुओं को किसी प्रकार की असुविधा न हो, इसका ध्यान रखा जाए और साधु-संतों, महंतों एवं श्रद्धालुओं के लिए आवश्यक मूलभूत सुविधाएँ समय पर उपलब्ध हों। साथ ही पर्याप्त स्वास्थ्य सुविधाएँ एवं आपदा राहत सुविधाएँ भी उपलब्ध हों। उन्होंने कुंभ मेले के अवसर पर किए जाने वाले कार्यों, जैसे त्र्यंबकेश्वर तक विभिन्न ओर से पहुँचने वाले मार्गों का सुदृढ़ीकरण, पार्किंग के लिए आवश्यक स्थान, नदी तटों पर बनाए जाने वाले घाट आदि को समय पर शुरू करने और उन्हें यथाशीघ्र पूरा करने के निर्देश भी दिए। इस अवसर पर संभागीय आयुक्त डॉ. गेडाम और कुंभ मेला आयुक्त शेखर सिंह ने त्र्यंबकेश्वर शहर और उसके आसपास चल रहे कार्यों, नियोजित कार्यों, कुंभ मेले की योजना आदि के बारे में जानकारी दी।

हमारा महानगर
epaper.hamaramahanagar.net
10 Nov 2025 - Page 5

# सोमवार को संभागीय लोकशाही दिवस का आयोजन

**नाशिक।** संभागीय राजस्व अपर आयुक्त जितेंद्र वाघ ने बताया है कि सोमवार, 10 नवंबर, 2025 को यहां संभागीय आयुक्त कार्यालय में संभागीय लोकशाही दिवस का आयोजन किया गया। नासिक रोड स्थित संभागीय आयुक्त कार्यालय में सुबह 11 बजे आयोजित होने वाले संभागीय लोकशाही दिवस कार्यक्रम का आयोजन विभाग के सभी विभागाध्यक्षों की उपस्थिति में किया गया है। यदि शिकायतकर्ता जिला स्तरीय लोकशाही दिवस में दर्ज मामलों से संतुष्ट नहीं हैं, तो वे इस लोकशाही दिवस में आवेदन दे सकते हैं। इसी दौरान, संभागीय महिला लोकशाही दिवस का भी आयोजन किया गया। यह दिवस महिलाओं की शिकायतों और समस्याओं का सरकारी व्यवस्था के माध्यम से समाधान करने के लिए आयोजित किया गया है। महिला एवं बाल विकास विभाग, नासिक के विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे ने उन समस्याग्रस्त और पीड़ित महिलाओं से अपील की है, पहले तालुका और जिला स्तर पर महिला लोकशाही दिवस के लिए आवेदन किया है और उन्हें अपनी समस्याओं का समाधान नहीं मिला है, वे जिला स्तरीय महिला लोकशाही दिवस के टोकन नंबर के साथ अपना आवेदन 10 नवंबर को सुबह 11 बजे विभागीय महिला लोकशाही दिवस में जमा करें।

दै.दिव्य मराठी

दि.१० नोव्हेंबर,२०२५

# कळवणला २३ हजार शेतकऱ्यांचे नुकसान

## महसूल आणि कृषी विभागाकडून १३,६१६ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे पूर्ण

प्रतिनिधी | कळवण

अवकाळी पावसामुळे तालुक्यातील २३००० शेतकऱ्यांचे १३,६१६ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे महसूल आणि कृषी विभागाने पंचनामे केले आहेत. शेतकऱ्यांना भरघोस मदतीची अपेक्षा आहे.

सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदतीची अपेक्षा शासनाकडे होती. शासनाने तातडीने कृषी विभाग, महसूल विभाग, पंचायत समिती ग्रामविकास अधिकारी यांना आदेश करत नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश केले होते.



पंचनामे करतांना अधिकारी कर्मचारी, आमदार, कृउबा सभापती.

### पिकांचे नुकसान

- मका : ७५७८ हेक्टर,
- सोयाबीन : २२८७ हेक्टर,
- कांदा रोप : ३०३० हेक्टर,
- इतर पिके : ७२१ हेक्टर

एकूण : १३६१६ हेक्टर क्षेत्र

### बांधावर जाऊन पंचनामे

एखादा शेतकरी पंचनामे करण्याचा राहिला असेल तर त्यांनी कृषी विभागाशी तसेच तलाठी आणि ग्रामसेवक यांचेशी संपर्क करावा.
– वाल्मिक प्रकाश, कृषी अधिकारी

### तात्काळ मदत द्यावी

पावसामुळे शेतात उभ्या मका पिकाचे आणि उन्हाळ कांदा रोपाचे मोठे नुकसान झाले आहे. कांद्याचे रोप तर भुईसपाट झाले आहे. आता उन्हाळ कांदा लागवडीचे मोठे संकट उभे राहिले असून गेल्या दोन वर्षापासून अवकाळी पावसाचे प्रमाण वाढल्याने दरवर्षी शेतीला फटका बसत आहे. त्यामुळे शासनाने ठोस उपाययोजना करावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत करून उभे करावे.
– नारायण पवार, शेतकरी.

**दिव्य मराठी एक्सक्लुझिव्ह** ४८ विभागांमध्ये ९,६३३ कोटींची विकासकामे प्रस्तावित

# कुंभमेळ्यासाठी संभाजीनगर, खुलताबाद, पैठण पालिकेला ४ हजार कोटींचा प्रस्ताव

## नाशिकहून १८ लाख भाविक येणे अपेक्षित, त्यासाठी ४ महामार्गांवर १३० हेक्टरची पार्किंग

ऋषिकेश कीर्तने | छत्रपती संभाजीनगर

नाशिकला सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मध्ये होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नाशिकला २५,०५५ कोटी रुपये देण्याची घोषणा केली आहे. कुंभमेळ्यादरम्यान नाशिकहून कुंभमेळ्याच्या दर्शनासाठी भाविक येतील असे गृहीत धरून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी ९,६३३.५ कोटी देण्याचे नियोजन केले जात आहे. वेरूळ, पैठण, आपेगाव, [illegible] परिसरातून सुविधांवर निधी खर्च होणार आहे. [illegible] यांनी घोषणा केली होती. या कामांचा सविस्तर प्रस्ताव 'दिव्य मराठी'च्या हाती आला आहे. एकूण ४८ विभागांत हा खर्च केला जाईल. विशेष म्हणजे नाशिकच्या तुलनेत संभाजीनगरला मिळालेला निधी ३८ टक्के आहे. मनपा, पैठण, खुलताबाद नगरपालिकेला सर्वाधिक ४,०११.१८ कोटी निधी प्रस्तावित आहे. त्यात पैठणला तर ९९६ कोटी देण्याचा विचार आहे. [illegible] 'विकास' केला जाणार आहे.

### वेरूळ येथील प्रस्तावित कामांचा तपशील (निधी कोटींमध्ये)

| विभागाचे नाव | २०२५-२६ निधी | काय काम करणार |
|---|---|---|
| सा.बां. विभाग | १,४०९.६३ | रस्ते-इमारत दुरुस्ती, पार्किंग, विद्युत व्यवस्था |
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ५०.५५ | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ड्रेनेजलाइन |
| महानगरपालिका | ३१.३२.३२ | रस्ते दुरुस्ती, ड्रेनेज, [illegible], नवीन रस्ते, पार्किंग |
| अन्न-प्रशासन प्रयोगशाळा | ३९.२१ | भोजनाचा दर्जा तपासणी करणे, इतर साहित्य खरेदी |
| नगरपालिका खुलताबाद | ५०४.८१ | स्वच्छता, कचरा [illegible], स्थानिक रस्ते, सेतू दुरुस्ती |
| जिल्हा परिषद | ७९.८० | ग्रामीण रस्ते, इमारती दुरुस्ती, [illegible], पार्किंग |
| पोलिस विभाग | ८८.४१ | पोलिस चौक्या, सीसीटीव्ही, वॉचटॉवर, इतर साहित्य |
| आरोग्य विभाग | १४८.३१ | छोटी हॉस्पिटल्स उभारणे, ऑपरेशन साहित्य, ॲम्ब्युलन्स |

याबाबत इतर २८ विभागांना [illegible] ७१२१.२४ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला.

### पैठण, आपेगाव येथील प्रस्तावित कामांचा तपशील (निधी कोटींमध्ये)

| विभागाचे नाव | २०२५-२६ निधी | काय काम करणार |
|---|---|---|
| सा.बां. (विद्युत, बांधकाम) | ४९३.८५ | रस्ते, इमारती दुरुस्ती, विद्युत व्यवस्था |
| पर्यटन विकास महामंडळ | ३३.२० | टुरिझम माहिती केंद्र, साइन, पर्यटनाची माहिती |
| महावितरण | ६३.६० | विद्युत दुरुस्ती, विद्युत व्यवस्था |
| नगरपालिका पैठण | ९९६.०६ | स्थानिक रस्ते, पाणी व्यवस्था, विद्युत, ड्रेनेज |
| आपेगाव ग्रामपंचायत | १११.५० | रस्ते, शौचालय, पाणी व्यवस्था, विद्युत, स्वच्छता |
| पोलिस विभाग | ८१.३१ | पोलिस चौक्या, सीसीटीव्ही, वॉचटॉवर |
| आरोग्य विभाग | ७५.८१ | छोटी रुग्णालये, ॲम्ब्युलन्स, मेडिकल व्यवस्था |
| जलसंपदा पाटबंधारे | १०६.५० | पाटबंधारे दुरुस्ती, नदी, कॅनॉल दुरुस्ती |

याबाबत इतर १८ विभागांना २४०७.२२ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला.

### पुढील आठवड्यात शासनाला प्रस्ताव देऊ



नाशिकच्या कुंभमेळ्याला आलेले भाविक छत्रपती संभाजीनगरच्या वेरूळ, पैठण, आपेगावला येणे अपेक्षित आहे. त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आगाऊ कामांचे नियोजन केले आहे. त्यासाठी ९,६३३ कोटींचा प्रस्ताव तयार केला आहे. दोन दिवसांत सर्व प्रस्तावांवर चर्चा करून त्यानंतर पुढील आठवड्यात शासनाला प्रस्ताव पाठवला जाईल. कामेही तत्काळ करू.
-दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी

### वर्षभर जिल्हा, शहरात असेल भाविकांचा राबता

प्रशासनाने २०२७ च्या दरम्यान वर्षभरात १८.३५ भाविक येतील असे गृहीत धरले आहे. श्रावणात दररोज ५ लाख, ४२ सोमवारी १.५२ लाख भाविक येतील. महाशिवरात्रीला तीन दिवसांत २ लाख भाविकांचा अंदाज आहे. तर शनी अमावास्येला २५ हजारांचे नियोजन आहे.

लोकसत्ता

# त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांसाठी स्वतंत्र मार्गिकांची गरज

## मुख्य सचिव राजेशकुमार यांची सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणारा आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे सूक्ष्म नियोजन करावे. त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांना येण्यासाठी आणि जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असाव्यात, अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या आहेत.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी रविवारी सकाळी त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा विकास कामे तसेच त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली. यावेळी विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वरचे मुख्याधिकारी राहुल पाटील, मंदिराचे विश्वस्त आदी उपस्थित होते.



त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा कामांची मुख्य सचिव राजेशकुमार यांनी पाहणी केली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व भाविकांची गर्दी लक्षात घेता सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच साधू, संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयीसुविधा वेळेत उपलब्ध होतील, आरोग्याच्या पुरेशा सुविधा व आपत्ती निवारणाची सुविधा

त्याचबरोबर विविध बाजूंनी त्र्यंबकेश्वर कडे येणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, वाहनतळासाठी लागणारी जागा, नदीकिनारी बांधण्यात येणारे घाट आदि कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येणारी कामे वेळेत सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही राजेशकुमार यांनी दिल्या.

यावेळी कुंभमेळ्यानिमित्त त्र्यंबकेश्वर शहर व परिसरात सुरू असलेली कामे, नियोजित कामे, कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येत असलेले नियोजन आदींबाबत विभागीय आयुक्त डॉ. गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी माहिती दिली.

DESHDOOT Times
....watching north maharashtra

epaper.deshdoot.com
10 Nov 2025 - Page 1

# Lokshahi Din today

**NASHIK:** The Divisional Lokshahi Din is being organized today, Monday, November 10, at the office of the Divisional Commissioner, Nashik, officials said. The program has been arranged under the guidance of Divisional Revenue Additional Commissioner Jitendra Wagh.

The Divisional Lokshahi Din will commence at 11 am at the Divisional Commissioner's Office at Nashik Road. Heads of all divisions will be present to hear complaints and grievances. Citizens who are dissatisfied with cases registered at the district-level Lokshahi Din can submit their applications for reconsideration during this divisional-level program.

**Women's Lokshahi Din:**

Simultaneously, the Divisional Women's Lokshahi Din is being held to address the complaints and issues faced by women through the government system.

Chandrashekhar Pagare, Divisional Deputy Commissioner of the Women and Child Development Department, Nashik, urged women who have previously applied for Mahila Lokshahi Din at taluka or district levels and have not received resolutions, to bring their applications along with the token number issued at the district-level Mahila Lokshahi Din. The program will also start at 11 am at the Divisional level today.

Officials emphasized that these programs provide a platform for citizens, especially women, to have their grievances heard and resolved efficiently by government authorities.

**DESHDOOT** *Times*
*....watching north maharashtra*

egaper.deshdoot.com
10 Nov 2025 - Page 1

# Simhastha: Crowd safety priority

**NASHIK:** With the upcoming Simhastha Kumbh Mela in Trimbakeshwar, Nashik, just around the corner, state authorities are emphasizing meticulous planning to ensure the safety and convenience of devotees attending the grand event. Chief Secretary Rajesh Kumar, during his two-day visit to Nashik district, stressed the importance of proper crowd management and infrastructure preparedness.

On Sunday morning, Rajesh Kumar visited key locations in Trimbakeshwar, including the ongoing Simhastha development projects, the Trimbakeshwar temple premises, Darshan routes, the control room, and the Kushavarta area, to inspect preparations for the Mela.



He instructed that separate entry and exit routes must be established for devotees to ensure smooth movement and prevent overcrowding. The Chief Secretary further emphasized that the planning must take into account the available space at Trimbakeshwar as well as the expected influx of pilgrims from across the country.

"Devotees should not face any inconvenience during their visit. All essential facilities for sadhus, saints, mahants, and the general public must be made available on time," Rajesh Kumar said. He added that adequate health services, disaster relief measures, and emergency response systems should be in place. Additionally, the Chief Secretary called for the timely strengthening of approach roads, development of parking areas, and construction of ghats along the riverbanks to accommodate the massive gatherings.

> "All basic facilities for sadhus, saints, mahants, and devotees must be provided on time. Health services, disaster relief systems, and emergency response arrangements must be fully prepared. Additionally, approach roads, parking areas, and ghats along the riverbanks must be strengthened and completed promptly. Our collective focus must be on making the Simhastha a safe, organized, and memorable experience for all attendees."
>
> *- Chief Secretary Rajesh Kumar*

During the inspection, Divisional Commissioner and Chairman of the Nashik Trimbakeshwar Kumbh Mela Development Authority, Dr. Praveen Gedam, along with Simhastha Commissioner Shekhar Singh, District Collector Ayush Prasad, Superintendent of Police Balasaheb Patil, Tehsildar Ganesh Jadhav, Chief Officer of Trimbakeshwar Municipal Council Rahul Patil, temple trustees, and officers from various departments were present.

Dr. Gedam and Commissioner Singh provided detailed briefings on the ongoing development works, plans for crowd management, and overall preparations for the smooth conduct of the Kumbh Mela. The officials highlighted that multiple initiatives are being undertaken to ensure that the historic event is organized safely and efficiently for all devotees visiting Trimbakeshwar.

**DESHDOOT** *Times*

*....watching north maharashtra*

epaper.deshdoot.com
10 Nov 2025 - Page 1

# Rising human-leopard conflict in district


**VIJAY GITE**

**NASHIK:** The movement of leopards into human settlements in Nashik district has been steadily increasing, leading to a sharp rise in human-leopard conflicts. Experts cite reduction in forest areas and habitat destruction as the primary reasons behind leopards venturing into villages in search of prey.

In the last five years, the district has witnessed 32 human deaths and 46 serious injuries due to leopard attacks. Livestock losses have been substantial, with 7,018 animals killed or injured, and 279 farmers suffering major crop losses.

**Cattle farmers worst hit:** Cattle farmers have borne the brunt of leopard attacks. In the Nashik East Division, 4,437 livestock were killed or injured, while 2,581 animals were affected in the West Division. The Forest Department has provided compensation totaling Rs 6.70 crore to affected cattle owners.

**Crop damage:** Leopard movement has also caused significant damage to standing crops. In total, 279 farmers' fields were destroyed—185 in the east and 94 in the west.



Assistance amounting to Rs 37.63 lakh has been provided by the Forest Department.

**Human casualties:** Human casualties have also seen a worrying rise. From 2021 to 2025, 32 people lost their lives and 46 were seriously injured. Compensation totaling Rs 6.52 crore has been disbursed to the families of the deceased and the injured.

**Human casualties in leopard attacks**

| Year | Deaths | Injuries |
|---|---|---|
| 2021 | 6 | 6 |
| 2022 | 5 | 6 |
| 2023 | 5 | 8 |
| 2024 | 7 | 15 |
| 2025 | 9 | 11 |
| **Total** | **32** | **46** |

## Rescue and prevention efforts

The Forest Department has intensified measures to prevent conflicts. In the last four years, 273 leopards were rescued, and 86 cubs and mother leopards were successfully reunited. Trained teams, drones, and cages are being used to track and manage leopards that pose a threat to humans.

Forest experts warn that with shrinking forest areas and habitat destruction, long-term solutions are needed to balance leopard conservation and human safety. "Leopards are a vital part of the natural ecosystem. Our challenge is to protect them while ensuring the safety of residents," said a senior Forest Department official.

दै.लोकमत टाईम्स

दि.१० नोव्हेंबर २०२५

LOKMAT TIMES

# State Chief Secretary Rajesh Kumar reviews Kumbh works

## Stresses on meticulous planning for crowd management



**Lokmat News Network**
TRIMBAKESHWAR, NOV 9

Meticulous planning must be done to efficiently manage the crowds of devotees arriving for the upcoming Kumbh Mela at Nashik-Trimbakeshwar to ensure the smooth and safe conduct of the mega event. Separate routes should be provided for devotees arriving at and departing from Trimbakeshwar, instructed Maharashtra Chief Secretary Rajesh Kumar.

Chief Secretary Kumar is on a two-day tour of Nashik district. He reviewed the ongoing Kumbh Mela development works at Trimbakeshwar on Sunday morning, November 9, including the temple premises, the darshan routes, the control room, and Kushavart.

Divisional Commissioner and Chairman of the Nashik-Trimbakeshwar Kumbh Mela Development Authority Dr Praveen Gedam, Kumbh Mela Commissioner Shekhar Singh, District Collector Ayush Prasad, Superintendent of Police Balasaheb Patil, Tehsildar Ganesh Jadhav, Chief Officer of Trimbakeshwar Municipal Council Rahul Patil, temple trustees, and officials from various departments were present during the visit.

Chief Secretary Kumar said that, considering the available space at Trimbakeshwar and the expected influx of devotees, meticulous planning is essential. "There should be no inconvenience to devotees, and all necessary facilities for sants, sadhus, mahants, and pilgrims should be ready on time," he directed. He also stressed on ensuring adequate health and disaster management facilities.

He further instructed officials to strengthen approach roads leading to Trimbakeshwar from various directions, allocate sufficient parking areas, and complete the construction of ghats along the riverbank and other works related to the Kumbh Mela within the stipulated time. Divisional Commissioner Dr Gedam and Kumbh Mela Commissioner Shekhar Singh also briefed the Chief Secretary about the ongoing and planned development works and the overall preparations for the upcoming Kumbh Mela, during the visit.

LOKMAT TIMES

# Kumbh Mela: NMC seeks nod for 41 more road projects

**LOKMAT NEWS NETWORK**
NASHIK, NOV 9

The Simhastha Authority has granted administrative approval of ₹ 950 crore for 18 road works proposed by the Nashik Municipal Corporation (NMC), and the tender process for these projects has reached its final stage. With only a few months left for Simhastha Kumbh Mela, the Public Works Department has sent a proposal to the Authority seeking approval for another 41 road works to ensure timely completion of infrastructure development work.

The NMC had prepared a comprehensive Simhastha Action Plan worth ₹ 15,172.42 crore and submitted it to the state government. In this plan, the largest financial allocation has been made for roads by the PWD. However, the Authority directed both the NMC and the Police Commissionerate to determine priority routes based on traffic movement and connectivity needs, and submit a detailed report.

> The tender process for 18 prioritised road works has been completed, and financial bids are set to be opened soon. A letter has been sent to the Simhastha Authority seeking approval for the remaining road projects.
>
> **- Sanjay Agrawal,**
> City Engineer, NMC

Accordingly, the police administration prepared and submitted a report listing 59 key roads in the city. Out of these, 18 projects worth ₹ 950 crore have already received administrative approval in the first phase, paving the way for the tender process. The NMC has since initiated this process, and the financial bids will be opened in the next two days to finalise the contractors.

Nashik First
Page No. 1 Nov 10, 2025
Powered by: erelego.com

LOKMAT TIMES

# Direction boards on highway in disrepair

## Locals urge NHAI and Nashik civic body to look into this matter

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 9

Several direction boards between Amrutdham and Adgaon on the Mumbai-Agra National Highway are in a poor state, causing confusion among motorists and visitors. Locals from Adgaon have demanded that the National Highways Authority of India (NHAI) and the Nashik Municipal Corporation (NMC) take immediate action to repair and reinstall the damaged signs.

During the last Kumbh Mela, large direction boards had been installed along the Amrutdham-Adgaon stretch to guide pilgrims and tourists. However, most of these have now either faded, fallen, or broken. The condition of the board at Amrutdham Square particularly exposes the civic body's neglect, residents said. Due to unclear or missing signage, out-of-town travellers and tourists often get confused.

As there are no direction boards showing local destinations such as Nashik Road, Jatra Chowk, Parkside City, or Bali Mandir after Adgaon D-Mart, vehicles coming from the Dhule side often continue straight over the flyover or stop in the middle of the highway and service road to ask for directions. This has led to several rear-end collisions.

Residents from Adgaon, Konark Nagar, Nandur Naka Link Road, Nashik Road, and Amrutdham have urged NHAI and NMC to install clear direction boards from Adgaon to Bali Mandir on the Mumbai-Agra highway showing routes to key suburbs.



> I wanted to go to Nashik Road, but after crossing the Adgaon D-Mart flyover, there was no board showing directions towards Nashik Road or Pune. I ended up reaching Dwarka Chowk by mistake.
>
> **- Hemant Walhe,** Motorist from Dhule

> A direction board towards Nashik Road must be installed on the highway near Adgaon D-Mart. Because of missing signage, vehicles headed to Nashik Road or Bali Mandir go straight over the flyover.
>
> **- Vijay Pelmahale,** Adgaon

**Four years of neglect**

Locals said the main direction board at Amrutdham Square has been in poor condition for the last four years. The sign near Jain Temple, Adgaon, which indicated the route to Dwarka, was removed during roadwork on the service road and has not been reinstalled since.

गांवकरी
www.gavakari.net
10 Nov 2025 - Page 9



# सिंहस्थ कुंभमेळा तयारीची मुख्य सचिवांकडून पाहणी

## नियोजनासंदर्भात विविध अधिकाऱ्यांशी चर्चा

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर- नाशिक सिंहस्थ कुंभमेळा तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव राजेशकुमार मिना यांनी रविवारी (दि. ९) त्र्यंबकेश्वर येथे पाहणी दौरा केला.

येथील भेटीत त्यांनी भगवान त्र्यंबकराजाचे दर्शन घेतले. आगामी कुंभमेळ्याच्या नियोजनासंदर्भात शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव आणि मुख्याधिकारी राहुल पाटील उपस्थित होते. त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे विश्वस्त कैलास घुले, पुरुषोत्तम कडलग, स्वप्नील शेलार यांनी स्वागत करून मंदिर परिसरातील सुविधा व चालू कामांची माहिती दिली. मुख्य सचिवांनी कुंभमेळ्याच्या नियोजन, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा, स्वच्छता व भाविकांसाठी आवश्यक सुविधांचा सखोल आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. दरम्यान, मंदिर ते कुशावर्त या रस्त्याने सर्व अधिकाऱ्यांनी चालत जाऊन पाहणी केली. येथे होत असलेल्या कॉरिडॉरबाबत माहिती जाणून घेतली व आवश्यक त्या सूचना केल्या. मंदिराच्या संदर्भात निर्माण करण्यात येणारा कॉरिडॉर, शाहीस्नान अथवा अमृतस्नान यासाठी असलेला कुशावर्त घाट, शाही मिरवणुकांचे मार्ग, मेनरोड शाहीमार्ग व त्यांचे मजबुतीकरण आणि रुंदीकरण याबाबत शासनाच्या संबंधित विभागांनी लक्ष केंद्रित करणे या कामांना प्राधान्य देण्याची शासनाची मानसिकता असल्याचे झालेल्या चर्चेने स्पष्ट झाले. आपत्ती व्यवस्थापन करताना शासन यंत्रणा कोणतीही जोखीम स्वीकारण्यास तयार नाही. वेळप्रसंगी कठोर निर्णय घेतले जातील. नागरिकांनी सहकार्य करावे, अशी भावना संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

गांवकरी
www.gavakari.net
10 Nov 2025 - Page 2

# सिद्धपिंप्रीत बिबट्यांचा वावर; भीतीचे वातावरण

## ग्रामपंचायतीकडून पाच पिंजऱ्यांची मागणी

**सिद्धपिंप्री : प्रतिनिधी**



नाशिक तालुक्यातील पूर्व भागातील सिद्धपिंप्री गाव बिबट्याच्या दहशतीखाली आहे. आतापर्यंत चार ते पाच बिबटे पकडले; परंतु ते एका ठिकाणाहून पकडून दुसऱ्या ठिकाणी सोडून दिले जातात. यामुळे बिबट्यांची संख्या कमी होत नाही. परिसरात लहान मुलांपासून सर्वच माणसांवर बिबट्याचे हल्ले चालू आहेत. या पार्श्वभूमीवर बिबट्याच्या बंदोबस्तासाठी सिद्धपिंप्री ग्रामपंचायतीने वन विभागाकडे पाच पिंजऱ्यांची मागणी केली आहे.

सिद्धपिंप्री परिसरात दहा ते बारा बिबटे असून, नागरिकांना रात्रीच्या वेळी बाहेर पडता येत नाही. कित्येक लहान मुले पहाटे पाचला शाळेत जात असतात. त्यामुळे या मुलांचे जीवन धोक्यात असल्यामुळे परिसरात भीती व्यक्त करण्यात येत आहे. शंभर ते दीडशे एकर जागेवर वनीकरण असून, परिसरात बिबट्यांचे वास्तव्य आहे. परिसरातील कुत्रे, लहान पाळीव प्राणी यांचे जीवनही धोक्यात आले आहे. मध्यंतरी मानवी वस्तीत बिबट्याचा वावर दिसत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने गावासाठी पाच पिंजऱ्यांची मागणी केल्याचे सरपंच भाऊसाहेब ढिकले यांनी सांगितले. गावासह परिसरात दहा ते बारा बिबटे असून, ते एकत्रित रात्री कुत्रे, मांजर किंवा इतर पाळीव प्राण्यांची शिकार करतात. त्यांचा तत्काळ बंदोबस्त करून भीतीचे वातावरण कमी करावे. शासनानेदेखील याचा विचार करून दिसेल त्यावेळी बिबट्या मारण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य किरण ढिकले यांनी केली आहे.

दै.नवभारत

दि.१० नोव्हेंबर २०२५

ePaper
नवभारत Nashik | 10 November 2025 | Page 4

# गुणवत्तापूर्ण हो कुंभ मेले का काम

## प्रधान सचिव राजेश कुमार मीणा का त्र्यंबकेश्वर में अधिकारियों को निर्देश

### कुशावर्त तीर्थ पर भी दर्शन कर की समीक्षा

■ त्र्यंबकेश्वर, (सं.) प्रधान सचिव राजेश कुमार मीणा ने त्र्यंबकेश्वर में सिंहस्थ कुंभ मेले के प्रशासनिक अधिकारियों को निर्देश दिया कि, चूंकि समय अवधि कम है, इसलिए ध्यान दें कि सभी काम समय पर और गुणवत्तापूर्ण तरीके से पूरे हों. रविवार सुबह 10 से 11 बजे के बीच प्रधान सचिव राजेश कुमार मीणा ने त्र्यंबकेश्वर का दौरा किया. उन्होंने ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर मंदिर में दर्शन किए.

मंदिर परिसर के साथ-साथ कुशावर्त तीर्थ पर भी दर्शन कर जायजा लिया और चल रहे कार्यों की समीक्षा की. उन्होंने अधिकारियों को निर्देश दिया कि जिस दर्शन पथ कॉरिडोर का निर्माण किया जा रहा है, वहां से मंदिर में जाने वाले श्रद्धालुओं को बाहर निकलते समय भीड़भाड़ (जाम) का सामना न करना पड़े. उन्होंने त्र्यंबकेश्वर मंदिर में अभिषेक और आरती भी की.



### विभिन्न योजनाओं के संबंध में भी की चर्चा

प्रधान सचिव मीणा ने कहा कि कुंभ मेले के कार्यों के लिए अब केवल 16 महीने बचे हैं. उन्होंने विभिन्न योजनाओं के संबंध में भी चर्चा की. इस अवसर पर संभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभ मेला आयुक्त शेखर सिंह, जिलाधिकारी आयुष प्रसाद, पुलिस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) बालासाहब पाटील, और मुख्य अधिकारी राहुल पाटील उपस्थित थे.



### पुरोहित संघ ने मीणा को दिया मेले में आने का निमंत्रण

- त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्ट की ओर से ट्रस्टी कैलास घुले, पुरुषोत्तम कडलग और स्वप्नील शेलार, साथ ही मनोज थेटे ने अतिथियों का स्वागत किया और मंदिर परिसर की सुविधाओं और चल रहे कार्यों की जानकारी दी. उन्होंने सचिव के ध्यान में लाया कि पुरातत्व विभाग विकास कार्यों में बाधा डाल रहा है.
- पुरोहित संघ की ओर से सचिव को त्र्यंबकेश्वर कुंभ मेले में आने का निमंत्रण भी दिया गया.
- मुख्य सचिव ने कुंभ मेले की योजना, यातायात व्यवस्था, सुरक्षा, स्वच्छता और श्रद्धालुओं के लिए आवश्यक सुविधाओं का गहन जायजा लिया और संबंधितों को निर्देश दिए. इस दौरान तहसीलदार गणेश जाधव और प्रशासन के कुछ अधिकारी उपस्थित थे.
- नगर पालिका अभियंता काकड और देवस्थान के अधिकारी भी मौजूद थे. डीवायएसपी देसले और सहकारी कुलकर्णी ने इस दौरान पुख्ता सुरक्षा व्यवस्था बनाए रखी थी.

दै.आपलं महानगर

दि.१० नोव्हेंबर २०२५


आपलं महानगर | माय महानगर.com

# सिग्नल तोडला तर आता २ तास प्रशिक्षण

## बेशिस्त चालकांवर सिग्नलवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांव्दारे ऑनलाईन ई-चलान देत होणार कारवाई

**नाशिक ।** शहरातील जे वाहनचालक वाहतूक नियमांचे पालन करणार नाहीत त्यांना एकत्रित करून ट्रॅफिक एज्युकेशन पार्क मुंबईनाका याठिकाणी वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी २ तासांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर सिग्नलवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांव्दारे ऑनलाईन ई-चलानव्दारे कारवाई करण्यात येणार आहे. जे वाहनचालक वाहतूक नियमांचे उल्लंघन करतील त्यांच्यावर पोलीस व आरटीओमार्फत वेळोवेळी विशेष मोहीम राबवून दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

नागरिकांच्या वाहतुकीसंदर्भात व बेशिस्त रिक्षाचालकांचा उपद्रव वाढल्याने नागरिकांना सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशाने व वाहतूक विभागाच्या उपायुक्त किरीतिका सी. एम. व सहायक पोलीस आयुक्त अट्टिा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नाशिक शहरात विशेष मोहीम राबवण्यात आली. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



### या क्रमांकावर करा तक्रार

वाहतूकसंदर्भात तक्रारी असल्यास नागरिकांनी सीपी व्हाट्सअ‍ॅप क्र. ९९२३३२३३११ वर किंवा आपली तक्रार सादर करू शकतात.

### ८१९ रिक्षाचालकांवर कारवाई, २५ रिक्षा स्क्रॅप



पोलिसांनी विशेष मोहिमेअंतर्गत बेशिस्त रिक्षाचालक व मालकांवर बीएनएस २८५ प्रमाणे १०३ गुन्हे, एमव्हीए नुसार ६०३ जणांवर खटले दाखल करून एकूण ८१९ रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे. आरटीओ व वाहतूक विभाग संयुक्त कारवाईमध्ये ११८ रिक्षांवर कारवाई करण्यात आली असून, २५ रिक्षा स्क्रॅप करण्यात आल्या आहेत. तसेच, एमव्हीएनुसार ईचालनव्दारे रिक्षा व इतर वाहनांवर २७४५ केसेस व ४८ लाख ७४ हजार ८५० रुपये दंड ऑनलाईन स्वरूपात आकारण्यात आला आहे.

### या कारणांमुळे वाहतूक समस्या

नाशिक शहरातील बेशिस्त वाहनचालक हे सिग्नल जंप करणे, स्टॉपलाईनवर न थांबणे, विरूध्द दिशेने वाहन चालविणे, सिटबेल्ट न लावणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे, ट्रिपलसिट बसणे, रिक्षाचालकांनी जादाप्रवासी वाहतूक करणे, युनिफॉर्म न घालणे, लायसेन्स व परवाना सोबत न बाळगणे, काळी फिल्मचा काचेवर वापर करणे, फॅन्सी नंबर प्लेट लावणे, विनानंबर प्लेट वाहन चालविणे, कालबाह्य मुदतीचे वाहन चालविणे, वाहतुकीस अडथळा होईल असे बेशिस्तपणे रस्त्यांवर वाहन पार्क करणे यामुळे नाशिक शहरातील वाहतूक समस्या होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. सुरळीत वाहतूक व अपघात रोखण्यासाठी पोलिसांकडून विशेष मोहीम राबवली जात आहे.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

दै.पुण्यनगरी

दि.१० नोव्हेंबर २०२५

पुण्यनगरी

# सुरक्षित कुंभमेळ्यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन महत्त्वपूर्ण

## मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून त्र्यंबकेश्वरच्या कामांची पाहणी

**नाशिक :** नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षिततेसाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या. भाविकांना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र मार्गिका तयार कराव्यात, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्य सचिव राजेश कुमार दोन दिवस नाशिक जिल्हा दौऱ्यावर असून त्यांनी रविवारी (दि. ९) सकाळी त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा विकासकामे तसेच त्र्यंबकराजा मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली. यावेळी विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, मंदिराचे विश्वस्त यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्र्यंबक शहर व परिसरात सुरू असलेली कामे, नियोजित कामे, कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येत असलेले नियोजन आदीबाबत विभागीय आयुक्त डॉ. गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त सिंह यांनी माहिती दिली.



### निर्धारित वेळेत कामे मार्गी लावण्याच्या सूचना

मुख्य सचिव राजेशकुमार यांनी सांगितले की, त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व कुंभमेळ्यात होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच साधू, संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध होतील. तसेच आरोग्याच्या पुरेशा सुविधा व आपत्ती निवारणाची सुविधा, त्याचबरोबर विविध बाजूंनी त्र्यंबकेश्वरकडे येणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, वाहनतळासाठी लागणारी जागा, नदी किनारी बांधण्यात येणारे घाट आदी कामे वेळेत सुरू करून निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्यात.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

# पुण्य नगरी

# राज्यात आरटीईचा कायदा असूनही हजारो शाळांची नोंदणी रखडली

## ठाण्यात १७५, नागपुरात २५५ शाळांचा समावेश | गरजू विद्यार्थ्यांचे नुकसान व महसुलावर पाणी

▮ संघपाल गडलिंग

नागपूर : गरजू, दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरटीई अर्थात मोफत शिक्षणाचा अधिकार कायदा हक्काच्या शिक्षणाचा आधार म्हणून बघितले जाते. मात्र, काही शिक्षण संस्था चालकांनी आपल्या शाळा या कायद्याच्या कक्षात येऊ नये, म्हणून मनमानीपणे कारभार सुरू केला आहे. राज्यात हजारो शाळांनी आरटीई कायद्यात समाविष्ट होण्यासाठी नोंदणी केली नाही. त्यामुळे गरजू विद्यार्थी वंचित राहिले. त्यासिवाय शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलावरही पाणी फेरले गेले आहे. ठाण्यात १७५, नागपुरात २५५, सिंधुदुर्ग येथे २७ शाळांनी अशा प्रकारची नोंदणी केली नसल्याची आकडेवारी आहे.

मुंबई येथील शिक्षण हक्क कार्यकर्ते नितीन दळवी यांनी माहिती अधिकारात ही माहिती चव्हाट्यावर आणली. अशा प्रकारचा घोळ संपूर्ण राज्यभरात आहे. २०१३ ला आरटीई कायदा प्रत्यक्षात लागू झाला. त्यानंतर काही शाळांनी नोंदणी केली. नियमानुसार दर ३ वर्षांनी नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मात्र, त्याकडे पाठ फिरवली. बहुतांश शाळा राजरोसपणे पालकांकडून भरमसाट शुल्क घेत असून, आपले कुणी काहीही बिघडवू शकत नाही, या तोऱ्यात कायद्याला वाकुल्या फिरवत

▸▸ पान ७ वर...




### दोन वर्षांपासून 'तारीख पे तारीख'

इंग्रजी शाळांच्या या भूमिकेवरून १८ डिसेंबर २०२३ ला अशा शाळांचा वस्तुस्थितिदर्शक अहवाल सादर करण्यासंदर्भात शिक्षण खात्याने आयुक्तांना कळवले होते. त्यानंतर १७ एप्रिल २०२५ ला पुन्हा पत्र पाठवून अहवाल मागवला. दोन वर्षांपासून अहवाल न देण्यावरून खडसावले होते; परंतु दुसऱ्या पत्रानंतरही अहवाल जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सादर केला नाही.

❝ आरटीई कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर एक लाख रुपये दंड आणि प्रतिदिवस १० हजारांचा दंड आकारण्याची तरतूद आहे. १९ अटींचे पालन करावे लागते. इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटपासून स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सोयीसुविधांचा समावेश असतो. तरीसुद्धा शिक्षण विभागाकडून अशा शाळांना अभय देण्यात येत आहे.

▮ नितीन दळवी, शिक्षण हक्क कार्यकर्ते, मुंबई.

❝ अशा शाळांना १० नोव्हेंबरला शोकॉज देण्यात येईल. प्रस्ताव का दाखल करण्यात आला नाही? याचा जाब विचारून तपासणी करण्यात येणार आहे. नियमानुसार कारवाईची भूमिका आहे.

▮ निखिल भुयार, शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जि. प. नागपूर

पुण्य नगरी

# सीसीटीव्ही, खिडक्यांना जाळ्या नसल्यास परीक्षा केंद्र रद्द

## दहावी, बारावी परीक्षांसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निर्णय

**नाशिक :** दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये शिस्तबद्धता, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार सीसीटीव्ही, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, संरक्षण भिंत आणि जाळीदार खिडक्या नसलेल्या केंद्रांची मान्यता रद्द केली जाणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मंडळाने सर्व विभागीय कार्यालयांना सूचना दिल्या असून, कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष सुविधा असाव्यात, असा स्पष्ट संदेशही संबंधित शाळांना दिला आहे.

> शिक्षण मंडळाच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मी स्वतः जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक ग्रामीण व शहर भागातील केंद्रांना भेट देऊन मुख्याध्यापकांना सूचना करणार आहे. परीक्षा पारदर्शी व्हाव्यात, यासाठी शासनाने कठोर पावले उचलली आहेत.
>
> **– डॉ. सुभाष बोरसे,**
> विभागीय अध्यक्ष, शिक्षण मंडळ

### हॉल तिकीट लॉक प्रणाली लागू

**या वर्षी परीक्षा व्यवस्थापनात काटेकोरपणा आणण्यासाठी शिक्षण मंडळाने 'हॉल तिकीट लॉक प्रणाली' लागू केली आहे. या प्रणालीअंतर्गत जर केंद्रावर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना परवानगी दिली गेली, तर त्यांचे हॉल तिकीट आपोआप लॉक होईल. सीसीटीव्ही कॅमेरा चालू स्थितीत आणि प्रत्येक वर्गात असणे अनिवार्य आहे. म्हणजेच परीक्षा काळात केंद्रावर नजर ठेवली जाणार असून, कोणत्याही गैरप्रकाराला वाव राहणार नाही.**

शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या २०२६ च्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च आणि दहावीची परीक्षा दि. २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. प्रायोगिक परीक्षा जानेवारी ते फेब्रुवारीमध्ये पार पडतील. या परीक्षेच्या पार्श्वभूमीवर नाशिक विभागात नुकतीच ऑनलाइन बैठक झाली. मंडळाचे विभागीय अध्यक्ष डॉ. सुभाष बोरसे यांच्या समवेत झालेल्या बैठकीत विभागातील सर्व शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुखांशी संवाद साधला. सुरक्षित, शांत आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा ही शिक्षण मंडळाची जबाबदारी आहे. त्यामुळे भौतिक सुविधा केवळ कागदोपत्री दाखवून चालणार नाहीत; त्या प्रत्यक्षात अस्तित्वात आणि कार्यरत असणे आवश्यक आहे, अशी चर्चा बैठकीत झाली. यात प्रत्येक परीक्षा केंद्राच्या वर्गखोल्यांमध्ये जाळी असणे, सीसीटीव्ही कार्यरत असणे, पिण्याचे पाणी, स्वतंत्र स्वच्छतागृहे आणि संरक्षण भिंत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सुविधा अपुऱ्या असल्यास केंद्राला मान्यता मिळणार नाही. यासाठी जिल्हा शिक्षणाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील दक्षता समित्या प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करतील. त्यांचा अहवाल सकारात्मक आल्याशिवाय परीक्षा केंद्राला अंतिम मंजुरी दिली जाणार नाही.

पुण्य नगरी

# 'वंदे मातरम्'ला नकार देणाऱ्या शाळांची चौकशी करा!

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे शिक्षण अधिकाऱ्यांना निर्देश

**नाशिक :** 'वंदे मातरम्' या राष्ट्रभावना चेतवणाऱ्या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राज्यभरातील शाळा, महाविद्यालये आणि शासकीय कार्यालयांमध्ये सामूहिक गायनाचे आयोजन करण्यात आले. मात्र, या उपक्रमास मालेगाव येथील काही उर्दू शाळांनी नकार दिल्याने सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधित शाळांची चौकशी करण्याचे निर्देश शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले आहेत.

सदर घटनेप्रकरणी स्थानिक प्रशासन आणि शिक्षण विभाग दोघेही अंधारात असल्याचे समजते. देशभर राष्ट्रभक्तीच्या भावनेने भारलेल्या कार्यक्रमांना प्रतिसाद मिळत असताना मालेगावातील या प्रकाराची शिक्षण विभागात चर्चा सुरू झाली आहे. राज्यातील सर्व शाळांना 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या होत्या. मात्र, मालेगावमधील अनेक उर्दू शाळांनी या निर्देशांकडे दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे, तर काही शाळांनी सुट्ट्या वाढवत कार्यक्रम टाळल्याचा आरोप होत आहे. अनेक शाळा सुरू असल्या तरी तेथे 'वंदे मातरम्' गायन झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत सोमवारी प्रत्यक्ष तपासणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे अधिकारी प्रशांत डिग्रसकर यांनी सांगितले.

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी याप्रकरणी चौकशीचे निर्देश दिले आहेत. 'वंदे मातरम्' हे केवळ गीत नाही, तर ते भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे प्रतीक आहे. प्रत्येक भारतीयाने ते अभिमानाने गायला हवे. कोणी जाणीवपूर्वक याला वेगळे वळण देत असेल, तर ते योग्य नाही. मालेगावमधील कोणत्या उर्दू शाळांमध्ये 'वंदे मातरम्'चे गायन झाले नाही, याची माहिती घेऊन तपासणी करण्याचे आदेश देण्यात आल्याचे भुसे यांनी सांगितले.

### अहवाल मंत्रालयाकडे पाठवणार

सदर प्रकरणामुळे मालेगाव शहर पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. धार्मिक व सामाजिक संतुलन राखणाऱ्या शहरात अशा घटनांकडे विशेष लक्ष दिले जात आहे. शिक्षण विभागाने संबंधित शाळांची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली असून, प्राथमिक चौकशी अहवाल पुढील आठवड्यात मंत्रालयाकडे पाठवला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, बोगस शिक्षक भरती प्रकरणात गुन्हे दाखल झाले असून दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे ना. भुसे यांनी सांगितले.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# जानोरीतील पालकांचे शाळा बहिष्कार आंदोलन स्थगित

## उपक्रमशील शिक्षकांच्या पूर्ववत नियुक्तीचे शिक्षणमंत्र्यांचे आश्वासन

**दिंडोरी :** जानोरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला उपक्रमशील, तंत्रस्नेही, आधुनिक कौशल्यनिपुण शिक्षक मिळण्याच्या मागणीसाठी पालकांनी शाळा बहिष्कार आंदोलन केले. या आंदोलनात मविप्रचे संचालक प्रवीण जाधव यांनी मध्यस्थी करीत शिक्षणमंत्र्यांशी चर्चा घडवून आणली. यात शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी संवर्ग-१ या बदली धोरणाबाबत आवश्यक ते बदल करण्याबाबत तसेच शाळेला उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षकांची पूर्ववत नियुक्ती करण्याबाबतची मागणी मान्य केल्याने पालकांनी आंदोलन स्थगित केले आहे.

जानोरी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये आतापर्यंत सहा शिक्षक संवर्ग एकमधून बदलीने नियुक्त झाले आहेत. त्यापैकी पाच शिक्षक सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. अशा शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना योग्य अध्यापन होऊ शकणार नसल्याचे नमूद करीत या बदली धोरणात बदल करून किमान ५० टक्के आधुनिक, उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षक असावेत, तसेच सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावरील शिक्षकांऐवजी तंत्रस्नेही व उपक्रमशील शिक्षकांना पूर्ववत करण्याची मागणी करीत पालकांनी शत आठवड्यापासून आंदोलनात्मक पवित्रा घेतला होता.

जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत आपल्या पाल्याला शाळेत न पाठवण्याचा निर्णय पालकांनी घेतला. त्यामुळे दिवाळीच्या सुट्टीनंतर द्वितीय सत्रात शाळेतील सर्व



२१२ विद्यार्थी गैरहजर राहिल्याने शाळा विद्यार्थ्यांविना भरली. शिक्षणमंत्र्यांच्या जिल्ह्यात असा प्रकार घडल्याने याची राज्यभर चर्चा झाली. अखेर काल मविप्रचे संचालक प्रवीण जाधव यांनी मध्यस्थी करीत शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यासोबत पालकांच्या शिष्टमंडळाशी चर्चा घडवून आणली.

यावेळी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी बदली झालेले शिक्षक पूर्ववत करण्याबाबत सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्याने अखेर पालकांनी आंदोलन स्थगित केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष शरद काळे, शिक्षणतज्ज्ञ सतीश गुंजाळ, माजी सरपंच किशोर जाधव, पालक सोमनाथ कसार, आनंद शिरसाठ, नीलेश विधाते आदी शिष्टमंडळात उपस्थित होते.

> एका शाळेवर संवर्ग -१ चे किती शिक्षक जावे याचे प्रमाण असावे, ही मागणी रास्त आहे. याबाबत ग्रामविकास विभागाशी पत्रव्यवहार केला असून लवकरच धोरणात्मक बदल करण्यात येईल. जानोरी शाळेत उपक्रमशील व तंत्रस्नेही शिक्षकांची पूर्ववत नियुक्ती करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले आहे.
>
> – दादा भुसे, शालेय शिक्षणमंत्री

> संवर्ग १ च्या बदली धोरणाबाबत जानोरी जिल्हा परिषद शाळेच्या पालकांनी केलेल्या आंदोलनाला यश मिळाले. या धोरणात बदल करण्याबाबत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आश्वासन दिले आहे. या निर्णयामुळे जानोरीच नाही, तर राज्यभरातल्या अन्य शाळांतील शाळांनाही फायदा होणार आहे.
>
> – प्रवीण जाधव, मविप्र संचालक

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्यनगरी

# सुरक्षित कुंभमेळ्यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन महत्त्वपूर्ण

## मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून त्र्यंबकेश्वरच्या कामांची पाहणी

**नाशिक :** नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सुरक्षिततेसाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिल्या. भाविकांना ये-जा करण्यासाठी स्वतंत्र मार्गिका तयार करण्यात, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्य सचिव राजेश कुमार दोन दिवस नाशिक जिल्हा दौऱ्यावर असून त्यांनी रविवारी (दि. ९) सकाळी त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळा विकासकामे तसेच त्र्यंबकराजा मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली. यावेळी विभागीय आयुक्त तथा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल पाटील, मंदिराचे विश्वस्त यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्र्यंबक शहर व परिसरात सुरू असलेली कामे, नियोजित कामे, कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येत असलेले नियोजन आदींबाबत विभागीय आयुक्त डॉ. गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त सिंह यांनी माहिती दिली.



### निर्धारित वेळेत कामे मार्गी लावण्याच्या सूचना

मुख्य सचिव राजेशकुमार यांनी सांगितले की, त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व कुंभमेळ्याला होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक आहे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच साधू, संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध होतील. तसेच आरोग्याच्या पुरेशा सुविधा व आपत्ती निवारणाची सुविधा, त्याचबरोबर विविध बाजूनी त्र्यंबकेश्वरकडे येणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, वाहनतळासाठी लागणारी जागा, नदी किनारी बांधण्यात येणारे घाट आदी कामे वेळेत सुरू करून निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

दै.नवराष्ट्र

दि.१० नोव्हेंबर २०२५

ePaper
नवराष्ट्र Nashik | 10 November 2025 | Page 1

**दौरा** ● त्र्यंबकेश्वरमधील विकासकामांच्या पाहणीप्रसंगी मुख्य सचिवांची सूचना

# सुरक्षित कुंभमेळ्यासाठी गर्दीचे सूक्ष्म नियोजन करा

▶ नाशिक (प्र.) नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणारा आगामी कुंभमेळा सुरक्षित होण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे सूक्ष्म नियोजन करावे. तसेच त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांना येण्यासाठी आणि जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका असाव्यात, अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मीना यांनी दिल्या आहेत. मुख्य सचिव राजेश कुमार दोन दिवस नाशिक जिल्हा दौऱ्यावर होते. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रविवार (दि.९) त्यांनी त्र्यंबकेश्वर येथे सुरु असलेल्या आणि प्रस्तावित कामांची पाहणी केली.

यावेळी कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, तहसीलदार गणेश जाधव, त्र्यंबकेश्वर नगर परिषद मुख्याधिकारी राहुल पाटील उपस्थित होते.




## भगवान त्र्यंबकेश्वराचे घेतले दर्शन

आज राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार मिणा त्र्यंबकेश्वर येथे विकासकामांची पाहणी करण्यासाठी आले असता यावेळी त्यांनी भगवान त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले. देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त कैलास घुले, पुरुषोत्तम कडलग, स्वप्नील शेलार यांनी त्यांचे स्वागत करून परिसरातील सुविधा आणि सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

यावेळी सचिव राजेशकुमार यांनी विकास कामे तसेच त्र्यंबकेश्वर मंदिर परिसर, दर्शन मार्गिका, नियंत्रण कक्ष आणि कुशावर्त परिसराला भेट देऊन पाहणी केली.

त्र्यंबकेश्वर येथे उपलब्ध असलेली जागा व भाविकांची गर्दी लक्षात घेता, सूक्ष्म नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच साधु, संत, महंत आणि भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सोयीसुविधा वेळेत उपलब्ध करा, अशा सूचना केल्या. तसेच आरोग्याच्या पुरेशा सुविधा व आपत्ती निवारणाची सुविधा, त्याचबरोबर विविध बाजूंनी त्र्यंबकेश्वरकडे येणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, पार्किंगसाठी लागणारी जागा, नदी किनारी बांधण्यात येणारे घाट ही कामे वेळेत सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पुढारी



# ई-ऑफिस प्रणालीतून शिक्षण विभाग टाकतोय कात!

## शाळा ते जि. प. शिक्षण विभागाचे पत्रव्यवहार ऑनलाइन, पेपरलेस कामकाजामुळे गतिमानता



### शिक्षण विभागाची आघाडी

### ही कामे ई-ऑफिस प्रणालीमार्फतच...

पुढारी

# चार महिने उलटूनही बिऱ्हाड आंदोलन 'जैसे थे'

- राज्यपाल दरबारी आंदोलकांची निराशा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

आदिवासी आयुक्त कार्यालयासमोरील बिऱ्हाड मोर्चाला चार महिने पूर्ण झाली तरी अद्यापही त्यावर तोडगा निघालेला नाही. आदिवासी आश्रमशाळेतील बाह्यस्रोतांच्या भरतीविरोधात ठराव घेऊन शिक्षक राज्यपालांकडे गेले होते. मात्र, तेथेही आंदोलकांच्या पदरी निराशा पडली. राज्यपालांनी त्यांच्या मागण्या फेटाळल्याने बिऱ्हाड आंदोलकांनी मुंबईतील आझाद मैदानावरील मोर्चा पुन्हा आदिवासी विकास कार्यालयासमोर आणला आहे. यातच राज्यात आता आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे शक्य नसल्याने हा प्रश्न सुटणार तरी केव्हा, असा प्रश्न आहे.

## तीन महिने आचारसंहिता

राज्यात नगरपालिकांची निवडणूक आचारसंहिता लागू झाली आहे. येत्या काही दिवसांत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची आचारसंहिता लागू होईल. ही निवडणूक होण्यापूर्वीच महापालिकांना आचारसंहितेची घोषणा होईल. त्यामुळे साधारणत: नोव्हेंबर ते जानेवारीपर्यंत शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे शक्य नाही. त्यामुळे बिऱ्हाड आंदोलनाचे पुढे काय होणार, असा प्रश्न आहे.

आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत तासिका तत्त्वावरील वर्ग ३ व वर्ग ४ या कर्मचाऱ्यांच्या जागेवर खासगी कंपनीमार्फत कंत्राटी पद्धतीने १७९१ पदांची भरती करण्यात येत आहे. या भरतीच्या विरोधात शासकीय आश्रमशाळा कर्मचारी संघटनेने ९ जुलैपासून आदिवासी विकास विभागासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला रविवारी (दि.९) चार महिने पूर्ण झाली. परंतु, त्यावर तोडगा निघालेला नाही. आंदोलकांनी शहरात मोर्चा काढला. आदिवासी महापंचायत घेतली. त्यात मंजूर ठराव घेऊन आंदोलक ऐन दिवाळीत पायी मुंबईत पोहोचले. मुंबईच्या वेशीवर ठाण्यात आंदोलकांनी मेळावा घेत मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु, शासनाने त्यांच्या मागण्यांची दखल घेतली नाही. आंदोलक आझाद मैदानावर पोहोचताच राज्यपाल दरबारी जाण्यासाठी वेळ मागितली. परंतु, त्यांनी बिऱ्हाड आंदोलकांना पत्र पाठवत आपल्या संघटनेच्या मागण्या राज्य शासनाच्या पातळीवरील असल्याचे सांगत त्यांच्याशी चर्चा करावी. त्यामुळे मंत्रिमंडळालाच अंतिम निर्णय घ्यावा लागेल, असे कळवले. त्यामुळे राज्यपाल दरबारीही आंदोलकांची निराशा झाली.

पुढारी

# ओझर विमानतळावरून एअर कार्गो सेवा जोरात

## सहाच महिन्यांत ४०४८ मेट्रिक टन निर्यात : गतवर्षीपेक्षा अडीच पट वाढ

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

ओझर विमानतळावरून सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय हवाई मालवाहतूक (कार्गो) सेवेने 'टेकऑफ' घेतला आहे. पहिल्या सहामाहीत म्हणजेच एप्रिल ते सप्टेंबरदरम्यान विमानतळावरून तब्बल ४०४८ मेट्रिक टन इतकी निर्यात करण्यात आली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत अडीच पट अधिक ही निर्यात असून, द्राक्षे, कृषी उत्पादने, कुक्कुटपालन, संरक्षण आणि औद्योगिक वस्तू, औषधे आदींची निर्यात करण्यात आली आहे.

कार्गो निर्यात हाताळण्यासाठी एचएएल व कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी मिळून हालकॉन ही कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून विमानाद्वारे मालवाहतूक निर्यातीचे व्यवस्थापन केले जाते. ओझर विमानतळावरून २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४१०१ मेट्रिक टन निर्यात २५० विमान उड्डाणांद्वारे करण्यात आली होती. त्यानंतर हालकॉनने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सात हजार मेट्रिक टन निर्यातीचे उद्दिष्ट ठेवले आहे. यावर्षी पहिल्या सहामाहीतच ४०४८ मेट्रिक टन इतकी निर्यात करण्यात आली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत १५१९ मेट्रिक टन इतकी निर्यात करण्यात आली आहे. तुलनेत यंदा त्यात तब्बल अडीच पट वाढ झाली आहे. २२९ मालवाहू उड्डाणांद्वारे ही निर्यात करण्यात आली आहे.



मागील वर्षी याच कालावधीतील ९१ मालवाहू उड्डाणांच्या तुलनेत ही वाढ अडीच पटीपेक्षा अधिक आहे. हालकॉनने मागील आर्थिक वर्षात (२०२४-२५) ४१०१ मेट्रिक टन निर्यात २५० विमान उड्डाणांद्वारे हाताळली गेली.

हालकॉनने गेल्या आर्थिक वर्षात हाताळलेली आंतरराष्ट्रीय हवाई मालवाहतूक यंदा पहिल्या सहामाहीतच गाठली आहे. म्हणजे हालकॉनने यंदाचे ७ हजार मेट्रिक टन उद्दिष्टाच्या ५७ टक्के निर्यात पहिल्या सहामाहीत हाताळली आहे.

### मुंबईच्या तुलनेत स्वस्त मालवाहतूक

ओझर विमानतळावरून होणारी मालवाहतूक मुंबई विमानतळाच्या तुलनेत स्वस्त आहे. येथून कमी शुल्क आकारले जात असल्याने, बाहेरील निर्यातदार नाशिकच्या ओझर विमानतळावरून मालवाहतूक निर्यातीला प्राधान्य देतात. नाशिकमधून कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, कुक्कुटपालन, अभियांत्रिकी आणि इतर विविध वस्तूंच्या निर्यातीसाठी प्रचंड क्षमता आहे.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

पुढारी

# नवीन प्रशासकीय इमारतीचे गुरुवारी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- जि. प. प्रशासनाकडून तयारीला वेग

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अखेर तारीख मिळाली आहे. गुरुवार (दि.१३) मुख्यमंत्री फडणवीस जिल्हा दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अर्धा डझन मंत्र्यांच्या उपस्थितीत



सकाळी ११.३० वाजता इमारतीचे उद्घाटन सोहळा होईल. त्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडून तयारी सुरू झाली आहे.

नाशिक व त्र्यंबकेश्वर शहरातील कुंभमेळ्याच्या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याचे प्राधिकरणाने नियोजन केले आहे. मात्र, नगरपालिका आचारसंहिता लागू झाल्याने त्र्यंबकेश्वरची कामे वगळण्यात आली. आता फक्त नाशिक शहरातील कामांचा विषय शिल्लक राहिल्याने त्यासाठी मुख्यमंत्री नाशिकला येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री कुंभमेळ्याच्या कामांचे भूमिपूजन करतील. परंतु जिल्हा परिषदेच्या इमारतीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करता येईल का, या संदर्भात उलटसुलट चर्चा होती. नगरपालिकांच्या कार्यक्षेत्राबाहेर जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र येते. तसेच जिल्हा परिषदेची इमारतही महापालिका क्षेत्रात आहे. त्यामुळे दोन्ही ठिकाणी आचारसंहितेचा अडसर येत नाही. तरी मुख्यमंत्री कार्यालयाकडून याची खातरजमा केली जात होती. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून तारीख येणार असल्याने प्रशासनाला या तारखेची प्रतीक्षा लागलेली होती. अखेर रविवारी (दि.९) मुख्यमंत्री यांच्या कार्यालयाकडून अधिकृत तारीख प्राप्त झाली आहे. उद्घाटन सोहळ्यासाठी त्यांनी ३० मिनिटांचा कालावधी दिला आहे. त्यानंतर प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोहळ्याचे निमंत्रण दिले जाणार आहे.

Nashik Edition
Nov 10, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# जिल्हा अहिल्यानगर

लोकमत

मस्ट READ

# शहरातील रस्त्यावर हजारो श्वान, हल्ल्यापेक्षा दहशत जास्त, नागरिक भयभीत

## महिन्याला अवघे ५०० श्वानांचे निर्बीजीकरण

लोकमत विशेष

[illegible]

[illegible]

> महिन्याला सुमारे ५०० कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले जात आहे.

[illegible]

५

[illegible]

[illegible]



[illegible]

## घराबाहेर पडले की, कुत्र्यांचे दर्शन

[illegible]

## कुत्र्यांची संख्या कमी का होत नाही

१ [illegible]

२ [illegible]

३ [illegible]

४ [illegible]

लोकमत

# अहिल्यानगर-मनमाड महामार्गावर धुळीचे साम्राज्य

## अपघातांची मालिका सुरूच : दुरुस्तीचा बोजवारा, जबाबदार कोण?, दहा महिन्यांत ३८ जणांनी जीव गमावला

लोकमत विशेष

[illegible]

### सुरक्षितता रामभरोसे..

[illegible]



[illegible]

### नागरिकांच्या आरोग्याशी खेळ..

[illegible]

[illegible]



### १० महिन्यात १०० अपघात, ३८ ठार

[illegible]

# पाथर्डी बसस्थानकांमध्ये चोरट्यांचा वावर

## दागिने, पर्स चोरीच्या घटनांत वाढ ; पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवण्याची मागणी



सकाळ

# शेवगावकरांच्या घशाला कोरड कायम

## १५ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा; नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ

[illegible]



[illegible]

# जिल्हा धुळे

दै.दिव्य मराठी

दि.१० नोव्हेंबर २०२५



# कपाशीला हमी भावापेक्षाही कमी भाव

## रोगराईसह वाढलेल्या वेचणी खर्चामुळेही शेतकरी हवालदिल

**प्रतिनिधी** | साक्री

तालुक्यातील शेतकऱ्यांनी यंदा समाधानकारक उत्पादन होऊनही कच्च्या कापसाला मिळणाऱ्या कवडीमोल भावामुळे मोठे आर्थिक नुकसान सोसले आहे. केंद्राने कापसाचा प्रतिक्विंटल हमीभाव ८ हजारपेक्षा अधिक जाहीर केला असला तरी खासगी बाजारात व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांना केवळ साडेसहा हजार ते सात हजारांपर्यंत दर मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा सुमारे हजार ते पंधराशे रुपयांचा थेट फटका बसतो.

यावर्षी कपाशीवर आलेल्या रोगराईमुळे एकरी उत्पादनात घट झाली आहे. तर दुसरीकडे कापूस वेचणीसाठी १० ते १२ रुपये प्रतिकिलो मजुरी द्यावी लागत आहे. त्यामुळे एक क्विंटलमागे हजार ते बाराशे रुपयांपर्यंत खर्च येत आहे. पेरणी आणि वेचणीचा खर्च भागवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांच्या मनमानीला बळी पडून आपला माल विक्री करावा लागत आहे. उत्पादनात घट आणि विक्रीत फटका यामुळे शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. यामुळे, शासनाने लवकर कापूस खरेदी केंद्रे सुरू करून शेतकऱ्यांना जाहीर हमीभाव मिळवून देण्याची मागणी वाढू लागली आहे.

### रोग अन् पावसामुळे शेतकरी दुहेरी संकटात

यंदा कापूस उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. एकीकडे कपाशीवर झालेल्या बुरशी जन्य आजारांच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात घट झाली आहे, तर दुसरीकडे ऐन हंगामात झालेल्या अवकाळी पावसाने शेतातील उभा आणि वेचणीस आलेला कापूस पूर्णपणे खराब केला. बुरशी जन्य रोगांमुळे कापसाची बोंडे सडली असून, पाती व फुले गळून पडल्याने अपेक्षित उत्पादन मिळणार नाही.

# जिल्हा जळगाव

दै. लोकमत दि.१० नोव्हेंबर २०२५

लोकमत

मस्ट READ

# अंगावर चढणार खाकी वर्दी, जिल्ह्यात १७१ जागांची भरती !

## ३० नोव्हेंबरपर्यंत करता येणार ऑनलाईन अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जिल्हा पोलिस दलात शिपाई पदाच्या १७१ जागांवर भरती प्रक्रियेला सुरुवात झाली. २९ ऑक्टोबरपासून अर्ज दाखल केले जात असून, ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे. जळगाव जिल्हा पोलिस दलाच्या आस्थापनेवर सन २०२४-२०२५ या कालावधीत पोलिस शिपाई संवर्गातील रिक्त होणारी एकूण १७१ पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबविली जात आहे.



राज्यभरात पोलिस भरती प्रक्रिया राबविली जात असून, त्याअंतर्गत जिल्ह्यातही ही प्रक्रिया सुरू आहे.

### अंतिम मुदत काय?

पोलिस शिपाई पदासाठी २९ ऑक्टोबरपासून अर्ज करण्यास सुरुवात झाली असून, ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे.

### १०० गुणांची लेखी परीक्षा

पोलिस भरतीसाठी उमेदवारांची ५० गुणांची शारीरिक व १०० गुणांची लेखी परीक्षा होणार आहे.

### पोलिस भरतीतील सहभागासाठी निकष व पात्रता काय?

इच्छुक उमेदवार इयत्ता बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा, असा निकष असून माजी सैनिक व इतरांसाठीही निकष ठरवून दिले आहेत. महिला उमेदवारांची उंची १५५ सेमी तर पुरुष उमेदवाराची उंची १६५ सेमी पेक्षा कमी नसावी. तसेच तृतीय पंथीयांमध्ये स्वतःची लिंग ओळख महिला तृतीयपंथीय अशी केली असेल त्यांची उंची १५५ व ज्या तृतीय पंथीयांनी स्वतःची ओळख पुरुष अशी केली आहे त्यांची उंची १६५ सेमी पेक्षा कमी नसावी.

### १७१ जागांवर भरती

राज्यभरात पोलिस दलामध्ये पोलिस शिपाई, पोलिस शिपाई-वाहनचालक, पोलिस शिपाई (एसआरपीएफ), पोलिस बँड्समन, कारागृह शिपाई ही पदे भरली जाणार आहेत. यात जळगाव जिल्ह्यात पोलिस शिपाईसाठी १७१ जागांवर भरती होत आहे.

### वयोमर्यादा ओलांडणाऱ्यांना मिळणार एक विशेष संधी

ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे, अशा उमेदवारांना एक वेळची उपाययोजना म्हणून विशेष संधी दिली जाणार आहे.

### कुठे आणि कसा करायचा अर्ज

इच्छुक उमेदवारांना पोलिस दलाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावे लागणार आहे.

### प्रवर्गनिहाय भरली जाणारी पदे

| प्रवर्ग | जागा |
|---|---|
| सर्वसाधारण | ५५ |
| महिला ३० टक्के | ५३ |
| खेळाडू ५ टक्के | ८ |
| प्रकल्पग्रस्त ५ टक्के | ८ |
| भूकंपग्रस्त २ टक्के | ३ |
| माजी सैनिक १५ टक्के | २७ |
| अंशकालीन ५ टक्के | ८ |
| पोलिस पाल्य ३ टक्के | ५ |
| गृहरक्षक दल ५ टक्के | ८ |
| अनाथ - | एकूण रिक्त पदांच्या १ टक्के |

यामध्ये नियमानुसार आवश्यक असलेले आरक्षण लागू करण्यात आले आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांना या पदांसाठी अर्ज करता येणार आहे.

लोकमत

मस्ट READ

# शहर 'ई-बस' सेवेची दिवाळी हुकली, आता 'मुहूर्त' फेब्रुवारीचा !


## महापालिका : डेपो बांधकाम, ट्रान्सफॉर्मरचे काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]

## शहरातील २३ मार्गांवर ई-बस धावणार

[illegible]



[illegible]

[illegible]

## पर्यावरणाची 'खरी दिवाळी' लांबणीवर

[illegible]

## ५० बस मंजूर, कामासाठी मोठा निधी

[illegible]

लोकमत

# पीक विमा व नुकसान भरपाईचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यातून कर्जखात्यात!

## बँकेचा कारभार : प्रशासनाने लक्ष घालण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : गेल्या वर्षभरात नैसर्गिक संकटे आणि शेतमालाला मिळालेल्या कवडीमोल भावामुळे जिल्ह्यात शेतकरी आधीच प्रचंड संकटात सापडला आहे. नुकसानीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी, गेल्याच महिन्यात त्यांच्या खात्यावर हवामानावर आधारित फळ पीक विम्याची आणि इतर नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली. मात्र, ही रक्कम खात्यात येताच अनेक बँकांनी शेतकऱ्यांना माहिती न देता ती परस्पर त्यांच्या कर्ज खात्यात वळवल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

पीक विमा आणि नुकसान भरपाईची रक्कम कर्ज खात्यातून परस्पर वळवू नये यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी बँक प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या होत्या. विशेष म्हणजे, राज्य शासनाने यापूर्वीच याबाबतचा शासन निर्णय जारी करून सर्व बँकांना सूचना दिल्या आहेत. असे असतानाही, जिल्ह्यातील काही बँकांच्या शाखांकडून हे प्रकार सुरू आहेत.



## या तालुक्यांमध्ये सर्वाधिक तक्रारी

जळगाव तालुक्यातील भोकर, भादली, गाढोदा परिसर तसेच चोपडा, रावेर, यावल या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. बँका शेतकऱ्यांची ही 'दिलासा देणारी' रक्कम कर्जाचे हप्ते किंवा कर्जाची पूर्ण रक्कम म्हणून कपात करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांना मिळालेली ही मदत त्यांच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी आहे, कर्जाची परतफेड करण्यासाठी नाही. त्यामुळे बँकांनी शासनाच्या निर्देशांचे पालन करून ही रक्कम परस्पर कपात करू नये, अशी मागणी शेतकरी करत आहेत. शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, बँकांना परस्पर कपात न करण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, जेणेकरून संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मिळालेला तुटपुंजा दिलासा तरी कायम राहील.

# काय सांगता! महाबळेश्वरपेक्षाही जळगाव थंड, पारा १०.५ अंशांवर!

## सलग तीन दिवस राज्यात जळगाव सर्वात थंड

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव** : जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून थंडीची तीव्र लाट पसरली असून, रात्रीच्या तापमानात मोठी घट नोंदवली जात आहे. रविवारी जळगाव शहराचे तापमान १०.५ अंश सेल्सिअस पर्यंत खाली आले होते. विशेष म्हणजे, सलग तीन दिवस जळगाव शहर राज्यातील सर्वात थंड शहर म्हणून नोंदवले गेले आहे. भारतीय हवामान खात्याच्या अधिकृत संकेतस्थळावर ही माहिती समोर आली आहे.

**०८** अंशापर्यंत तापमान खाली जाण्याची शक्यता आहे.

गेल्या चार दिवसांपासून जळगाव जिल्ह्यात तीव्र थंडीची लाट आली असून, रात्रीच्या तापमानामध्ये लक्षणीय घट झाली आहे. रविवारी, राज्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरचे तापमान १३.२ अंश सेल्सिअस असताना, जळगावचा पारा १०.५ अंश इतका खाली आला होता. जळगावचा पारा, महाबळेश्वरपेक्षाही खाली आला आहे. गेल्या चार दिवसांत रात्रीच्या तापमानात जवळपास ११ अंशांची घट झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आगामी काळात रात्रीचा पारा ८ अंशांपर्यंत खाली घसरण्याची शक्यता आहे, तर आठवडाभरात तो ७ ते ८ अंशांपर्यंत खाली जाण्याची शक्यता आहे.



थंडी सुरू होताच सकाळी व्यायाम करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे. छाया: सचिन पाटील

## आगामी पाच दिवसांचा तापमानाचा अंदाज

| दिनांक | रात्रीचे तापमान |
| --- | --- |
| १० नोव्हेंबर | १० अंश |
| ११ नोव्हेंबर | ९ अंश |
| १२ नोव्हेंबर | ८ अंश |
| १३ नोव्हेंबर | ८ अंश |
| १४ नोव्हेंबर | ९ अंश |



## आरोग्यावर परिणाम आणि रब्बीला चालना

तापमानातील या अचानक बदलामुळे थंडीचे आरोग्यावर परिणाम दिसून येत आहे. लहान मुलांना सर्दी-खोकल्याचा त्रास वाढला असून, ज्येष्ठांनाही थंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. दुसरीकडे, या थंडीमुळे रब्बी पिकांच्या वाढीला चालना मिळण्याची शक्यता आहे. कारण जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. पुढील काही दिवस वातावरण पूर्णपणे कोरडे राहणार असून, कमी दाबाचे क्षेत्र विकसित होण्याची शक्यता नसल्याने थंडीचा कडाका असाच कायम राहील, असे हवामान विभागाने नमूद केले आहे.



## असा उतरला पारा...

- ९ नोव्हेंबर — १०.५ अंश
- ८ नोव्हेंबर — १०.८ अंश
- ७ नोव्हेंबर — १२.८ अंश
- ६ नोव्हेंबर — १७ अंश
- ५ नोव्हेंबर — २१ अंश

लोकमत

# हटवलेला कचरा होतोय आयटीआयच्या दारात गोळा...

## कचऱ्याने वेढले शिक्षण : कचरा संकलन केंद्र हटविण्याची प्रतीक्षा; कचऱ्यातूनच जावे लागते विद्यार्थी, शिक्षक-कर्मचाऱ्यांना, आरोग्य धोक्यात

लोकमत घटनास्थळी

अमित महाबळ
लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : शहरातील शहरातील कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या म्हणजेच आयटीआयच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर असलेल्या कचरा संकलन केंद्रामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत असून, संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक आणि या ठिकाणी बसथांब्यावर उतरणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. काही महिन्यांपूर्वी विद्यार्थ्यांनी या कचरा संकलन केंद्राच्या विरोधात आंदोलन केले होते. मात्र, त्या आंदोलनानंतरही महापालिकेकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसत नाही. जे पूर्वी होते, तेच आजही चालू आहे.

दररोज सकाळी सहापासून ते सायंकाळी ६:३० वाजेपर्यंत घंटागाड्यांमधून आलेला कचरा या ठिकाणी आणून कॉम्पॅक्टरमध्ये भरला जातो. या प्रक्रियेदरम्यान परिसरात कचरा सांडून राहतो. ओला कचरा, प्राण्यांचे अवशेष आणि कुजलेले अन्नपदार्थ यामुळे असह्य दुर्गंधी सुटलेली असते. यामुळे दिवसभर वर्गात बसणे अवघड झाले आहे. कधी-कधी विद्यार्थ्यांना उलट्या होण्याची भावना होते, असे एका विद्यार्थ्याने सांगितले.

या कचरा संकलन केंद्रालगत बाहेरगावाहून येणाऱ्या एस. टी. बस थांबतात. प्रवाशांना उतरताच, प्रवेशाने बसमधून खाली उतरताच समोर कचरा दिसतो, दुर्गंधीचा सामना करावा लागतो.



आयटीआयसमोर शहरातील कचरा गोळा करून जमा झालेल्या घंटागाड्या. छाया : सचिन पाटील

### जळगाव शहरात दररोज ३०९ टन कचरा संकलन

| कचरा संकलन केंद्र | घंटागाड्या | फेऱ्या | किती टन कचरा |
|---|---|---|---|
| आयटीआयसमोर | ३५ | ९० ते १०५ | १२० टन |
| नेरी नाका स्मशानभूमीजवळ | ४० | १४० | १८९ टन |

### रस्त्यावर संकलन केंद्र कोणत्या नियमात ?

महापालिकेने समोर रस्त्याच्या जागेवर संकलन केंद्र उभारले आहे.

**यामुळे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी रस्ता अडविणाऱ्या कचरा संकलन केंद्राला परवानगी देऊन स्वतःच नियमांचे उल्लंघन केले आहे.**

त्यांच्याविरोधात काय कारवाई करणार, असेही विचारणा होत आहे.

### महापालिकेने ठरवले तरच संकलन केंद्र हलणार

कचरा संकलन केंद्र हलविण्यासाठी महापालिकेचा आदेश आवश्यक असल्याने संस्थेला स्वतःहून हे ठिकाण बदलू शकत नाही.

मात्र नागरिकांच्या मते, प्रशासनाकडून योग्य पर्यायी जागा शोधण्याऐवजी दुर्लक्ष केले जात आहे. दररोजचा त्रास सहन करण्याची वेळ आली आहे, असा आरोप होत आहे.

### वातावरण बिघडले

आयटीआय परिसरात माश्या, डास आणि कीटकांचा उपद्रव वाढला आहे. शासन म्हणते, शिक्षण संस्थांचा परिसर स्वच्छ ठेवा. या निर्देशांना महापालिका वाटाण्याच्या अक्षता लावत आहे.

### सध्याची स्थिती

घंटागाड्या आल्यावर लावणे बंद झाले. आता रांगेत लावतात. गाड्यांमधील कचरा सांडण्यासाठी उचलून नेला जातो. परंतु, दिवसभर दुर्गंधीची समस्या कायम आहे. यामुळे मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे.

### मग स्वच्छता कुठे?

कचरा संकलन केंद्र दुसरीकडे हलवा म्हणून सुरुवातीला आयटीआयचे प्रशासन, शिक्षणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बराच पाठपुरावा केला. त्यांना महापालिकेने दाद दिली नाही. नंतर नाइलाजाने विद्यार्थ्यांना मोर्चा देत आंदोलन केले होते.

### स्थलांतराचे आदेश दिलेय

कचरा संकलन केंद्र स्थलांतराचे आदेश दिले आहेत. खेडीकरनगर, टीबी रुग्णालयाच्या मागील बाजूला आणि सम्राट कॉलनीमध्ये कचरा संकलन सुविधा उभारणीसाठी कार्यादेश दिले आहेत. यामध्ये शेड, ... उभारण्यासाठी काँक्रीट ..., लाइट आदी सुविधा असणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे शहर अभियंता योगेश बोरोले यांनी दिली.



याच ठिकाणी घंटागाड्यांमधील कचरा कॉम्पॅक्टरमध्ये टाकला जातो.

लोकमत

# हमीभावाची 'आशा' व 'अटींचा' पेच, सीसीआयची खरेदी आठवडाभरात

## शासकीय खरेदी केंद्राच्या प्रतीक्षेत कापूस उत्पादक; एकरी ५ क्विंटलची मर्यादा मोठी डोकेदुखी!

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : घरात कापूस दाखल असतानाही, सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया)चे शासकीय खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, पुढील आठवडाभरातच सीसीआयचे केंद्र सुरू होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. सध्या एरंडोल येथे एक केंद्र सुरू करण्यात आले आहे.

अवकाळी पावसामुळे कापसात आर्द्रता (ओलावा) जास्त राहण्याची शक्यता असल्याने सीसीआयने खरेदी उशिराने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, सीसीआयच्या खरेदी केंद्रांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याऐवजी भविष्यात जाचक अटींमुळे गोंधळाची शक्यता आहे.



### बाजारात दर कमी, आवक मंदावली

**सध्याचा खासगी बाजार:** शासकीय खरेदी केंद्र सुरू नसतानाही, खासगी बाजारात कापसाला ६७०० ते ७१०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. तर कापसाचा हमीभाव ८१०० रुपये इतका आहे.

**आवक कमी:** सध्या खासगी बाजारात कापसाची आवक कमी आहे. खान्देश जिनिंग असोसिएशनचे संचालक अनिल सोमाणी यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात सध्या दिवसाला केवळ ३ हजार गाठींची आवक होत आहे, जी गेल्या वर्षी १५ हजार गाठींच्या होती.

### 'सीसीआय'च्या 'जाचक अटी'मुळे गोंधळाची शक्यता...!

१ **नोंदणी अनिवार्य:** शेतकऱ्यांची सीसीआयकडे नोंदणी आवश्यक असेल. भारतीय कपास ॲपवर जिल्ह्यातून केवळ ४ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. ७० हजार ते १ लाखाहून अधिक शेतकऱ्यांनी या ॲपवर नोंदणी केलेलीच नाही.

२ **उत्पादन मर्यादा:** शेतकरी एका एकरात केवळ ५ क्विंटल कापसाचीच विक्री सीसीआयला करू शकतील. गेल्या वर्षी ही मर्यादा एकरी १२ क्विंटल इतकी होती.

३ **आर्द्रतेचे निकष:** आर्द्रतेबाबतचे कठोर निकष पाळणे बंधनकारक असेल. त्यामुळे आर्द्रतेनुसार शेतकऱ्यांना दर दिले जाणार आहेत.

**दै. तरुणभारत** दि. १० नोव्हेंबर,२०२५

navarashtra.com

# झेडपीच्या १८२० शाळा सीसीटीव्हीविना!

## टेंडर प्रक्रियेचा खोळंबा : बदलापूर घटनेनंतरही प्रशासकीय यंत्रणेला जाग येईना!

जळगाव (प्रा.) जिल्हा परिषदेच्या शाळेसह खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविणे शासनाने बदलापूर घटनेनंतर बंधनकारक केले आहे. मात्र बहुतांश खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. परंतु जिल्हा परिषदेच्या शाळांची सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची टेंडर प्रक्रिया अद्यापही खोळंबलेलीच आहे. बदलापूर घटनेनंतर राज्य सरकारने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसविण्याबाबत निर्णय ऑगस्ट २०२४ मध्ये जारी केला त्याला दीड वर्ष पूर्ण झाले. तरीही अद्याप झेडपीच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे पालकांसाठी ही चिंतेची बाब आहे.

शाळांना सीसीटीव्ही बसविण्यासाठी ३१ सप्टेंबर २०२४ ची मुदतही देण्यात आली होती. मात्र त्यातील तांत्रिक अडचणी पाहता त्यांना आजून वेळ लागणार आहे.





जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १८२० शाळा असून त्यात अद्यापही सीसीटीव्ही बसविण्यासाठी वेळ आलेला दिसून येत नाही. आतूनही सीसीटीव्ही टेंडर प्रक्रियेत असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. बदलापूर येथील शाळेतील घटनेनंतर विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा विषय ऐरणीवर आला होता. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकाऱ्यांकडून पालकांचे अभिप्राय मागविण्यात येत आहेत. मात्र नोटीसमध्ये आलेल्या पालकांच्या अभिप्रायावर प्रशासनाच्या शिक्षण विभागाकडून किती प्रतिसाद मिळतो हाही प्रश्न आहे.

### निर्णयावर अंमलबजावणी होणार कधी?

जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत शासनाने दीड वर्षापूर्वीच आदेश काढला. मात्र आदेश कागदावरच आणि शाळांना सीसीटीव्हीसाठी तरतूद करण्याची शाळांमध्ये हे काम झालेले नाही. प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची टेंडर प्रक्रिया अद्यापही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे शासनाने दीड वर्षापूर्वी काढलेल्या निर्णयावर अंमल होणार कधी हा ही प्रश्न आहे.

### विद्यार्थी सुरक्षा धोरणाबाबत अभिप्राय

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत धोरण निश्चित करण्यासाठी समाजातील विविध घटकांकडून शासनाकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यासंदर्भात शिक्षण संचालकांनी उपसंचालक, शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांना पत्रकाद्वारे सूचित केले होते. त्यानंतर सीसीटीव्ही शाळांना शासनाकडून सक्तीचे करण्यात आले होते.

# मुक्ताईनगर अनुदान भ्रष्टाचार प्रकरण : दोन तलाठ्यावर निलंबनाची टांगती तलवार

मुक्ताईनगर । प्रतिनिधी

शासनाकडून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या अनुदानात मुक्ताईनगर तालुक्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणाऱ्या उचंदा येथील 'त्या' कोतवालास पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान असे असताना दोन तलाठ्यांवर मात्र निलंबनाची टांगती तलवार आजही लटकत आहे त्यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली आहे. राज्याला हादरवून टाकणाऱ्या या शासनाच्या अनुदान वितरणातील भ्रष्टाचारामुळे आता संपूर्ण राज्याचे लक्ष याकडे लागून आहे.

या संदर्भात मुक्ताईनगरचे आ.चंद्रकांत पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यातील अनेक ठिकाणी असा भ्रष्टाचार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली आहे. ज्यांच्याकडे शेतीच नाही किंवा जे शेतकरी अस्तित्वात नाहीत, अशांनीसुद्धा शासनाचे अनुदान घेतले, असे त्यांनी नमूद केले.

राजुरा येथील एका शेतकऱ्याने तक्रार करून सांगितले की, बोरखेडा गावात अस्तित्वात नसलेल्या शेतजमिनी दाखवून काहींनी अतिवृष्टी नुकसानभरपाईचा लाभ घेतला. ही तक्रार आ.चंद्रकांत पाटील यांच्याकडे दाखल झाल्यानंतर त्यांनी महसूल प्रशासनास कारवाईच्या सूचना दिल्या.

तहसीलदार गिरीश वखारे यांच्या आदेशानुसार मुक्ताईनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, उचंदा येथील कोतवाल राहुल रवींद्र सोनवणे यास काल अटक करण्यात आलीअसून त्यास आज न्यायालयात हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडीसुनावण्यात आली असल्याचे पोलीस प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

कोतवाल राहुल सोनवणे याच्यावर बनावट कागदपत्रांद्वारे नातेवाईकांच्या नावावर अनुदान लाटल्याचा आरोप आहे. दरम्यान, २०२३ पासून संबंधित कोतवालाने सुमारे २५ ते २६ लाखांपर्यंतचे अनुदान त्याच्या नातेवाईकांच्या नावे (ते शेतकरी नसतानाही) टाकल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे दरम्यान यापैकी काही अनुदानाच्या रकमेच्या एन्ट्री कॅन्सल करण्यात आल्याचेही महसूल प्रशासनातर्फे सांगण्यात आले परंतु तरीही लाखो रुपयांना मलिदा या कोतवालाने लाटल्याचे दिसून येत आहे.

## तलाठी निलंबनाचा प्रस्ताव-तहसीलदार वखारे

संपूर्ण राज्याला हादरवून टाकणाऱ्या या प्रकरणी कोतवाल राहुल सोनवणे याला अटक करण्यात आली असून बोरखेडा येथील तलाठी, ग्राम महसूल अधिकारी महेंद्र राजेंद्र पंजारी आणि तत्कालीन उचंदे येथील तलाठी, ग्राम महसूल अधिकारी के. आर. ठाकूर या दोन तलाठ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात आल्याची माहिती तहसीलदार गिरीश वखारे यांनी दिली आहे.

## भ्रष्टाचाराची साखळी असण्याची शक्यता - आ.चंद्रकांत पाटील

मुक्ताईनगर तालुक्यात नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानात झालेल्या भ्रष्टाचारात केवळ एक नव्हे तर अनेक मोठे मासे असण्याची शक्यता नाकारता येत नसून याची चौकशी केल्यास भ्रष्टाचाराची ही मोठी साखळी उघडकीस येईल, अशी शक्यता आहे आ.चंद्रकांत पाटील यांनी बोलून दाखविले. तसेच हे प्रकरण केवळ हिमनगाचे एक टोक असून राज्यभरातही असे प्रकार झाले असू शकतात. यासंदर्भात आ.चंद्रकांत पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याशी संपर्क साधला असता या संदर्भात चौकशी समिती नेमण्यात येणार असल्याचेही सांगितले.

## शेतीप्रधान देशाच्या अन्नदात्यांचे भयानक वास्तव...

# मनमानी करणाऱ्या व्यापाऱ्याला केळी न देता पदवीधर शेतकरी केळीविक्रीसाठी उतरला

### हातगाडीवर दहा रुपयाला केळीची फणी; बिनाकेमीकल केळी घेणेसाठी ग्राहकांनी केली गर्दी

फत्तेपूर, ता. जामनेर (वार्ताहर)





जळगाव जिल्हा केळीसाठी ओळखला जातो. यावर्षी विविध संकटांच्या प्रचंड फटका बसत आहे. केळीच्या जिल्ह्यात केळीला रद्दी पेक्षा, भंगार पेक्षाही कमी भाव मिळत असल्याचे भयानक वास्तव समोर आले आहे. मनमानी करणाऱ्या व्यापाऱ्याला केळी न देता पदवीधर शेतकरी केळी विक्रीसाठी उतरला सत्वांश.

बिना केमीकल शेतकऱ्यांची केळी घेण्यासाठी ग्राहकांची एकच गर्दी फत्तेपूर बसस्थानकावर पाहायला मिळाली. शेतीप्रधान देशात शेतकऱ्यांची ही कधी नाही अशी भयावह परिस्थिती प्रथमच पाहायला मिळाली आहे.

भारताचे केळी शहर म्हणून जळगाव जिल्हा ओळखला जातो. महाराष्ट्रातील एकूण केळी उत्पादनापैकी सुमारे दोन तृतीयांश उत्पादन जळगावमध्ये होते. जळगावची केळी दर्जेदार असल्याने देशात आणि विदेशात केळी निर्यात केली जाते. यावर्षी मात्र केळी उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. केळीच्या दरात झालेल्या या घसरणीमुळे उत्पादकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. केलेला खर्च तर सोडा मेहनत सुद्धा वाया गेली आहे. एकंदरीत लागवड ते काढणीपर्यंत खर्च पाहता, एकाला खर्चाचा ताळमेळ बसेना. तर व्यापारीच सर्व निश्चित नाही. केळीचे रोप लागवड, खते, पीक, रासायनिक खते, फवारणी, कापणी, इतर देखभालासाठीच्या खर्चाचा हिशोब केला तर केळीच्या एका झाडामागे शेतकरी दहा पैसे देखील जात नाही. केळीच्या मालाची सुरक्षिततेसाठी देखभाल करावी लागते. यावर्षी शेतकरी मानसिकदृष्ट्या हताश झालेला आहे.

कसबा-पिंप्री येथील पदवीधर शेतकरी सुधाकर बाबुराव पाटील (एम.ए.अर्थशास्त्र) यांनी यावर्षी अडीच एकर शेतात रोपांची केळी लागवड केलेली होती. केळीच्या पहिल्या मालास ला-५००रुपये भाव मिळाला. दुसऱ्या वेळेस २००/३००रुपये भावाने केळीची मागणी होत होती. त्या वेळेस सुधाकर पाटील यांनी व्यापारी दूसरा मिळत असताना मात्र मनमानी करणाऱ्या व्यापाऱ्याला न देता स्वत: केळी विकून विक्री करण्याचा निर्णय त्यांनी घेतला तेव्हा त्यांनी ही व्यथा फत्तेपूर येथील सर्वोदय पेट्रोल पंपाचे मालक दिनेश शर्मा यांना सांगितली. त्यावेळेस शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून शर्मा यांनी केळीचा माल विक्रीसाठी लागणारी बसस्थानकाजवळील सुरक्षित जागा ही मोफत म्हणून शेतकऱ्याला मोफत दिली. त्यानंतर सुधाकर पाटील यांनी केळीचा माल विकून येथील बसस्थानकाजवळ हातगाडी वर केळी विक्री सुरू केलेली आहे. पहिल्याच दिवशी त्यांनी विक्रमी विक्री केलेली आहे. ही बाब प्रतिनिधीच्या लक्षात आली तेव्हा याबाबत सुधाकर पाटील यांना विचारणा केली तर त्यांनी त्यांची व्यथा मांडली यावेळेस प्रतिनिधी समक्ष मांडली. मागील वर्षी तीन हजारापर्यंत भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी टी.जे. लावून केळीची सिंचपूर्वक काढली यावर्षी भाव घसरेल असे वाटले नाही. गेल्या दहा वर्षापासून केळीची लागवड करीत आलो मात्र अशी स्थिती पहिल्यांदा पाहायला मिळाली. फत्तेपूर बसस्थानकावर ३०/४० रुपये केळी विक्री व्यापारी करतात. मी दहा रुपयात एक फणी तेही बिना केमिकलची केळी विक्री करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

उद्यापासून जामनेर येथे दहा रुपये प्रमाणे केळी विक्री करणार आहे. त्यामुळे केळी विक्रेत्यांचे एकच खळबळ उडालेली आहे. या वरून असे लक्षात आले की शेतकऱ्याने जे ठरविले ते तो करू शकतो म्हणून नुकसान सहन करण्याची हिम्मत शेतकऱ्यांमध्ये आहे. अशी भयावह स्थिती शेतीप्रधान देशात अन्नदात्यांची झालेली आहे. तर त्यांच्या मदतीला कोणी पुढे यायला तयार नाही? यापेक्षा भयानक वास्तव काय असेल? आज हताश शेतकरी कर्जाच्या खाईशी उभे राहण्याची वेळ आहे? मात्र शेतकरी अस्मानी सुलतानी संकटाचा सामना करीत आल्याचे चित्र समोर आलेले आहे. हि लोकशाहीचा शेतकरी कोणता मानेल? असे चित्र समोर आलेले आहे.

# जिल्हा नंदुरबार

लोकमत

# त्याने डरकाळी फोडली आणि मजुरांनी धूम ठोकली...

## खरवड परिसरात बिबट्याची दहशत; शेतीकामांना मजूर येईना

**नंदुरबार :** मजूर कापूस वेचणीच्या कामात गर्क असतानाच शनिवारी अचानक बिबट्याची डरकाळी ऐकू आली आणि मजुरांनी हातातील काम सोडून धूम ठोकली. ही घटना घडली तळोदा तालुक्यातील खरवड परिसरात. या भागात बिबट्याचा संचार असून शेतकरी भीतीच्या छायेखाली आहेत. बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

तळोदा तालुक्यातील खरवड परिसरात कापूस वेचणीचा हंगाम सुरू झाला असल्याने शेतकऱ्यांना मजुरांच्या टंचाईचा मोठा फटका बसत आहे. त्यातच बिबट्याची दहशत वाढत आहे. परिणामी, कापूस वेचणीचा वेग मंदावला असून शेतकऱ्यांवर मजूर उपलब्धतेची आफत ओढवली आहे.

गेल्या महिन्यात बिबट्याने तऱ्हावद येथील एका तीन वर्षीय बालिकेवर प्राणघातक हल्ला केला होता. त्यात बालिका गंभीर जखमी झाली होती. तसेच काही ठिकाणी जनावरांवरही हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले आहे.



१ मागील महिन्यात तऱ्हावद शिवारात वन विभागाने हिंस्र प्राण्याला पकडण्यासाठी पिंजरे लावले असले तरी तो अद्याप सापडलेला नाही. शनिवारी खरवड शिवारात कापूस वेचणी सुरू होती.

२ मजूर वर्ग कापूस वेचणीत मग्न असताना बिबट्याने मोठी डरकाळी फोडली. त्यामुळे मजुरांची धावपळ उडाली व घराकडे धूम ठोकली. या पार्श्वभूमीवर बिबट्याला जेरबंद करून सुरक्षित वातावरण निर्माण करावे, अशी मागणी परिसरातील शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

३ सध्या कापूस वेचणीच्या हंगाम सुरू आहे. मजूर वर्गाने रोजगारासाठी स्थलांतर केल्याने कापूस वेचणीला मजूर मिळणे कठीण झाले आहे. जेमतेम मजूर मिळत असताना आता बिबट्याची दहशत निर्माण झाल्याने मजूर कामाला येत नसल्याची स्थिती आहे.

लोकमत

# जादुटोण्याच्या संशयाने हल्ला, वृध्दा ठार

## धडगाव तालुक्यातील घटना : हल्लेखोर संशयित महिलेला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** गावातील वृद्ध महिला जादूटोणा करते. त्यामुळेच आपण वारंवार आजारी पडत असल्याचा संशय घेऊन एका महिलेने धारदार शस्त्राने वार करून काल्ली आल्या तडवी (६७) या वृध्देला ठार केल्याची घटना शुक्रवारी धडगाव तालुक्यातील मोडलगाव-गुंबालहोजळपाडा येथे घडली. याप्रकरणी म्हसावद पोलिसात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समका नारसिंग पाडवी, रा. मोडलगाव असे संशयित आरोपीचे नाव आहे.

समका पाडवी ही नेहमीच काल्ली यांच्यावर डाकीण असल्याचा संशय घेत होती. जादूटोणा करून आपल्याला आजारी पाडत असल्याचा संशय समका यांचा बळावला होता. त्या संशयातून आणि रागातूनच त्यांनी काल्लीबाई यांच्यावर वार करून ठार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत भीमसिंग हांद्या वसावे यांनी फिर्याद दिली. तपास सहायक पोलिस निरीक्षक नितीन कामे करीत आहे.

## जनजागृतीचे प्रयत्न ठरताहेत व्यर्थ

**नंदुरबार :** जिल्ह्यात सातपुड्यातील दुर्गम भागात डाकिणीच्या संशयावरून महिलांच्या छळाच्या घटना वारंवार घडत असतात. याबाबत शासन, प्रशासन, सामाजिक संस्था यांच्यामार्फत जनजागृती केली जात असली तरी या घटना कमी होत नसल्याची स्थिती आहे.

गेल्या चार महिन्यात अशा प्रकारच्या सहा घटनांची नोंद पोलिसात झालेली आहे. यात सर्वाधिक अत्याचार वृद्ध महिलांवरच होत असल्याचे चित्र आहे. धडगाव, मोलगी, अक्कलकुवा आणि म्हसावद पोलिसात अशा प्रकारच्या घटनांचे गुन्हे दाखल झाले आहेत.

❝

डाकीण प्रश्नावर सामाजिक संस्थांसोबत प्रशासन व राजकीय पुढाऱ्यांनी देखील भुमिका घेणे गरजेचे आहे. कायद्यात तरतुदी आहेत पण अंमलबजावणी करणारी यंत्रणाच कायद्याबाबत अनभिज्ञ आहे. व्यापक प्रबोधनाच्या मोहिमेतून याबाबत असणाऱ्या समजुती दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, या प्रयत्नांना सर्वांनी मिळून अधिक साथ दिली तरच यासारख्या अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा समाजातून हद्दपार होऊ शकतात.

**-वसंत वळवी**, कार्याध्यक्ष, नंदुरबार जिल्हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती.

❝

घटनेतील संशयित महिलेला रविवारी सायंकाळी अटक करण्यात आली आहे. सोमवारी न्यायालयात हजर केले जाईल. या घटनेत आणखी काही संशयित आरोपी आहेत का याचा शोध घेतला जात आहे.

**-नितीन कामे**, सहायक पोलिस निरीक्षक, म्हसावद.

लोकमत

मस्ट READ

# वातावरणातील बदल; नंदुरबारात थंडी वाढल्याने सर्दी-खोकल्याने रुग्ण त्रस्त

## सरकारीसह खासगी दवाखान्यात रुग्णांची गर्दी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** काही दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसानंतर तापमानाचा पारा खाली येऊ लागला आहे. त्यामुळे थंडीत वाढ होऊ लागली असून, विषाणूजन्य आजारांचा ज्वर वाढत आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी, घशात खवखव होणे, घसा दुखणे, दमा, नाक कोंडणे, कोरडा खोकला यासारख्या आजारांनी डोके वर काढले आहे.

गेल्या काही दिवसांपासून रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असून, शासकीय आणि खासगी रुग्णालयात रुग्ण उपचार घेताना दिसून येत आहेत. खासगी रुग्णालयेही हाऊसफुल्ल झालेली आहेत. विशेष म्हणजे, बालरुग्णांची संख्या दुपटीने वाढली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून वातावरणात बदल होऊन थंडीचे प्रमाण वाढले आहे. यामुळे सर्दी, खोकल्याचे रुग्ण वाढले असून, काही जण तापानेही फणफणत आहेत. अंगदुखीही वाढल्याचे रुग्ण सांगत आहेत. आगामी काळात तापमानाचा पारा आणखी खाली येणार आहे. त्यामुळे सर्दी, खोकला, डोकेदुखी, अंगदुखी, घशात खवखव होणे, घसा दुखणे, दमा, नाक कोंडणे, कोरडा खोकला आदी रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता डॉक्टरांनी वर्तविली आहे.

अंगदुखी, घशात खवखव होणे, दमा, नाक कोंडणे, कोरडा खोकल्याने नागरिक झाले बेजार.

त्यामुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

शहरातील औषधाच्या दुकानांत सायंकाळच्या सुमारास सर्दी, खोकल्याची औषध घेणाऱ्यांची गर्दी असते.



### अंगावर काढू नये

अचानक वाढलेल्या थंडीमुळे श्वसन, दम्याचे आजार वाढले आहेत. ॲलर्जीचा त्रास होणाऱ्यांनी धुळीत जाणे टाळावे. तोंडाला रुमाल बांधावा. शीतपेय, थंड पदार्थ घेणे टाळावे. मधुमेह, उच्च रक्तदाब, जुनाट दमा असलेल्यांनी दुखणे अंगावर काढू नये, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

> थंडीमुळे विषाणूजन्य आजार वाढतात. थंड, आंबट पदार्थ खाणे टाळावेत. तसेच प्रथिनेयुक्त आहार घ्यावा. लहान मुले व ज्येष्ठांची थंडीमध्ये काळजी घ्यावी.
>
> **डॉ. गौरव तांबोळी, नंदुरबार**

लोकमत

# विद्यार्थ्यांसह बस दरीत कोसळली; दोन ठार

## देवगोई घाटात अपघात; ५३ जखमी, १८ रुग्णालयात

लोकमत न्यूज नेटवर्क

**अक्कलकुवा :** दिवाळीच्या सुटीत गावी आलेल्या विद्यार्थ्यांना मेहूणबारे (ता. चाळीसगाव) येथील अनुदानित आश्रमशाळेत नेणाऱ्या स्कूल बसला रविवारी दुपारी आमलीबारीनजीक देवगोई घाटात झालेल्या अपघातात दोन विद्यार्थी ठार, तर ५३ विद्यार्थी जखमी झाले. त्यापैकी १८ विद्यार्थ्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जगदीश बहादूरसिंग वळवी (वय १२, रा. निंबिपाडा), कपिला जहांगीर राऊत (११, रा. काठी, ता. अक्कलकुवा) असे मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे. घटनास्थळ दुर्गम भागात असल्याने मदतकार्यात मोठ्या प्रमाणावर अडचणी आल्या.

अतिदुर्गम भागातील सातपुडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना चाळीसगाव तालुक्यातील मेहूणबारे येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत दाखल करण्यात आले आहे. दिवाळीची सुटी आटोपून विद्यार्थी बस (एमएच १५ एके १४५९) पुन्हा मेहूणबारे (ता. चाळीसगाव) येथे जात होते. मोलगी-अक्कलकुवा दरम्यान आमलीबारीजवळ घाटात चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस दरीत कोसळली. बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक, एक परिचर असे ५७ जण होते. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल (पान ५ वर)



देवगोई घाटात दरीत कोसळलेली बस. छाया : अनिल जावळे

> या विद्यार्थ्यांना नेण्यासाठी संस्थेने तीन बसेस पाठविल्या होत्या. मात्र, दुर्दैवाने अपघात झाला. त्यात मयत दोन विद्यार्थ्यांच्या पालकांना संस्थेच्यावतीने प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत दिली जाईल तसेच जखमींच्या उपचाराचा खर्च करण्यात येणार आहे. अपघाताची माहिती मिळताच आपण नंदुरबार येथे पोहोचलो आहोत.
>
> **राजेंद्र चौधरी,** अध्यक्ष, मेहूणबारे आदिवासी आश्रमशाळा.

लोकमत

# केळी उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात

लोकमत न्यूज नेटवर्क

**बोरद :** तळोदा तालुक्याच्या पूर्व भागात मोठ्या प्रमाणात केळी लागवड करण्यात आली आहे. सध्या केळी परिपक्व झाली असून, कापणी करण्यात येत आहे. व्यापारी २०० ते २५० रुपये भावाने खरेदी करत आहेत. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

**२५०**
रुपये दराने व्यापारी करताहेत केळी खरेदी.

बाजारात केळी किरकोळ व्यापाऱ्यांकडून ४० ते ५० रुपये डझन प्रमाणे विक्री होत आहे. असे असले, तरी शेतकऱ्यांच्या हाती नाममात्र स्वरूपात पैसे मिळत आहेत. आधीच अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच वातावरण बदलामुळे केळी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने, हाती येणारे पीकही वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

लागवडीपासून ते पीक परिपक्व होईस्तोवर विविध प्रकारची औषध फवारणीसाठी एकरी लाखो रुपये खर्च करूनही हाती काही पडत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. लाखो रुपये खर्च करूनही केळी उत्पादक शेतकऱ्याला 'केळी घ्या हो केळी' असे म्हणण्याची वेळ आली आहे. एवढी दयनीय अवस्था केळी उत्पादकांची झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

एकरी लागवडीचा खर्च, रासायनिक खते, सेंद्रिय खते आणि विविध प्रकारची फवारणी असे मिळून लाखो रुपयांचा खर्च केळी पिकावर करण्यात येतो. या वर्षी मात्र अति पाऊस झाल्याने केळीचे मोठे नुकसान झाले. त्यातच कसेबसे केळी पिकाचे संगोपन केले. आता केळी परिपक्व झाल्याने ती तोडणीयोग्य झाली. मात्र, व्यापारी कवडीमोल भावाने केळी खरेदी करत आहेत.

लोकमत CLAS
नोकरीवि
नोकरीविष

लोकमत

# गाव-खेड्यात ऊसतोड मजुरांची गर्दी वाढली

## साखर कारखाने, खांडसऱ्या सुरू होणाच्या तयारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** तळोदा तालुक्यातील बोरद व मोड परिसरात ऊसतोड कामगारांनी आपल्या झोपड्या टाकून वस्ती वसवली आहे. उसतोड मजुरांच्या ठिय्या जिथे वसला आहे. तिथे किराणा दुकानदार उपहारगृह आणि इतर व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटली आहे. या दुकानावर उसतोड मजुरांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे.

जिल्ह्यातील साखर कारखाने आणि विविध खांडसऱ्याच्या बॉयलर येत्या काही दिवसात पेटणार आहे. यामुळे ऊसतोड मजूर संबंधित यंत्रणेकडून पाठवण्यात आले असून ग्रामीण भागात ऊसतोड मजुरांच्या आगमनामुळे गाव-खेडे गजबजू लागली आहेत.

गेल्या महिन्याभरापूर्वी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतमजूर हंगामी कामानिमित्त गुजरात तसेच इतर ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत. ग्रामीण भागातील शेत मजुरांची भर या ऊसतोड कामगारांमुळे भरली असून गाव गजबजू लागली आहेत. उसतोड कामगारांच्या वस्तीमुळे गाव गजबजली असून रोजगार उपलब्ध झाला आहे.

### उस लागवड क्षेत्र वाढले

या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात उस लागवड करण्यात आली आहे. जिल्हाभरातील साखर कारखाने आणि खांडसऱ्या सुरू होण्याचा मार्गावर आहेत. परिसरात एकही साखर कारखाना सहकारी तत्त्वावर नसल्याने खासगी मालकांकडूनच हे कारखाने चालवले जात आहेत. ऊस उत्पादकांना यंदा योग्य भाव मिळावा, अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

लोकमत

# गाव-खेड्यात ऊसतोड मजुरांची गर्दी वाढली

## साखर कारखाने, खांडसऱ्या सुरू होणाच्या तयारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** तळोदा तालुक्यातील बोरद व मोड परिसरात ऊसतोड कामगारांनी आपल्या झोपड्या टाकून वस्ती वसवली आहे. उसतोड मजुरांच्या ठिय्या जिथे वसला आहे. तिथे किराणा दुकानदार उपहारगृह आणि इतर व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटली आहे. या दुकानावर उसतोड मजुरांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत आहे.

जिल्ह्यातील साखर कारखाने आणि विविध खांडसऱ्याच्या बॉयलर येत्या काही दिवसात पेटणार आहे. यामुळे ऊसतोड मजूर संबंधित यंत्रणेकडून पाठवण्यात आले असून ग्रामीण भागात ऊसतोड मजुरांच्या आगमनामुळे गाव-खेडे गजबजू लागली आहेत.

गेल्या महिन्याभरापूर्वी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतमजूर हंगामी कामानिमित्त गुजरात तसेच इतर ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत. ग्रामीण भागातील शेत मजुरांची भर या ऊसतोड कामगारांमुळे भरली असून गाव गजबजू लागली आहेत. उसतोड कामगारांच्या वस्तीमुळे गाव गजबजली असून रोजगार उपलब्ध झाला आहे.

### उस लागवड क्षेत्र वाढले

या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात उस लागवड करण्यात आली आहे. जिल्हाभरातील साखर कारखाने आणि खांडसऱ्या सुरू होण्याचा मार्गावर आहेत. परिसरात एकही साखर कारखाना सहकारी तत्त्वावर नसल्याने खासगी मालकांकडूनच हे कारखाने चालवले जात आहेत. ऊस उत्पादकांना यंदा योग्य भाव मिळावा, अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

लोकमत

# टीईटी सक्तीविरोधात २६ संघटना एकवटल्या

## प्रशासनाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना निवेदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** टीईटी सक्तीच्या विरोधात जिल्ह्यातील २६ शिक्षक संघटना एकवटल्या असून याबाबत पुनर्विचार करावा अशी मागणी करण्यात आली. मध्यवर्ती शिक्षक संघटनेतर्फे मुख्यमंत्र्यांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने देखील निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना, जिल्हा नंदुरबार यांच्या वतीने आज जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे शासनाने घेतलेल्या टीईटी बंधनकारक निर्णयाचा पुनर्विचार करून तो तत्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत. टीईटी संदर्भातील शासनाचा अन्यायकारक निर्णय तत्काळ मागे घ्यावा.

५ वर्षापेक्षा अधिक सेवा असलेल्या शिक्षकांना आरटीई कायदा कलम २३ (३) नुसार कायम सेवेत राहण्याची परवानगी द्यावी.सर्व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. सर्व विषय शिक्षकांना पदव्युत्तर वेतनश्रेणी लागू करावी. शिक्षणसेवक योजना रद्द करावी वस्तीशाळा सहायक शिक्षकांना मुख्य व स्थायी सेवकमान्यता द्यावी. सर्व प्रकारची ऑनलाईन कामे बंद करावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

शिक्षकांकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता असताना फक्त टीईटी नसल्यामुळे सेवा थांबवणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे मत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील २६ संघटनांनी एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आंदोलन केले.

संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश गवित, सरचिटणीस संजय वळवी, सतीश पाटील, कोषाध्यक्ष मनोज सोनावणे, कमल पवार, भरत सावंत, भगवान सोनावणे, अशोक देसले, जयेश कोकणी, निलेश वळवी उपस्थित होते.

### विविध माध्यमातून केले जातेय आंदोलन...

शिक्षकांतर्फे विविध माध्यमातून आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले जात आहे. यापूर्वीच मध्यवर्ती शिक्षक संघटनेने केंद्र सरकारमधील मंत्री आणि सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनाही निवेदने दिली आहेत.

सकाळ

# देवगोवी घाटात बस दरीत कोसळली

## दोन विद्यार्थी जागीच ठार; १८ गंभीर जखमी

■ सकाळ वृत्तसेवा

वाण्याविहीर, ता. ९ : आमलीबारी गावाजवळील देवगोवी घाटात विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी शालेय बस खोल दरीत कोसळून दोन विद्यार्थी ठार, तर १८ जखमी झाले. जगदीश बहादूरसिंग वळवी (रा. निंबीपाडा) व कपिला जहांगीर राऊत (रा. काठी) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. ही घटना रविवारी (ता. ९) दुपारी दीड ते दोनच्या सुमारास घडली.

### आमिषांमुळे विद्यार्थी बाहेरगावी

■ दर वर्षी चाळीसगाव, जळगाव, धुळे या ठिकाणाहून विद्यार्थ्यांना घेण्यासाठी तेथील शिक्षक येत असतात आणि अक्षरशः वाहनांमध्ये कोंबून घेऊन जातात. अक्कलकुवा-धडगाव या आदिवासीबहुल तालुक्यात अनेक आश्रमशाळा व विद्यालये आहेत. मात्र, याठिकाणी शिक्षण न घेता काही आमिषामुळे पालक आपल्या पाल्यांना बाहेरगावी पाठवितात. अशा विद्यार्थ्यांना घेण्यासाठी रविवारी तीन बस आल्याचे एका पालकाने सांगितले.

अक्कलकुवा तालुक्यातील सातपुडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना मेहुणबारे (ता. चाळीसगाव) येथील अनुदानित

पान १० वर >

सकाळ

# पपई दराचा तिढा सुटणार कधी ?

## तोड बंद करण्याचा शहाद्यातील शेतकऱ्यांचा निर्णय

■ सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. ९ : पपई तोडणीचा हंगाम सुरू झाला आहे. निदान सुरवातीला पपईला १० ते १२ रुपये किलो भाव मिळावा, यावर शेतकरी ठाम असताना व्यापारी अवघ्या सात ते आठ रुपये किलोवर अडून राहिल्याने पपई उत्पादक शेतकरी व व्यापारी यांच्यातील बोलणी यशस्वी होऊ शकली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पपईची तोड तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय शहादा येथील बैठकीत घेतला आहे. दरम्यान, एकीकडे अवकाळी पावसाने मारले असताना दुसरीकडे आता व्यापारीदेखील कमी भाव देऊन शेतकऱ्यांची अडवणूक करीत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.**



शहादा : पपई दराचा तिढा सोडविण्यासाठी बाजार समितीच्या सभागृहात सुरू असलेली पपई उत्पादक शेतकरी व व्यापाऱ्यांची बैठक.

यावर्षी अतिवृष्टी व काही वेळा अवकाळी वादळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. उत्पन्न नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत आहे. त्यातच पुन्हा शेतमालाला हमीभाव मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. पपई भावाबाबत शहाद्यातील बैठक शनिवारी फिस्कटली. त्यामुळे शेतकरी नाराज झाले आहेत. यंदा शहादा तालुक्यात तीन हजार २९५ हेक्टरवर पपई लागवड करण्यात आली आहे. विशेषतः अनेक बाजारपेठा शेतकरी तसेच व्यापारी शहादा येथे जाहीर झालेला जो भाव असतो त्या आधारावर ते आपापल्या परिसरात पपई पिकाचे भाव जाहीर करीत असतात. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासह इतर राज्यातील सर्वाधिक मोठे व्यापारी पपई खरेदी करण्यासाठी शहादा तालुक्यात ठाण मांडून बसत असतात.

### बैठकीत तोडगा नाहीच

दरम्यान, येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात शनिवारी (ता. ८) पपई उत्पादक शेतकरी व व्यापारी यांच्यात झालेल्या दराबाबत बैठकीत शेतकऱ्यांनी पपईच्या हंगाम आता सुरू झाला असल्याने निदान सुरुवातीला चांगला दर मिळावा अशी अपेक्षा होती. परंतु, व्यापाऱ्यांनी सात ते आठ रुपये प्रत्येक किलो दरावर अडून बसल्याने बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही. अखेर शेतकऱ्यांनी पपई तोड बंद करण्याच्या निर्णय घेतला. बैठक सायंकाळी उशिरापर्यंत सुरूच होती. या वेळी परिसरातील पपई उत्पादक शेतकरी, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ज्या शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांकडून ॲडव्हान्स रक्कम घेतली आहे त्यांच्या पपईला केवळ आठ रुपये प्रतिकिलो भाव दिला जातो. त्यामुळे त्यांची फसगत झाली आहे. वाढीव भाव दिला जात नाही. जे शेतकरी खुल्या बाजारपेठेत पपई विक्री करतात त्यांना अधिक भाव मिळतो. म्हणून सर्व शेतकऱ्यांनी संघटितपणे शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी लढा देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी पपई तोड बंद केली आहे.
> **- डॉ. प्रफुल्ल पाटील**, औरंगपूर (ता. शहादा)

दिव्य मराठी

जळगाव 10-11-2025

# बस दरीत कोसळून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू; पायवाट, झाडांमधून १०० फूट खाली आल्याने मोठी दुर्घटना टळली


## ब्रेक फेल झाल्याने बस अनियंत्रित; अक्कलकुवा तालुक्यातील घटना, ५० जखमी

**नकारात्मक बातमी**

प्रतिनिधी | अक्कलकुवा/ शहादा

आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसचे ब्रेक फेल झाल्याने [illegible] बस अनियंत्रित होऊन १०० फूट खोल दरीत कोसळली. यात दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर ५० विद्यार्थी जखमी झाले. दरम्यान, ही बस थेट दरीत न कोसळता कच्चा रस्ता आणि झाडांमधून खाली आल्याने मोठी घटना टळली.

[illegible]



[illegible]

### मेहुणबारे आश्रमशाळेत शिकायला आहेत विद्यार्थी

[illegible]

दिव्य मराठी
धुळे सिटी 10-11-2025

वातावरण • स्वेटर दुकानांवर गर्दी, शेतकरी वर्ग आनंदी; रब्बीच्या पेरण्यांना येणार वेग

# नंदुरबारमध्ये थंडीची चाहूल; तापमान ४ ते ५ अंश घसरल्याने वाढला गारठा

प्रतिनिधी | नंदुरबार

यावर्षी काहीसा लहरी वातावरणाचा सामना जिल्हावासीयांनी अनुभवला आहे. मे महिन्यापासून पावसाला सुरुवात, हंगामात सरासरी न गाठणारे पर्जन्यमान, भर पावसाळ्यात उष्ण वातावरण, हंगामानंतर साधारण आठ दिवस झालेला अवकाळी पाऊस याचा सामना नागरिकांसह शेतकऱ्यांना करावा लागला आहे. अवकाळी पाऊस व दमट वातावरणाने हैराण झालेल्या जिल्हावासीयांना शनिवारी गुलाबी थंडीने सुखद धक्का दिला. जिल्ह्यात अखेर थंडीची चाहूल लागली असून शनिवारी अंगाला हुडहुडी भरवणारे थंडी जाणवली. सकाळी वातावरणात दवबिंदू पसरल्याचेही दिसले. गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत किमान आणि कमाल तापमानात सुमारे ४ ते ५ अंशांची घट झाली. मागील आठवड्यात कमाल तापमान ३१ अंशांपर्यंत होते. तर आता ते २७ ते २८ अंशांदरम्यान स्थिरावले आहे. किमान तापमान १५ अंशांवर आल्याने पहाटे आणि रात्री गारवा जाणवत आहे. यापुढे थंडीत वाढ होईल. दरम्यान, थंडीचे आगमन झाल्याने रब्बी पेरण्यांना गती येण्याची शक्यता आहे.



थंडीची चाहूल लागताच उबदार कपडे खरेदीसाठी झालेली नागरिकांची गर्दी.

## रब्बीसाठी पोषक वातावरण

हवामानातील हा बदल रब्बी हंगामासाठी लाभदायक ठरणार असल्याचे कृषी विभागाने मत आहे. थंडीचा परिणाम मका, गहू, रब्बी ज्वारी आणि हरभरा पिकांच्या उगवण क्षमतेवर सकारात्मक होतो. पिकांच्या वाढीस चालना मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. जिल्ह्यात १५ नोव्हेंबर पर्यंत रब्बीच्या पेरण्या होतात. थंडीचा अंदाज घेऊन सुरुवातीलाच पेरणी केल्यास पिकांची उगवण क्षमता चांगली राहते. रोग टाळण्यासाठी पेरणी करताना शेतकऱ्यांनी जैविक अथवा केमिकल बीज प्रक्रिया करणे आवश्यक असल्याची माहिती केव्हीकेच्या कृषी विभागाने दिली.

## उबदार कपड्यांना मागणी वाढली

अचानक थंडी वाढल्याने नागरिकांनी स्वेटर, जॅकेट, मफलर, कानटोपी आदी उबदार कपड्यांची खरेदी सुरू केली आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ पालिका रोड, धुळे चौफुली ते दंडपाणेश्वर मंदिर, सिंधी कॉलनी रोड या परिसरात शाल व स्वेटर विक्रीच्या दुकानांवर रविवारी गर्दी दिसली. लहान मुलांसाठी उबदार कपड्यांना विशेष मागणी होती. शहरात दरवर्षी शेकडो परप्रांतीय स्वेटर विक्रीसाठी येतात. महिनाभरापूर्वी दुकाने लावण्यात आल्या असून नागरिकांचा प्रतिसाद नसल्याने चिंतेत होते. मात्र, थंडीत वाढ झाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले.

## १५ नोव्हेंबरनंतर थंडीत होईल वाढ

*जिल्ह्यात थंडीची सुरुवात झाली आहे. कमाल व किमान पारा ३ ते ४ अंशांनी खाली येत आहे. १५ नोव्हेंबर नंतर थंडीत वाढ होईल. तत्पूर्वी शेतकऱ्यांनी रब्बी पेरण्या पूर्ण करून घ्याव्यात. -अमर देशमुख, सहा.हवामान विशेषज्ञ केव्हीके, नंदुरबार.*

पुढारी

# सीसीटीव्हीमुळे गुन्हेगारीला आळा; गुन्हे शोधायला मदत

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे प्रतिपादन

मालेगाव : पुढारी वृत्तसेवा

शहराच्या सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने उभारण्यात आलेली आधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावी ठरत आहे. मुख्य रस्ते, व्यापारी पेठा आणि शासकीय-निमशासकीय कार्यालये अशा १५३ ठिकाणी बसवलेले हे कॅमेरे 'तिसरा डोळा' ठरत आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवतानाच चोरी, घरफोड्या व गुन्ह्यांच्या शोधात सीसीटीव्ही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

येथील नियंत्रण कक्ष आवारातील शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सीसीटीव्ही नियंत्रण व देखरेख कक्षाची शनिवारी (दि.१५) मंत्री भुसे यांनी पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, उपअधीक्षक दर्शन दुगड, सिद्धार्थ बारवाल आदींनी त्यांना कॅमेरे, नियंत्रण व देखभालीविषयी माहिती दिली.

केंद्रीय मॉनिटरिंगमुळे शहरातील हालचालींवर सतत देखरेख ठेवता येते. त्यामुळे गुन्हेगारांमध्ये वचक निर्माण होऊन गुन्हेगारी कमी झाली असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले. आगामी काळात गरज भासेल त्या सर्व ठिकाणी कॅमेरे बसवून ही यंत्रणा अधिक सक्षम केली जाईल, असे ते म्हणाले.



मालेगाव : शहरातील सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाविषयी शिक्षणमंत्री दादा भुसे यांना माहिती देताना अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू.


### गुन्हे शोध मोहिमेत ९० टक्के मदत

शहरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्यापासून गुन्हेगारीला काही प्रमाणात आळा बसला. संशयितांच्या हालचालींवर देखरेख ठेवणे सोपे झाले. त्याचबरोबर चोरी, घरफोडी यासह विविध गुन्हे शोध मोहिमेत सीसीटीव्ही यंत्रणेमुळे ९० टक्के मदत झाली. अनेक मोठ्या चोऱ्या, घरफोड्या सीसीटीव्हीमुळे उघडकीस आल्या. चेहरा झाकण्यामुळे काही घरफोड्या सीसीटीव्हीमुळे गुन्हेगार ओळखू न शकल्यामुळे अटक होऊ शकले नाहीत. अन्यथा गुन्हे शोधमोहिमेत सीसीटीव्हीमुळे पोलिसांचे काम सुलभ झाले आहे.

पुढारी

# 'टॅरिफ'नंतरही जिल्ह्यातून 4,403 कोटींची निर्यात

## अमेरिका अव्वल : यूएई, बांगलादेश, नेदरलॅण्ड, जर्मनीत निर्यातीचा वाढला टक्का








### या उत्पादनांची निर्यात



### कांदा निर्यातीत वाढ, द्राक्षात मात्र घट



# पुढारी

# जिल्ह्यात बदलतोय रब्बी हंगामचा पॅटर्न !

## दुष्काळी तालुक्यातही वाढतेय रब्बीचे क्षेत्र; उन्हाळ कांदा, गव्हासह मक्याच्या क्षेत्रात होणार वाढ





### अतिवृष्टीने कडक थंडी

पुढारी

# मानसिक विकलांग बेघरांसाठी महापालिकेचे निवारागृह

## हुंडीवाला लेनमधील शाळा उपलब्ध करून देणार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

महापालिकेने मानसिक विकलांग बेघरांसाठी निवारागृह उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी जुन्या नाशिकमधील हुंडीवाला लेनमधील विद्यानिकेतन क्र. १ या बंद शाळेची इमारत उपलब्ध करून दिली जाणार आहे. या इमारतीची दुरुस्ती करत निवारागृहात रूपांतर करण्यासाठी ४० लाखांच्या प्रस्तावाला महासभेने मंजुरी दिली आहे.



### नाशिकमध्ये ८९४ बेघर

शासनामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या प्रथम संस्थेमार्फत नाशिक महापालिका क्षेत्रात शहरी बेघरांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार शहरात ८९४ बेघरांची नोंद करण्यात आली आहे. या बेघरांसाठी १०० बेड्स क्षमतेचे तीन निवारा केंद्रे उभारण्याचे उद्दिष्ट नाशिक महापालिकेला देण्यात आले आहे.

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील शहरी बेघर निवारा घटकांतर्गत शहरातील बेघर व निराश्रित व्यक्तींना निवारा उपलब्ध करून दिला जातो. सद्यस्थितीत नाशिक पश्चिम विभागातील काझी गढीलगतच्या श्री संत गाडगे महाराज धर्मशाळेच्या इमारतीत निवारा केंद्र कार्यान्वित आहे.



हुंडीवाला लेनमधील महापालिकेच्या बंद पडलेल्या शाळा इमारतीत नव्याने निवारा केंद्र उभारण्याचा प्रस्ताव आहे. मानसिक विकलांग बेघरांसाठी हे निवारागृह उभारण्यात येत आहे. या निवारा केंद्राचे विनामूल्य तत्त्वावर देखभाल व व्यवस्थापन करण्यासाठी संस्थेची निवडदेखील करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने या इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या इमारतीची अभियंत्यांमार्फत पाहणी करण्यात आली असून, दुरुस्तीसाठी ३९.८५ लाखांचे प्रकरण तयार करण्यात आले आहे. पालिकेतील बांधकाम विभागाच्या प्रस्तावाला महासभेत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

LOKMAT TIMES

LOKMAT TIMES ● **Anchor**

# Banks in district struggle to trace heirs of unclaimed accounts

Campaign extended after minimal response; ₹142 crore remains untouched

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 16

One month after banks in the district appealed to depositors and their heirs to claim long-pending unclaimed deposits, only 571 people have approached their respective banks. This limited response has led to the initiation of refund processing for just ₹ 4.55 crore. Officials say the campaign has now been extended by another month due to the poor turnout.

Unclaimed deposits worth nearly ₹ 142 crore remain idle in personal, institutional and government-scheme accounts across various banks in Nashik district. A total of 3,69,958 account holders are eligible to claim these funds under the special awareness drive. Banks were instructed to prepare and publicly display lists of such accounts at their branches, but several banks have allegedly failed to do so.



## Call for permanent display of names

Many depositors' heirs are unaware of existing accounts, and some depositors may have forgotten about their funds due to illness or other reasons. Citizens say banks should display these lists permanently at their entrances so heirs can easily check and claim deposits.

"Under Reserve Bank of India rules, money lying in inactive accounts for more than 10 years is transferred to the Depositor Education and Awareness Fund. However, depositors and their legal heirs retain full rights to reclaim these funds at any time. To do so, they must visit the bank, complete updated KYC formalities and submit the required documents. As the response till the original deadline of October 31 was extremely poor, the campaign has been extended until November 30.

**- Bhima Lavate,**
Manager of a leading bank

"Despite the directives, many banks have not displayed the lists yet. Banks track down a borrower's relatives when they want to recover overdue loans, so why can't they take similar initiative to find the heirs of depositors?"

**- Ramesh Gaikwad,**
Bank Depositor

### Unclaimed deposits: Bank-wise summary

| Bank | No of Account Holders | Amount (₹/crore) |
|---|---|---|
| State Bank of India | 1,03,495 | 47.34 |
| Bank of Maharashtra | 5,575 | 26.60 |
| Bank of India | 56,533 | 13.20 |
| Union Bank of India | 32,481 | 11.86 |
| Canara Bank | 33,535 | 7.80 |
| Bank of Baroda | 25,453 | 7.50 |
| Punjab National Bank | 1,446 | 4.96 |
| ICICI Bank | 15,889 | 4.51 |
| Central Bank of India | 4,276 | 4.17 |
| IDBI Bank | 14,219 | 3.87 |
| Axis Bank | 10,636 | 3.61 |
| HDFC Bank | 5,346 | 1.94 |
| Indian Overseas Bank | 5,898 | 1.39 |
| UCO Bank | 6,233 | 1.39 |

LOKMAT TIMES

# Leprosy detection drive from today

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 16

The annual Leprosy Detection Campaign will be conducted across Maharashtra once again, as per Union government guidelines. The state will carry out an extensive survey from November 17 to December 2, 2025 to identify leprosy patients in every district. This year's drive will cover a population of 8.66 crore and 1.73 crore households. A total of 65,832 teams and 13,166 supervisors have been appointed for the campaign. Each team will visit 20 households per day in rural areas and 25 - 30 households in urban areas for direct physical examination. Every team will include one ASHA worker and one male volunteer, who will carry out the survey continuously for 14 days. Suspected patients will be examined by medical officers, and those diagnosed with the disease will receive immediate multi-drug treatment.

LOKMAT TIMES

# 69 child marriages come to light in district, as many as 42 prevented

## Child Protection Committees have been established in 15 talukas to strengthen prevention

LOKMAT NEWS NETWORK
NASHIK, NOV 16

The number of child marriages in Nashik district remains high, raising serious concerns. Despite being a criminal offence under the law, these marriages continue to occur not only at the taluka level but also in rural villages. However, the District Women and Child Development Department and Childline teams have successfully prevented nearly two-thirds of the identified child marriages. This year, a total of 68 cases of child marriage were reported, of which 42 were successfully prevented through timely intervention.

**16 child marriages prevented in Nashik taluka alone**

In Nashik taluka alone, 16 child marriages were prevented, the highest in the district. Under the supervision of the District Women and Child Development Office, Childline teams across the city and district are actively working to stop child marriages. The department conducts counselling sessions with parents and guardians to foster a change in mindset. Those unaware of the law are informed of its legal consequences, aiding in preventing such marriages.

**42 child marriages successfully prevented**

A total of 42 child marriages were successfully prevented through counselling, according to the District Women and Child Development Department. Although the department is effective in stopping child marriage through counselling, such cases have not been eliminated. The department has also been concentrating on awareness campaigns to educate communities about the harmful effects and legal repercussions of child marriage.

**Child Protection Committees established**

To strengthen grassroots prevention, Child Protection Committees have been established in 15 talukas of the district under the District Women and Child Development Office. The members of these committees are trained for the task. In rural areas, gram sevaks are designated as Child Marriage Prohibition Officers, while in urban areas, the responsibility lies with Child Development Project Officers.



### Two FIRs registered this year

Under the Prohibition of Child Marriage Act, two First Information Reports (FIRs) have been registered in the district this year, while five cases are pending before the court. Additionally, eight cases have been transferred to other districts as they fell under their jurisdiction.

> Citizens should remain alert to help prevent child marriages and immediately call the helpline at 1098 to report such cases. The informant's name will be kept entirely confidential. According to the law, the bride and groom must not be married until both have reached the legally required age.
>
> **- Sunil Dusane,**
> District Women and Child Development Officer

Nashik First
Page No. 3 Nov 17, 2025
Powered by: erelego.com

आपलं महानगर | माय महानगर.com

# निफाड तालुक्यात तापमान ८ अंशांवर

**लासलगाव ।** निफाड तालुका व परिसरात हिवाळ्याची ठणठणीत चाहूल लागली असून किमान तापमान तब्बल ८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. रात्री आणि पहाटेच्या वेळेस थंडीचा कडाका जाणवत असून, पुढील काही दिवसांत तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

दिवाळीनंतर थंडी हळूहळू वाढण्याचा अनुभव असतो. मात्र यावर्षी दिवाळी संपल्यानंतर तब्बल १५ दिवसांनी गारठा जाणवू लागला आहे. मे आणि सप्टेंबरमधील मुसळधार पावसामुळे तिन्ही ऋतूंचे चक्र विस्कळीत झाले असून त्याचा परिणाम सध्या हिवाळ्यावर दिसत आहे. रविवारी किमान ८ अंश सेल्सिअस अंशांची नोंद झाली आहे. हवामानातील या अचानक बदलामुळे नागरिकांमध्ये सर्दी, घसा खवखवणे, खोकला, अंगदुखी असे त्रास वाढू लागले आहेत. पहाटे चालण्यासाठी जाणारे, सकाळी शेतात काम करणारे तसेच शालेय विद्यार्थी थंडीचा कडाका प्रकर्षाने अनुभवत असून गरम कपड्यांचा वापर वाढला आहे. हिवाळा आरोग्यासाठी लाभदायी मानला जातो. त्यामुळे अनेकजण या कालावधीत व्यायाम, योगा व प्राणायाम करण्यावर भर देत आहेत. मात्र वाढत्या गारठ्यामुळे नागरिकांनी सावधानता बाळगण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.१० नोव्हेंबरपासून निफाड तालुक्यातील बहुतांश भागांत किमान तापमानात लक्षणीय घट होत आहे.

Nashik Edition
Nov 17, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# त्र्यंबक नाका ते गडकरी चौक रस्त्यावरील बॅरिकेड्स ठरताहेत जीवघेणे

**नाशिक :** शहरातील त्र्यंबकनाका ते गडकरी चौक रस्त्यात एकाच लेनमधून सुरू असलेल्या दुतर्फा वाहतूक नियोजनासाठी पोलिसांनी दुभाजक म्हणून टाकलेले लोखंडी बॅरिकेड्स जीवघेणे बनले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी हे बॅरिकेड्स वाहनचालकांच्या लक्षातच येत नसल्याने थेट त्यावर धडकून अपघातांच्या घटना वाढत आहेत. गेल्याच आठवड्यात झालेल्या अपघातात एका दुचाकीचालक गंभीर जखमी झाला. त्यामुळे पोलिसांनी पुरेशी प्रकाश व्यवस्था करतानाच रेडियम लावावेत किंवा प्लास्टिकचे चांगले दुभाजक लावण्याची मागणी होत आहे.

आदिवासी विकास भवनासमोर काही महिन्यांपासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे रस्त्याची एक बाजू वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. त्यामुळे एकाच लेनमधून दुतर्फा वाहतूक सुरू असून, अपघात रोखण्यासाठी पोलिसांनी या ठिकाणी दुभाजक म्हणून तात्पुरत्या स्वरुपात लोखंडी बॅरिकेड्स ठेवले आहेत. गेल्या आठवड्यात रात्री ११:३० वाजेच्या सुमारास आदिवासी विकास भवनसमोर समोरुन येणाऱ्या वाहनाच्या प्रकाशझोतात बॅरिकेड लक्षात न आल्याने एक दुचाकीचालक थेट त्यावर जाऊन धडकला. या अपघातात दुचाकीचालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.



या रस्त्यावर आणीही ३ ते ४ अपघात झाले आहेत. त्यात काहींना किरकोळ तर, काहींना गंभीर दुखापत झाली. असे असतानाही वाहतूक पोलिसांकडून त्याबाबत दखल घेतली गेलेली नाही. बॅरिकेड्सवरील इशारा किंवा नाव हे समोरुन दिसते. मात्र, हे बॅरिकेड्स उभे ठेवलेले असल्याने रात्रीच्या वेळी ते लक्षातच येत नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यावर तातडीने रिफ्लेक्टर लावण्याची गरज आहे.



> नाशिक ट्रॅफिक पोलिसांनी आणि महापालिकेने कृपया या ठिकाणी त्वरित तपासणी करुन उपाययोजना कराव्यात. नाशिक पोलीस ज्या पद्धतीने गुन्हेगारांना पकडून कठोर शिक्षा करतात, त्या तंत्रानेच त्यांनी या सार्वजनिक सुरक्षेच्या प्रश्नाकडेही त्वरित लक्ष द्यावे. – श्वेता मालुसरे

## उपाययोजनांची गरज

तात्पुरत्या स्वरुपातील बदल करताना पोलिसांनी अशा ठिकाणी साईन बोर्ड, रिफ्लेक्टर टेप किंवा ब्लिंकर्सचा वापर केला पाहिजे. जेणेकरुन नागरिकांची सुरक्षितता जपली जाईल. शहरात अनेक ठिकाणी डिव्हायडरला परस्पर पंक्चर ठेवलेले आहे. अशा ठिकाणचे बॅरिकेड्सही स्थानिकांकडून काढून बाजूला उभे केले जातात. अशा ठिकाणी अपघाताला कारणीभूत पंक्चर महापालिकेला सांगून बंद करतानाच तेथील बॅरिकेड्स पोलिसांनी जमा करावेत. हेच बॅरिकेड्स पोलिसांना सिंहस्थावेळी वाहतूक नियोजनासाठी कामी येतील.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# कुंभमेळा प्रकल्पांची डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली सुरू

**नाशिक ।** सिंहस्थ कुंभमेळ्यातील सर्व प्रकल्पांचे नियोजन, देखरेख आणि प्रगती तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली तयार करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे सर्व कामांचे एकाच ठिकाणी निरीक्षण आणि नियंत्रण करता येणे शक्य होणार आहे. ही प्रणाली वापरण्यास सुलभ आणि उपयुक्त असून सर्व यंत्रणांनी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली कार्यान्वित करावी, अशा सूचना कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या.

कुंभमेळा प्राधिकरणामार्फत जिल्हा परिषदेच्या सभागृहात प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणालीत (PMIS) डेटा अद्ययावत करण्याबाबत आयोजित प्रशिक्षण सत्रात आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करीष्मा नायर व सर्व यंत्रणांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. आयुक्त सिंह पुढे म्हणाले की, या डिजिटल प्रणालीत सर्व यंत्रणांना नवीन वापरकर्ते आणि संस्था जोडणे, माहिती बदलणे आणि त्यांना आवश्यक अधिकार देणे शक्य होणार आहे. यात नवीन प्रकल्पांची माहिती मिळविणे, माहिती भरणे, माहिती अद्ययावत करणे, त्यातील कामांची यादी आणि पूर्ण होण्याच्या तारखा ठरविणे तसेच त्यांचे टप्पे व देयकांच्या टप्प्यांची माहिती नोंदविता येणार आहे. प्रकल्प किती टक्के पूर्ण झाला व त्याला टप्प्यानुसार लागलेला खर्च दर्शविता येणार आहे. तसेच, प्रगती अहवाल दाखविण्यासाठी छायाचित्रे व व्हिडिओ अपलोड करता येतील. विभागाने दिलेल्या निरीक्षणांची नोंद पाहता येणार असल्याचेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

Nashik Edition
Nov 17, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

www.mymahanagar.com
आपलं महानगर My महानगर.com

# मालेगावात आणखी साडेपाच लाखांच्या बनावट नोटा जप्त

**मालेगाव :** मध्य प्रदेशातून येणाऱ्या बनावट नोटांप्रकरणी पंधरा दिवसांपूर्वी टोळी जेरबंद केल्याची घटना ताजी असतानाच किल्ला पोलिसांनी पुन्हा एक बनावट नोटांचे रॅकेट उघड केले. पोलिसांनी शनिवारी (दि. १५) पहाटे केलेल्या या कारवाईत तब्बल साडेपाच लाखांच्या बनावट नोटा जप्त करत वर्धा जिल्ह्यातील दोघांना ताब्यात घेतले.



पोलिसांनी शहरातील तांबा काटा भाग व परिसरात सापळा रचत शनिवारी पहाटे दीडच्या सुमारास धनराम नारायण धोटे (२०, रा. मु.पो. कानगाव, ता. हिंगणघाट, जि. वर्धा) व राहुल कृष्णराव आंबटकर (२५, रा. करला चौक, सावनी नगर, जि. वर्धा) हे दोघे संशयितरीत्या फिरताना आढळले. त्यांना रोखल्यानंतर पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत सामानाची तपासणी केली असता धोटे यांच्या सॅकमध्ये २ लाख ८६ हजारांच्या ५०० रुपयांच्या ५७२ बनावट नोटा व २ लाख ५७ हजार ५०० रुपयांच्या पाचशे रुपयांच्या ५१५ असा एकूण ५ लाख ४३ हजार ५०० रुपयांच्या १ हजार ८७ बनावट नोटा आढळल्या. तसेच, धोटे यांच्या पँटच्या खिशातून ६३ हजारांच्या खऱ्या नोटा आढळल्या. या दोघांना स्थानिक न्यायालयाने २४ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

**भाड्याच्या खोलीत छपाई :** वर्धातील गौड प्लॉट परिसरात असलेल्या एका डॉक्टरच्या घरातील तिसऱ्या माळ्यावर बनावट नोटांचा सुरू असलेला काळा बाजार पोलिसांनी उधळून लावला. याप्रकरणी एका अल्पवयीन मुलास शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, मुख्य आरोपीच्या शोधार्थ पोलीस रवाना झाले.

दै.दिव्य मराठी

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

# नाशिक-त्र्यंबक रस्त्याच्या सहापदरीकरणास सुरुवात

## त्र्यंबक बाजूने प्रारंभ, ३५० कोटींची खर्च अपेक्षित



नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्याचे काम त्र्यंबकच्या बाजूने सुरू झाले आहे.

**प्रतिनिधी** | नाशिक

कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून अत्यंत महत्त्वाच्या नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्याच्या सहापदरीकरणाच्या कामाला त्र्यंबकेश्वरच्या दिशेने प्रारंभ झाला आहे. सुमारे २८ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यासाठी ३५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, यात रुंदीकरण आणि काँक्रिटीकरणाचा समावेश आहे.

या रस्त्यावरील १० किमीचा भाग नाशिक मनपाच्या तर १८ किमीचा भाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतो. या 'हरित' रस्त्यावर पालखी मार्गाचीही व्यवस्था केली जाणार आहे. दरम्यान, रस्ता रुंदीकरणादरम्यान अतिक्रमणे हटवल्यामुळे विस्थापित व्यावसायिकांना अद्याप नुकसानभरपाई आणि मेळामंत्री गिरीश महाजनांच्या भेटीची प्रतीक्षा आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांची माहिती

# बिबट्यांप्रश्नी आज बैठक, उपाययोजनांवर चर्चा होणार

**प्रतिनिधी** | नाशिक

राज्यभर बिबट्यांचे मानवांवरील हल्ल्यांचे संकट वाढत आहे. त्याच्या अधिवासात माणसाचे अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे बिबटे मानवी वस्तीत येऊन हल्ले करत आहेत. यावर मार्ग काढण्याचे काम सुरू आहे. अनेक उपाय केले जात आहेत. आता सोमवारी (दि. १७) संयुक्त बैठक घेऊन उपाययोजनांवर चर्चा करणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी रविवारी नाशिकमध्ये दिली. नाशिकमधील रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या रामशेज उपपीठ येथे रविवारी १ लाख ११ हजार ४२४ वृक्ष लागवडीच्या संकल्पपूर्ती कार्यक्रमात नाईक बोलत होते. दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच नाशिकमध्ये कामगारनगर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात सात नागरिक जखमी झाले होते.

# येवला तालुक्यात अतिवृष्टीग्रस्तांना २९.८२ कोटी रु.चे अनुदान वितरित

प्रतिनिधी | येवला

सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाने मदत कार्याचा वेग वाढवून एकूण ६३,७९८ शेतकऱ्यांना २९ कोटी ८२ लाख ७५ हजार रुपयांचे अनुदान डीबिटीद्वारे वितरित केले.

पोर्टलवर अपलोड झालेल्या ५४,४२० शेतकऱ्यांपैकी बहुतांश पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले आहे. तालुक्यात सामायिक खातेदारांची संख्या मोठी असल्याने, त्यांनी अनुदान कोणाच्या नावाने जमा करावे याबाबतचे संमतीपत्र, खातेदाराचे अकाउंट नंबर, आधार क्रमांक ही माहिती अधिकाऱ्यांकडे जमा करावी, असे आवाहन तहसीलदार आबा महाजन यांनी केले.

## अनुदान वाटपाची येवला तालुक्यातील स्थिती अशी

- एकूण बाधित शेतकरी : ६३,७९८
- पोर्टलवर अपलोड संख्या : ५४,४२०
- अनुदानप्राप्त शेतकरी : ४९,२४१
- वितरित अनुदान : २९,८२,७५,७४७ रु.
- प्रलंबित शेतकरी : ८,३३३
- ई-केवायसी प्रलंबित : ७,२१३
- ई-केवायसी पूर्ण झाल्यावर वितरित होणारी रक्कम : ५,६५,१०,०७५ रु.
- आधार सीडिंग नसलेले शेतकरी : १,१२०
- प्रलंबित रक्कम : ६७,०३,१७९ रु.

**ब्रेकिंग** डायोसेशन ट्रस्टच्या बड्या विश्वस्ताला समन्स

# नाशिकमधील 300 कोटींच्या जमीन घोटाळ्याची आता ईडीकडून चौकशी

नीलेश अमृतकर | नाशिक

शहराच्या मध्यवस्तीतील शरणपूर परिसरातील सुमारे ३०० कोटींच्या जमिनी परस्पर नावावर करून घेत महसूल बुडवल्याप्रकरणी २७ संशयितांविरोधात ११ जूनला दाखल गुन्ह्यात आता मनी लॉंडरिंगचा संशय व्यक्त करीत ईडीने स्वतंत्रपणे चौकशी सुरू केली आहे. डायोसेशन ट्रस्टच्या एका विश्वस्ताला बड्या बांधकाम व्यावसायिकाशी त्याने केलेल्या व्यवहाराची संपूर्ण माहिती सादर करण्यासाठी कार्यालयात हजर राहण्याचे आदेश दिल्याने खळबळ उडाली आहे.

## मनी लॉंडरिंगचा संशय, ही माहिती करावी लागणार सादर

- नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या सर्वच विश्वस्तांची माहिती व ट्रस्ट डीड. त्यामध्ये झालेल्या बदलांची प्रत.
- ट्रस्टी म्हणून जबाबदारी व भूमिका
- नाशिक डायोसेशन ट्रस्ट असो.प्रा. लि.कडून एनडीसीने प्राप्त केलेल्या जमिनीच्या मालकीचे दस्तावेज.
- बांधकाम व्यावसायिकाच्या कंपनीला विकलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्री दस्तावेजाची प्रत.
- या विक्रीतून ट्रस्टच्या बँक खात्यात जमा रकमेसंदर्भातील बँक स्टेटमेंट
- ट्रस्टच्या सर्व बँक खात्यांची माहिती.
- ट्रस्टचे वित्तीय वर्ष २००० ते प्रासंगिक वर्ष २००२ पर्यंतचे आयकर विवरणपत्रे, उत्पन्न व खर्च तपशील.

शहरातील काही नामांकित बांधकाम व्यावसायिक व डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन **उर्वरित. स्पोर्ट्स**

**उपोषणाचा तिसरा दिवस** • भूसंपादन अधिकारी, प्रांत अधिकाऱ्यांनी घेतली भेट

# घोटी-त्र्यंबकेश्वर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनाविरोधात आंदोलन सुरूच

प्रतिनिधी | घोटी

घोटी ते त्र्यंबकेश्वर या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० साठी भूसंपादन करू नये या मागणीसाठी इगतपुरी तालुका कृती समिती गेल्या महिन्याभरापासून शासकीय कार्यालयांत पाठपुरावा करत आहे. भूसंपादनावर शेतकऱ्यांनी घेतलेल्या हरकतींवर कुठलाही विचार न करता व शेतकऱ्यांची बाजू समजून न घेता अधिसूचना प्रसारित केली आहे. प्रशासनाकडून कुठलीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने कृती समितीने आता आहुर्ली येथे साखळी उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाचा रविवारी तिसरा दिवस होता.

शासनाने सिंहस्थाच्या नियोजनात घोटी - त्र्यंबकेश्वर मार्गाच्या चौपदरीकरणासाठी व रुंदीकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू केल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. कृती समितीचे अध्यक्ष नागेश गायकर, सचिव गोरख बाजे, सल्लागार सदस्य अरुण पोरजे, उपाध्यक्ष सपन परदेशी, विवेक कुटके, सहसचिव ॲड. भरत कोकणे तसेच प्रकल्पग्रस्त गावांतील शेतकरी उपोषणात सहभागी झाले आहेत. उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, भूसंपादन अधिकारी रवींद्र भारती, नायब तहसीलदार धनंजय लचके, राष्ट्रीय महामार्ग अधिकारी संतोष अहिरे, पोलीस उपअधीक्षक हरीश खेडकर यांनी उपोषण स्थळी भेट दिली. मात्र, प्रकल्पबाधित शेतकरी अजूनही भूमिकेवर ठाम आहेत.

## चौपदरीकरणाला विरोध करण्यावर शेतकरी ठाम



शेतकऱ्यांच्या कृती समितीचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू होते. अधिकाऱ्यांनी, नेत्यांनी येथे भेट दिली.

### राजकीय पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य उदय जाधव, भाजपाचे भास्कर गुंजाळ, उत्तम भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस उमेश खातळे, ॲड. खातळे, शेतकरी संघटनेचे बाळासाहेब धुमाळ तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी आणि आहुर्ली परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आदींनी उपोषणस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला.

### शेतकऱ्यांचा विचार करून भूसंपादन थांबवा

*विविध प्रकल्पासाठी इगतपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सातत्याने संपादित होत आहेत. आता घोटी- त्र्यंबकेश्वर या राष्ट्रीय महामार्गासाठी मोठ्या प्रमाणात जमिनी संपादित होत असल्यामुळे व्यावसायिक व शेतकरी भूमिहीन होत आहेत. त्यामुळे शासनाने तालुक्यातील या शेतकऱ्यांचा विचार करून भू संपादन त्वरित थांबवावे, अशी आमची मागणी आहे.*

– नागेश गायकर, अध्यक्ष, शेतकरी कृती समिती

# गौण खनिजांचे अवैध उत्खनन, ४ गुन्हे दाखल

## मालेगाव तालुक्यात १३ लाख रुपयांचा दंड वसूल

**प्रतिनिधी** | मालेगाव

तालुक्यातील गौण खनिजाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाने धडक कारवाया सुरू केल्या आहेत. मागील साडेसात महिन्यांत १२ ठिकाणी छापे टाकून चार गुन्हे दाखल केले आहेत. १७ लाखाचा दंड आकारून १३ लाख १४ हजार ८८८ रुपये दंडापोटी वसूल झाले आहे. केवळ दंडात्मक कारवाई न करता चार वाहने जप्त करत सक्त कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक तसेच बेकायदा वाळू साठे यावर निर्बंध घालण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. तहसीलदार विशाल सोनवणे यांनी मंडळ अधिकारी, तलाठ्यांच्या मदतीने कारवाया हाती घेतल्या आहेत. १ एप्रिल ते १३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत १२ कारवाया केल्या आहेत. विनापरवानगी वाळू वाहतूक करणारी चार वाहने पकडून १३ ब्रास वाळू व १० ब्रास मुरुम जप्त केला आहे. या वाहन मालकांना १७ लाखाचा दंड ठोठावण्यात आला असून त्यापैकी १३ लाख १४ हजार रुपयांचा दंड वसूल झाला आहे. वडनेर खाकुर्डी व छावणी पोलिस ठाण्यात चार गुन्हे नोंदविले आहेत.

एखाद्या भागात अनधिकृतपणे गौण खनिज वाहतूक किंवा उत्खनन होत असल्याचे लक्षात आले तर यासाठी संबंधित मंडळांच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाणार आहे, असे शायकीय सूत्रांनी सांगितले.

### अशी आहे धडक मोहीम

| | |
|---|---|
| ▪ कारवायांची संख्या | १२ |
| ▪ आकारलेला दंड | १७,००,८६३ रु. |
| ▪ वसूल दंड रक्कम | १३,१४,८८८ रु. |
| ▪ शिल्लक वसुली | ३,९६,३७५ रु. |
| ▪ दाखल गुन्हे | ०४ |
| ▪ जप्त वाहने संख्या | ०४ |

### रात्री पथकांची गस्त

*बेकायदा गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरु आहे. वाळू चोरी पूर्णपणे मोडीत काढली जाईल. महसूल कर्मचाऱ्यांना कारवाईच्या सूचना दिल्या आहेत. रात्रीच्या वेळी होणारी चोरटी वाहतूक रोखण्यासाठी पथकांद्वारे लक्ष ठेवले जात आहे. एखाद्या भागात अनाधिकृत वाहतूक किंवा उत्खनन होत असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी जबाबदार असतील.*

***– विशाल सोनवणे**, तहसीलदार, मालेगाव*

# 'रामकाल'चे काम सुरू झाले, साधुग्रामचे केव्हा

## नाराज साधू-महंतांकडून प्रश्न

**प्रतिनिधी** | नाशिक

रामकाल पथ या बहुप्रतीक्षित प्रकल्पाचे भूमिपूजन नुकतेच झाले असले तरी कुंभमेळ्यात प्रमुख ठरणाऱ्या साधुग्राम प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम अद्याप सुरू न झाल्यामुळे अखाडा परिषदेतील साधू-संत आणि महंतांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

३१ ऑक्टोबर २०२६ रोजी कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यात काही महिने उरलेले असतांना साधुग्रामबाबत ठोस निर्णय न झाल्याने या कामाला सुरुवात झालेली नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कुंभ प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत संत समाजाची तातडीने बैठक बोलावून साधुग्रामच्या कामांना गती देण्यात यावी, अशी ठाम मागणी संतांनी केली आहे.

### साधुग्राम अस्वच्छतेच्या गर्तेत

तपोवन परिसरात साधुग्राम विकसित केला जाणार आहे. काही दिवसांपूर्वी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या परिसराचा पाहणी दौरा देखील केला होता. या दौऱ्यात साधुग्रामच्या अस्वच्छतेबाबत साधू=महंतांची देखील नाराजी व्यक्त केली होती.

### मुख्यमंत्र्यांनी तातडीने बैठक घ्यावी



*साधुग्रामचे काम लवकरात लवकर सुरू करण्याची गरज आहे. सिंहस्थ ध्वजारोहण सोहळ्यासाठी अवघे काही महिने उरले असल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी साधू-महंतांची तातडीने बैठक घ्यावी-*

**महंत भक्तीचरणदास**

# कर्ज, नापिकीला कंटाळून शेतकऱ्याने केली आत्महत्या

## औंढा नागनाथ तालुक्यातील सावळी गावात घडलेली घटना

**प्रतिनिधी** | हिंगोली

नापिकी तसेच वडिलांच्या नावे असलेल्या १.१९ लाख रुपयांच्या कर्जाला कंटाळून तरुण शेतकऱ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. औंढा नागनाथ तालुक्यातील सावळी येथे ही घटना घडली आहे. या प्रकरणी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात रविवारी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सावळी येथील सुदाम सखाराम धवसे (४०) यांचे सावळी शिवारात वडिलांच्या नावे सुमारे तीन एकर शेत आहे. या शेतावर त्यांच्या वडिलांनी मागील वर्षी १.१९ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. यावर्षी खरीप हंगामात हाती आल्यानंतर कर्ज फेडू असे त्यांनी कुटुंबियांना सांगितले होते. दरम्यान यावर्षी खरीप हंगामात शेतात सोयाबीन व इतर पिकांची पेरणी केली होती. मात्र जुलै महिन्यापासूनच सुरु झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीमुळे सोयाबीन व इतर पिके हातची गेल्यामुळे सुदाम हे अस्वस्थ झाले होते.

नापिकीमुळे कर्ज कसे फेडावे याची चिंता त्यांना लागली होती. त्यातच त्यांच्या पत्नीचे ऑगस्ट महिन्यात निधन झाले. त्यामुळे ते मानसिक तणावाखाली आले होते. दरम्यान, नापिकी, कर्ज कसे फेडावे तसेच पत्नीचे निधन यामुळे त्यांना नैराश्य आले होते. त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी दादाराव धवसे यांनी दिलेल्या माहितीवरून रविवारी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. जमादार रवीकांत हरकाळ पुढील तपास करीत आहेत.

**नियोजन** • तपोवन परिसरातील १२०० एकर जागेवर साकारणार साधुग्राम

# साधुग्रामसाठी मनपाच्या ५४ एकरवरील १६७० वृक्षांवर फुली, ४० % तोडणार

**प्रतिनिधी** | नाशिक

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवन परिसरात १२०० एकरवर साधुग्राम विकसित करण्यात येणार आहे. या नियोजनाचा एक भाग म्हणून येथील पालिकेच्या ५४ एकरवरील १६७० वृक्षांवर पिवळ्या रंगाची फुली मारली असून त्यापैकी ४० टक्के वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जाईल. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ध्वजारोहण सोहळ्याने अधिकृतरित्या कुंभास सुरुवात होईल. यानंतर साधू-महंतांचे आगमन होईल. नाशिकमध्ये वैष्णव पंथाच्या ३ आखाड्यांचे साधू स्नान करतात. त्यांना राहण्यासाठी साधुग्राममध्ये नियोजन केले जाते. याच पार्श्वभूमीवर पालिकेने साधुग्रामच्या विकासासाठी जनार्दन स्वामी आश्रम ते बटुक हनुमान मंदिरापर्यंतच्या परिसरातील वृक्षांची मोजणी केली. यात सर्वाधिक बाभूळ वृक्ष व झुडपे आहे. साधुग्रामसाठी भूखंड मोकळा करण्याची गरज असल्याने झाडांची कत्तल अपरिहार्य ठरण्याची शक्यता आहे.

## साधुग्राम उभारण्यासाठी भूखंड मोकळा करणार



पालिकेने वृक्षांवर पिवळ्या रंगात फुल्या मारल्या आहेत.



बटुक हनुमान मंदिर परिसरातील वृक्षांवर फुली

### पर्यावरणप्रेमींची 'कंझर्वेशन विथ डेव्हलपमेंट'ची मागणी

तपोवन परिसरातील ही झाडे अनेक वर्षांपासून उभी आहेत. साधुग्रामच्या जागेसाठी वृक्ष तोड गरजेची असली तरी पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे 'कंझर्वेशन विथ डेव्हलपमेंट' या धोरणाची मागणी केली असून, शक्य तितक्या झाडांचे स्थलांतर करण्याचे आवाहन या पर्यावरणप्रेमींकडून करण्यात येत आहे.

### शासनाला अहवाल पाठवला जाणार

साधुग्राम विकसित करण्यासाठी तपोवन परिसरातील वृक्षांची गणना करत त्याचा अहवाल शासनाला पाठवला जाणार असून शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार विकासयोजनेचे ठरणारे वृक्ष तोडले जाणार असल्याचे मनपा अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

**परिसरातील मोठे वृक्ष जैसे थे ठेवणार**



• सिंहस्थ कुंभमेळ्यात नाशिकमध्ये येणाऱ्या साधू-महंतांच्या निवासासाठी साधुग्राम उभारण्यासाठी भूखंड मोकळा केला जाईल. यासाठी तपोवन परिसरातील वृक्षांची गणना केली असून बाभूळ, झुडपे तोडली जाणार असली तरी या परिसरातील मोठे वृक्ष जैसे थे ठेवले जाणार आहे.

**-विवेक भदाणे,** उद्यान अधीक्षक, मनपा

## गैरसोय वाढली... 'सिडको'च्या कारभाराविरोधात नाशिकमध्ये संताप, नागरिकांचे हाल

# वारसा नोंदीसाठी न्यायालयाच्या दाखल्याची सक्ती

### नागरिक संघर्ष समितीच्या मागण्या, पर्यायांचा विचार होत नसल्याच्या तक्रारी

**प्रतिनिधी** | सिडको

सिडको प्रशासनाने वारसा हक्क नोंदीसाठी न्यायालयाचा वारसा दाखला (सक्सेशन सर्टिफिकेट) अनिवार्य केल्यामुळे नाशिकमधील हजारो मिळकतधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. सिडकोच्या स्थापनेपासून प्रशासकीय पातळीवर होणारे वारसा नोंदीचे काम तत्कालीन प्रशासकांनी २०१५ नंतर अचानक न्यायालयाकडे ढकलल्याचा आरोप नागरिक संघर्ष समितीने केला आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असून, कौटुंबिक वादही वाढू लागले आहेत.

पूर्वीची पद्धत पाहिल्यास, सिडकोच्या स्थापनेपासून २०१५ पर्यंत मिळकतधारकांच्या वारसा नोंदी सिडको कार्यालयात प्रशासकीय मान्यतेनुसार होत होत्या. मात्र, नियमात बदल करण्यात येऊन २०१५ मध्ये तत्कालीन प्रशासक कांचन बोधले यांनी वारसा नोंदीसाठी न्यायालयाचा वारसा दाखला सक्तीचा केला. याचे गंभीर परिणाम नागरिकांना जाणवले. कारण, न्यायालयात दाखला मिळण्यासाठी किमान सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी लागतो. मिळकतीचा उल्लेख असल्यास, इंडियन सक्सेशन ॲक्टनुसार मिळकतीच्या आजच्या बाजार मूल्याच्या किमतीप्रमाणे मुद्रांक शुल्क भरावे लागते, जे सुमारे ७५ हजार रुपयांपर्यंत असू शकते. यामुळे अनेक प्रकरणे मुद्रांक भरण्यासाठी थांबलेली आहेत. तर काहींना 'फ्लेन' (मिळकतीच्या माहितीशिवाय) दाखला मिळाल्याने पुढील अडचणी येत आहेत.

### नाशिकवर मुंबई महानगराचा नियम का?

नाशिक शहर हे मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या मेट्रोपॉलिटन सिटीमध्ये अद्याप समाविष्ट होत नाही. नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड या शहरांसाठी वेगळे नियम असतानाही, सिडको प्रशासन मुंबई महानगराचा नियम नाशिकला लागू करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नाशिक महापालिका आणि जिल्ह्यातील इतर ठिकाणी आजही वारसा नोंदी प्रतिज्ञापत्रावर घेतल्या जातात. मग सिडकोसाठीच न्यायालयाच्या दाखल्याची सक्ती का, असा संतप्त सवाल सिडकोवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.




नाशिकमध्ये सिडकोची ५० हजारांहून अधिक घरे असून २५ लाखांहून अधिक लोकसंख्या आहे.

### समितीचे पदाधिकारी आक्रमक

सिडको प्रशासनाने घेतलेल्या या अन्यायी भोरणाविरोधात नागरिक संघर्ष समितीचे अध्यक्ष गणेश ठाकूर यांच्यासह धनंजय कुचाडे, दशरथ वाघुर्डे, महेश चव्हाण, काशिनाथ शिंदे आणि सुमन तांबे आदींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सिडको प्रशासनाने त्वरित न्यायालयाच्या वारसा प्रमाणपत्राची अट रद्द करावी, नागरिकांच्या मागण्यांचा विचार करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. मात्र, या मागणीचा विचार न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

### नागरिक संघर्ष समितीने सुचवलेले हे दोन महत्त्वाचे पर्याय सिडको प्रशासनाकडून दुर्लक्षित..

नागरिक संघर्ष समितीने वारसा नोंदी सुलभ व्हाव्यात, यासाठी सिडको प्रशासनाला काही सोपे परंतु महत्त्वाचे पर्याय सुचवले होते. मात्र, प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे.

**पर्याय १ :** व्यक्ती हयात असतानाच मिळकतधारकाकडून वारस नोंदी करून घेणे

**पर्याय २ :** मिळकत हस्तांतरित करतानाच वारसाचा फॉर्म भरून घेणे, जेणेकरून प्रशासकीय पातळीवर वारस निश्चिती सोपी होईल, असे दोन पर्याय समितीने सुचवले होते. समितीच्या म्हणण्यानुसार, हे काम कुटुंबाच्या सहमतीप्रमाणे करणे अतिशय सोपे असतानाही सिडको कार्यालयाने नागरिकांमध्ये कलह निर्माण होतील अशा पद्धतीने न्यायालयाच्या प्रमाणपत्राची अट सक्तीची केली आहे. 'फक्त फ्लेन वारसा प्रमाणपत्रावर मिळकतीच्या नोंदी करण्यात, ही नागरिक संघर्ष समितीची मागणी मान्य करूनदेखील त्यावर त्यांची अंमलबजावणी न करणे हे नागरिकांना मनस्ताप देणारे आहे', असे मतही नागरिक संघर्ष समितीच्या सदस्यांकडून व्यक्त केले जात आहे. या पर्यायांचा विचार केला गेल्यास लाखो सिडकोवासीयांचा वेळ, पैसे वाचतील. शिवाय कौटुंबिक वादही कमी होतील, असा विश्वास समितीने व्यक्त केला आहे.

**कृषी उन्नती योजना** • बियाणांच्या नवीन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदानित किमतीत विक्री

# जिल्ह्यात रब्बी गव्हाचे ९२५, हरभऱ्याचे १६० क्विंटल बियाणे वाटपाचे उद्दिष्ट

**प्रतिनिधी** | मालेगाव

राज्यभरात कृषी उन्नती योजनेतंर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान राबविले जात आहे. रब्बी हंगामात बियाणांच्या नवीन जातींना (वाण) प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना अनुदानित किमतीमध्ये गहू व हरभरा बियाणांचे वाटप सुरु झाले आहे. जिल्ह्यासाठी गव्हाचे फुले समाधान वाणाचे ९२५ तर हरभऱ्याच्या फुले विश्वराज वाणाचे १६० क्विंटल बियाणे वाटपाचे उद्दिष्ट आहे. महाबिजच्या अधिकृत विक्रेत्यांकडून प्रत्येकी २० किलोच्या पॅकिंगमध्ये बियाणे उपलब्ध करून दिले जात आहे.

अतिवृष्टीच्या पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांची लागवड साधारण महिनाभर उशिराने सुरु झाली आहे. या हंगामात गहू व हरभऱ्याची मोठ्या प्रमाणावर लागवड होत असते. शेतकऱ्यांकडून पारंपरिक बियाणांची पेरणी केली जाते. त्यामुळे नवीन जातींच्या बियाणांच्या लागवडीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागाने कृषी उन्नती योजनेतंर्गत बियाणे वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यंदा हरभऱ्याचे नवीन वाण फुले विश्वराज तर गव्हाचे फुले समाधान हे वाण पेरणीसाठी उपलब्ध करून दिले आहेत.



हरभरा बियाणे वाटपप्रसंगी उपस्थित तालुका कृषी अधिकारी भगवान गोर्डे.

### प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य

*बियाणे वाटपात प्रथम येणाऱ्या शेतकऱ्यांना प्राधान्य आहे. तालुक्यात बियाणांचे वाटप सुरु आहे. शेतकरी संख्या वाढल्यास अन्य तालुक्यातून बियाणे उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. बियाणे लाभासाठी शेतकऱ्यांनी सातबारा उतारा, आधारकार्ड झेरॉक्स, ओरिजिनल आयडी ही कागदपत्रे सादर करावीत. - भगवान गोर्डे, तालुका कृषी अधिकारी, मालेगाव.*

**बियाणे वाटप लक्ष्यांक (क्विं.)**

| तालुका | गहू | हरभरा |
|---|---|---|
| नाशिक | ९० | १० |
| निफाड | ७५ | ०० |
| सिन्नर | १२० | ३० |
| येवला | १२० | ३० |
| चांदवड | १०० | २० |
| कळवण | ४० | १० |
| देवळा | ४० | ०० |
| दिंडोरी | १०० | १० |
| मालेगाव | १०० | २० |
| सटाणा | ४० | ०० |
| नांदगाव | १०० | ३० |
| एकूण | ९२५ | १६० |

### एका शेतकऱ्यास एक हेक्टरपर्यंतच लागवड करता येणार

एका शेतकऱ्याला एक हेक्टरपर्यंतच बियाणांची लागवड करता येईल. यासाठी हरभरा बियाणे ७० किलो तर गहू १०० किलो दिले जात आहे. हरभरा बियाणाच्या २० किलो पिशवीची मूळ किंमत २२५० रुपये आहे, यात हजार रुपये अनुदान वजावून शेतकऱ्यांना केवळ १२५० रुपयात हे बियाणे दिले जात आहे. तर गव्हाचे बियाणे किंमत १३०० रुपये असून यात ६०० अनुदान वजावट असल्याने ७०० रुपये भरावे लागत आहे. संपूर्ण जिल्ह्यभरात महाबिजच्या अधिकृत विक्रेत्यांकडे हे बियाणे उपलब्ध आहेत. मालेगाव शहरात पवार ॲग्रो व गजानन सिडस या कृषी दुकानांमधून बियाणांचे वाटप केले जात आहे. शेतकऱ्यांनी या ठिकाणी संपर्क साधून बियाणे न्यावीत असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

रब्बी हंगामात शेतकरी हरभरा, गहू यासह पारंपरिक बियाणांची लागवड करतात. नवीन जातींच्या बियाणांच्या लागवडीस प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने कृषी विभागाकडून ही योजना राबविली जात आहे.

लागवडीनंतर हरभरा बियाणे ९५ ते १०५ दिवसात परिपूर्ण होते. यातून एकरी उत्पादन १५.५३ क्विंटल होते. तर गहू बियाणे ११५ ते १२० दिवसात पीक स्वरूपात तयार होते. याचे बागायतीला एकरी १८ ते २० क्विंटल, उशिरा बागायतीतून १६ ते १८ क्विंटल उत्पादन मिळते. या योजनेचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# दोन वर्षांत ३.५ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचे लक्ष्य, नियोक्त्यांना सवलती

## रोजगार वाढ, सामाजिक सुरक्षा विस्तारासाठी ईपीएफओतर्फे दोन उपक्रम

**प्रतिनिधी** | नाशिक

कामगार आणि रोजगार मंत्रालयांतर्गत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आणि सामाजिक सुरक्षा कवचाचा विस्तार करण्यासाठी केंद्र सरकारने 'प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना (पीएमव्हीबीआरवाय) आणि 'कर्मचारी नोंदणी अभियान (ईईसी) हे उपक्रम सुरू केले आहेत. या योजनेत १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ दरम्यान९९,४४६ कोटींच्या तरतुदीतुन ३.५ कोटीवर नोकऱ्या निर्माण करण्याचे लक्ष्य आहे.

या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भविष्य निर्वाह निधीचे क्षेत्रीय आयुक्त अनिलकुमार प्रीतम व आयुक्त राजेंद्र राजदरकर यांनी केले आहे.

### कर्मचारी नोंदणी अभियान

सामाजिक सुरक्षा कवचाचा विस्तार करण्यासाठी कर्मचारी नोंदणी अभियान २०२५ सुरू केले आहे. याचा कालावधी १ नोव्हेंबर २०२५ ते ३० एप्रिल २०२६ असा असेल. १ जुलै २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान रुजू झालेल्या, परंतु इपीएफ अंतर्गत नोंदणी न झालेल्या कर्मचाऱ्यांच्या समावेशासाठी नियोक्त्यांना एकदाच संधी मिळणार आहे.

### या मिळणार सवलती

- कर्मचाऱ्यांचा पूर्वीचा हिस्सा माफ. नियोक्त्यांना फक्त त्यांचा हिस्सा, व्याज आणि प्रशासकीय शुल्क भरणे आवश्यक.
- दंडाची रक्कम प्रति आस्थापना फक्त १० रुपयांपर्यंत मर्यादित राहील.
- पीएमव्हीबीआरवाय आणि कर्मचारी नोंदणी अभियान २०२५ अंतर्गत नोंदणी करणारे नियोक्ते लाभांसाठी पात्र ठरतील.

# सुरक्षेसाठी सीसीटीव्हीची भूमिका महत्त्वाची

## मालेगावी मंत्री दादा भुसे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | मालेगाव



मालेगाव पोलीस नियंत्रण कक्ष आवारातील सीसीटीव्ही कंट्रोल रूमची पाहणी करताना करतांना मंत्री दादा भुसे. समवेत माहिती देताना अप्पर पोलिस अधीक्षक

शहरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे नागरिकांना सुरक्षित वातावरण देतांनाच संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडत असल्याचे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केले.

मंत्री भुसे यांनी पोलिस नियंत्रण कक्षातील सिसिटीव्ही कॅमेरा कंट्रोल रूमची पाहणी केली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक तेगबीरसिंग संधू यांनी शहरातील प्रमुख चौकांवर कॅमेरांद्वारे ठेवली जाणारी नजर तसेच नियंत्रण रूम मधील कामकाज पद्धतीची माहिती दिली. मंत्री भुसे म्हणाले, मालेगाव शहरात एकूण १५२ अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश असलेले सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित आहेत.

सकाळ

# रस्ते अपघातांत दहा महिन्यांत १६१ बळी

सकाळ EXCLUSIVE



## वेगाचे १३९ बळी; ४२४ अपघातांत ३२२ जखमी

नाशिक, ता. १६ : दिवसेंदिवस वेग जीवघेणा ठरू पाहत आहे. गत दहा महिन्यांत शहरात झालेल्या ४२४ अपघातांत १६१ जणांना आपला जीव गमवावा लागला. यात वेगाच्या मर्यादेचे पालन न करता वाहन भरधाव चालविल्याने तब्बल १३९ चालक मृत्युमुखी पडले आहेत. २०२४ या वर्षभरात रस्ते अपघातांत १८८ जणांचे बळी गेले. अपघातांच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांकडून विविध उपक्रम राबवून जनजागृती केली जाते; परंतु दिवसेंदिवस वाढत्या अपघातांत होणारे मृत्यूंचे प्रमाण हे चिंताजनक आहे.

### २०२५ मधील प्राणांतिक अपघात (ऑक्टोबरअखेर)


| अपघाताचे प्रकार | अपघात | मृत |
|---|---|---|
| रॅश ड्रायव्हिंग | [illegible] | [illegible] |
| धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे | [illegible] | [illegible] |
| मद्यप्राशन करून वाहन चालविणे | ३ | ३ |
| रॉंग साइड वाहन चालविणे | ४ | ५ |
| विनाहेल्मेट वाहन चालविणे | [illegible] | [illegible] |
| सिग्नलचे उल्लंघन | ० | ० |
| विना सीटबेल्ट | १ | १ |
| वाहन चालविताना मोबाईलचा वापर | ० | ० |
| लेन कटिंग | ० | ० |
| अन्य कारणांनी | ३ | ३ |
| एकूण | [illegible] | [illegible] |

### २०२५ मधील अपघातातील मृत आणि जखमी (ऑक्टोबरअखेर)

| अपघात | मृत | जखमी |
|---|---|---|
| पादचारी | [illegible] | [illegible] |
| दुचाकीस्वार | [illegible] | [illegible] |
| [illegible]/प्रवासी | [illegible] | [illegible] |
| लाइट [illegible]/प्रवासी | [illegible] | [illegible] |
| ट्रकचालक | १ | १ |
| ट्रक क्लीनर | ० | १ |
| ट्रक/टेम्पो प्रवासी | [illegible] | [illegible] |
| ट्रॅक्टर प्रवासी | ०० | ०० |
| अन्य | [illegible] | [illegible] |
| एकूण | १६१ | [illegible] |

### या वेळेतच सर्वाधिक अपघात

### ३३ महिलांचा मृत्यू





### राष्ट्रीय महामार्गांवरील अपघात

| महामार्ग | अपघात | अपघाती मृत्यू |
|---|---|---|
| मुंबई-आग्रा महामार्ग | २ | २ |
| नाशिक-पुणे महामार्ग | २ | २ |
| पेठ-त्र्यंबक-नाशिक | २ | २ |

एकूण अपघात ६ — एकूण मृत्यू ६

सकाळ

# नाशिक रोड रेल्वेस्थानकाची सुरक्षा 'रामभरोसे'

## बॅग स्कॅनर बंद; सुरक्षा तपासणीचा भार मेटल डिटेक्टरवरच

नाशिक रोड, ता. १६ : भुसावळ विभागातील सर्व रेल्वेस्थानकांवर रेल्वे प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था वाढवल्याचा दावा केला असला तरी, नाशिक रोड रेल्वेस्थानकावर अनेक दिवसांपासून लगेज बॅग स्कॅनर मशिन बंद असल्यामुळे सुरक्षेच्या तपासणीसाठी सध्या हातातील मेटल डिटेक्टर मशिनचा वापर करावा लागत आहे. नाशिक रोड हे इंडिया सिक्युरिटी प्रेस आणि करन्सी नोट प्रेससारख्या महत्त्वाच्या सरकारी आस्थापनांमुळे भुसावळ विभागातील महत्त्वाचे स्थानक असल्याने येथील सुरक्षाच 'रामभरोसे' आहे.



नाशिक रोड - येथील रेल्वेस्थानकावर नादुरुस्त असलेले बॅग स्कॅनर.

### सध्याचे सुरक्षा उपाय

### सुरक्षेतील मोठ्या त्रुटी

- अजय कुमार,

सकाळ

# संविधान साक्षरतेकडे भक्कम पाऊल

## राज्यस्तरीय 'संविधान गुणगौरव परीक्षा २०२५'

■ सकाळ वृत्तसेवा

लासलगाव, ता. १६ : भारतीय राज्यघटनेतील आदर्श, मूल्ये व नागरिकत्वाची खरी जाण प्रत्येकापर्यंत पोहोचावी, या उद्देशाने सुजाण नागरिक मंच, रायगड व शिलामोती बहुउद्देशीय संस्था, लासलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय 'संविधान गुणगौरव परीक्षा २०२५' आयोजित करण्यात आली आहे.

संविधान दिन २६ नोव्हेंबर २०२५ ला ही परीक्षा राज्यभरातील विविध केंद्रांवर ऑफलाइन पद्धतीने होणार आहे. संविधानाची सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती समजून घेण्यासाठी ही परीक्षा विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांसाठी एक मोठी संधी ठरणार आहे. संविधान साक्षर नागरिक तयार करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण उपक्रम मानला जात आहे.

परीक्षा फी सर्व गटांसाठी : पन्नास रुपये, पुस्तकासह नोंदणी (ऐच्छिक), लहान/मध्यम- १५० (पुस्तक+फी), मोठा गट- ३०० (पुस्तक+फी), तर संपर्कासाठी : नूरखाँ पठाण (रायगड, ९२७२४ ५९४०३), डॉ. चारुदत्त अहिरे (लासलगाव, ९७६५१ २८२८९) यांच्याशी संपर्क साधावा.

### परीक्षेची वैशिष्ट्ये



- परीक्षा तीन गटांत : लहान : आठवीपर्यंत,
- मध्यम : नववी ते बारावी,
- मोठा/खुला गट : बारावीनंतर सर्वांसाठी
- परीक्षेचे माध्यम : मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू
- कालावधी : एक तास
- प्रश्नपत्रिका : ४५ बहुपर्यायी प्रश्न, पाच लघूत्तरी प्रश्न, एकूण १०० गुण
- निकाल घोषणा : १२ जानेवारी २०२६
- राज्यस्तरीय दुसरा टप्पा : ऑनलाइन स्वरूपात
- बक्षीस वितरण समारंभ : २२ जानेवारी २०२६

### अभ्यासक्रम

**लहान व मध्यम गट :** प्राथमिक माहिती, अनुच्छेद ५१(क) पर्यंत

**मोठा गट :** प्राथमिक माहिती, अनुच्छेद १०० पर्यंत सर्व परीक्षार्थींना अभ्यासासाठी पीडीएफ, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, छापील प्रश्नपत्रिका व प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### बक्षिसे


- राज्य स्तरावर : प्रथम- पाच हजार, करंडक
- द्वितीय : तीन हजार, करंडक
- तृतीय : दोन हजार, करंडक
- उत्तेजनार्थ : एक हजार (दोन विजेते)
- केंद्र स्तरावर : सुवर्ण, सिल्व्हर व ब्राँझ पदक
- सर्व परीक्षार्थींना आकर्षक प्रमाणपत्र

Nashik, District Today
17/11/2025 Page No. 3

सकाळ

# विक्रीसाठी जनावरांना ई-टॅगिंगची सक्ती

## बाजार समिती देणार वाहतूक व आरोग्य प्रमाणपत्र



सकाळ वृत्तसेवा

सिन्नर, ता. १६ : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत जनावरे विक्रीसाठी आणताना त्यास इअर टॅगिंग असणे सक्तीचे करण्यात आले आहे. असे टॅगिंग नसलेल्या जनावरांची खरेदी-विक्री होणार नसल्याने पशुपालकांना आता इअर टॅगिंग करून घ्यावे लागणार आहे. याशिवाय इअर टॅगिंग असलेल्या जनावरांना बाजार समितीकडून पशुधन अधिकाऱ्यांमार्फत आरोग्य व वाहतूक परवानाही दिला जाणार आहे.

सभापती श्रीकृष्ण घुमरे, उपसभापती सिंधू कोकाटे, सचिव विजय विखे यांनी पशुपालकांना ई-टॅगिंग करण्याचे आवाहन केले. प्रत्येक रविवारी सिन्नरच्या बाजार समितीत जनावरांचा बाजार भरविला जातो. यात बैल, गाय, म्हैस, घोडा आदी जनावरांची खरेदी व विक्री केली जाते. यात नाशिक जिल्ह्यासह अहिल्यानगर, धुळे, जळगाव, नंदुरबार, पुणे या जिल्ह्यांतून जनावरे विक्रीसाठी येतात.

जनावरांचे ई-टॅगिंग करून त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत सरकारच्या कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने २७ फेब्रुवारी २०२४ ला शासन निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार हे ई-टॅगिंग केले जात आहे.

परंतु अनेक पशुपालकांनी जनावरांचे ई-टॅगिंग केलेले नाही. त्यामुळे अशा जनावरांची खरेदी-विक्री न होऊ देण्याबाबत बाजार समित्यांना कळविले आहे. यानी सिन्नर बाजार समितीकडून रविवार (ता. १६)पासून कडक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जनावरे विक्रीसाठी आणण्यापूर्वी त्याचे पशुपालकांनी आपल्या गावातच पशुधन विभागामार्फत ई-टॅगिंग करून घेणे गरजेचे असल्याचे बाजार समितीने कळविले आहे.

### ...तर मिळणार प्रवेश

- जनावरांच्या बाजाराच्या दिवशी ई-टॅगिंग असलेल्या जनावरांनाच समितीच्या आवारात प्रवेश दिला जाणार आहे. जनावरे विक्रीसाठी येताच त्यांना ई-टॅगिंग केले असल्याबाबत कर्मचारी खात्री करणार आहेत.

### आरोग्य, वाहतूक प्रमाणपत्र मिळणार

- ई-टॅगिंग असलेल्या जनावरांची खरेदी अथवा विक्री झाल्यानंतर त्यांना पशुधन विकास अधिकाऱ्यामार्फत आरोग्य प्रमाणपत्र समितीच्या आवारातच उपलब्ध करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. तर पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्तांकडून वाहतूक परवानाही दिला जाणार आहे.

> ई-टॅगिंग नसलेल्या जनावरांना पशुपालकांनी बाजारात आणू नये. त्यांना खरेदी-विक्रीची पावती मिळणार नाही. त्यामुळे ई-टॅगिंग करूनच जनावरे बाजारात आणावी.
> 
> **- श्रीकृष्ण घुमरे**, सभापती

सकाळ

# लिलावाचा घाट, वाळूसाठी सापडेना वाट



## ४१ पैकी केवळ दहा घाट ठरले पात्र : आचारसंहितेमुळे प्रक्रिया तीन महिने रखडणार

■ गौरव जोशी : सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १६ : जिल्ह्यातील वाळूघाटांच्या लिलावातील अडथळे दिवसेंदिवस वाढत आहेत. पर्यावरणाच्या तांत्रिक मान्यतेत अंतिमतः पात्र ठरलेले दहा घाट आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आचारसंहितेत अडकून पडले आहेत. परिणामी पुढील तीन महिने लिलाव प्रक्रियेला 'ब्रेक' लागला आहे.

राज्यभरातील वाळूघाटांचे लिलाव आणि वाळूतील रॉयल्टीमधून दर वर्षी कोट्यवधींचा महसूल शासनाला मिळतो. पण नाशिक जिल्ह्यात तीन ते चार वर्षांपासून पात्र वाळूघाटांच्या लिलावासाठी प्रशासनाला घाम गाळावा लागत आहे. त्यामागे जिल्ह्यातील वाळूचा घसरलेला दर्जा आणि कमी झालेले प्रमाण ही प्रमुख कारणे सांगितली जातात. पर्यावरणीय परवानग्यांमध्ये जटिलता अधिक असल्याने प्रशासनासमोरील कोंडीत भर पडत आहे. या वर्षीदेखील त्याचा प्रत्यय पाहायला मिळत आहे.

जिल्हा गौणखनिज विभागाने तालुक्यांच्या मदतीने ४१ वाळूघाटांची यादी तयार केली होती. पहिल्या टप्प्यातील तपासणीत केवळ २६ घाट पात्र ठरले. त्यानुसार गौणखनिज विभागाने या घाटांच्या लिलावासाठी तांत्रिक बाबी व अन्य परवानगीची पूर्तता सुरू केली. पण, राज्यस्तरावरून पर्यावरणाचे कारण देत १२ घाटांवर फुली मारण्यात आली. परिणामी,

### वाळूघाटांची स्थिती

| | |
|---|---|
| ■ जिल्ह्यात एकूण घाट : | ४१ |
| ■ पहिल्या टप्प्यात पात्र : | २६ |
| ■ तांत्रिक मान्यतेनंतर पात्र : | १४ |
| ■ अनुसूचित गावांचा विरोध : | ०४ |
| ■ अंतिमतः पात्र ठरलेले घाट : | १० |

शेवटच्या टप्प्यात लिलावासाठी केवळ १४ घाट उपलब्ध झाले. या सर्व घाटांच्या लिलावासाठी गौणखनिज विभागाने पावले उचलली असताना अनुसूचित गावांतील चार घाटांना स्थानिक ग्रामपंचायतींनी अद्यापपर्यंत परवानगी दिली नाही. त्यामुळे गौणखनिज विभागाने अंतिमतः दहा घाटांचे लिलाव करण्याचे ठरविले. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे हे घाटही लिलावापासून दूर आहेत. आता आचारसंहिता संपल्यास फेब्रुवारी उजाडण्याची शक्यता आहे.

### कृत्रिम वाळू धोरण कागदावर

राज्यातील बांधकामांना स्वस्तात वाळू उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कृत्रिम वाळू धोरण आणले आहे. १ एप्रिलपासून लागू केलेल्या धोरणातून नद्यांचे पर्यावरण रक्षण करणे हा मुख्य उद्देश आहे. या धोरणांतर्गत राज्यात कृत्रिम वाळूचे दीड हजार क्रशर सुरू करण्याचे होते. त्यामध्ये जिल्ह्यातील ५० क्रशरचा समावेश होता. मात्र, साडेसात महिने संपुष्टात आल्यानंतरही हे धोरण अद्याप कागदावरच आहे. शासनाने गेल्या महिन्यात नव्याने फक्त काही क्रशरसाठी ऑनलाइनऐवजी ऑफलाइन अर्ज स्वीकारण्याचे आदेश दिले. परंतु हे आदेशदेखील आचारसंहितेच्या कचाट्यात सापडले आहेत. त्यामुळे जनतेला नैसर्गिक सोडाच, पण कृत्रिम वाळूही उपलब्ध होणे दुरापास्त झाले आहे.

सकाळ

# मातीच्या ढिगाऱ्यांनी व्यापला सेवा रस्ता

## वाहतुकीला अडथळा; 'एनएचएआय' प्रशासनाकडून डोळेझाक

■ सकाळ वृत्तसेवा

नवीन नाशिक, ता. १६ : सिडकोतील महामार्गावर असणारा उड्डाणपूल सातत्याने कोणत्या ना कोणत्या कारणाने वादग्रस्त ठरलेला असतो. कधी पावसाचे पाणी थेट रस्त्यावर गळताना दिसते, तर कधी उड्डाणपुलावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, वाहतूक कोंडी याबरोबरच पाथर्डी फाटा ते मुंबई नाक्यादरम्यान अनेक ठिकाणी उड्डाणपूल सर्व्हिस रोडला जोडल्याने अपघातास ही कारणीभूत ठरले आहेत.

इंदिरानगर, राणेनगर येथील बोगद्याच्या ठिकाणी तर कायमच वाहतूक कोंडी बघायला मिळते. हा सर्व प्रकार बघता एकंदरीतच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नियोजन ढासळल्याचे दिसून येत आहे. अशाच एका प्रकाराकडे दुर्लक्ष झाल्याचा प्रकार निदर्शनास येत आहे. गणेश चौक येथील स्टेट बँक चौक पुढील सचिन हॉटेल जवळील उड्डाणपूल सर्व्हिस रोडला जोडण्याकरिता काम सुरू करण्यात आले होते. परंतु, प्रत्यक्षात उड्डाणपूल जोडला गेला नाही. अनेक दिवस हा मार्ग सुरू होता, परंतु काही कारणास्तव रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे या ठिकाणी रस्त्यावर साचलेला मातीचा ढीग हा जसाच्या तसा असल्याने वाहनांना अडथळा निर्माण होताना दिसत आहे. या भागात सर्व्हिस रोडवर माती दिवसेंदिवस पसरत असून, रोडच्या कडेला ढीग जमा झाल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. कचरा साचण्याचे प्रमाण सुद्धा वाढत चालले आहे.



नवीन नाशिक : सिडकोतील स्टेट बँक चौपाटी येथे सेवा रस्त्यावर पसरलेले मातीचे ढीग.

येथील साचलेल्या मातीमुळे नागरिकांचा अपघात होण्याची दाट शक्यता आहे. रिफ्लेक्टर नसल्यामुळे रात्री एखादे वाहनाचा अपघात होऊ शकतो. महामार्ग प्राधिकरणाकडून येथील रस्त्यावर आलेली माती तसेच वाहतुकीला होणारा अडथळा दूर करून येथील समस्या लवकर मार्गी लावावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



" अनेक महिन्यांपासून मातीच्या ढिगाऱ्याने जवळजवळ अर्धा रस्ता व्यापला आहे. या रस्त्याने मोठ्या प्रमाणात दोन्ही बाजूंनी वाहतूक होत असल्याने वाहतुकीस अडथळा ठरत आहे. परिणामी, सायंकाळी वाहतूक कोंडी होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण याकडे डोळेझाक करीत असल्याचे दिसून येते.

**- कुणाल पाठक**

गांवकरी

www.gavakari.net
17 Nov 2025 - Page 9

# नगरपरिषदेसाठी अर्जांचा आज पाऊस पडणार

## अखेरचा दिवस, इच्छुकांच्या संख्येत वाढ

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आज, सोमवार (दि. १७) हा अखेरचा दिवस असल्याने इच्छुकांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज भरले जाणार आहेत. त्यामुळे आज अर्जांचा पाऊस पडेल, अशी शक्यता आहे.**

जिल्ह्यातील भगूर, सिन्नर, चांदवड, येवला, नांदगाव, मनमाड, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, ओझर, पिंपळगाव बसवंत व सटाणा अशा अकरा नगरपरिषदांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. सुरुवातीचे तीन दिवस अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑनलाइन पोर्टल गतीने सुरू होती. परंतु शनिवारपासून अर्ज भरण्यास वेग आला. प्रशासनाने शनिवार व रविवार असे दोन दिवस अर्ज स्वीकारण्याचे काम सुरू ठेवले होते. आज, सोमवार शेवटचा दिवस असल्याने अर्ज भरण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे.

गेले चार दिवस राजकीय पक्षांकडून नगराध्यक्ष, नगरसेवक पदासाठी कुणाला उमेदवारी द्यायची यासाठी मोठा खल सुरू होता. नांदगावमध्ये शिवसेना शिंदे गट आणि भाजपा यांची युती होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. येवल्याचा पोळा अजूनही कायम असून, नगराध्यक्षपदावरून येथे घोडे अडले आहे.

सटाण्यासाठी नगराध्यक्ष पदासाठी भाजपातून मोठी रस्सीखेच पहावयास मिळत आहे. सिन्नरमध्ये उबाठाचे हेमंत वाजे यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला. त्यामुळे त्यांना भाजपा नगराध्यक्षपदाची उमेदवारी देणार आहे. येथे राजाभाऊ वाजे आणि क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्या गटाकडूनही नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी उमेदवारी देण्यावरून मोठी स्पर्धा दिसून येत आहे. इगतपुरीमध्ये संजय इंदुलकर यांनी भाजपात प्रवेश केल्यामुळे त्यांच्याविरोधात आघाडीचे उमेदवार रिंगणात उतरणार आहेत. पिंपळगाव बसवंतमध्ये दिलीप बनकर आणि भास्करराव बनकर हे एकत्र आल्यामुळे येथे भाजपा आणि शरदचंद्र पवार गट, शिवसेना उबाठा विरोधात आहेत.

भगूरमध्ये शिंदे गटाची नगराध्यक्षपदाची उमेदवारी अनिता करंजकर यांना मिळणार असल्याचे निश्चित आहे. आघाडीकडून प्रेरणा बलकवडे या उमेदवार राहणार आहेत.

त्र्यंबकेश्वरमध्ये भाजपाकडून मोठ्या प्रमाणात इच्छुक असल्याने येथेही मोठी चुरस पाहावयास मिळत आहे.

### उद्या छाननी

उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया आज (सोमवार) दुपारपर्यंत पार पडल्यानंतर उद्या (दि. १८) छाननी होणार आहे. त्यानंतर माघारीची प्रक्रिया होऊन चिन्हांचे वाटप होईल. उमेदवारी अर्ज भरताना त्यामुळेच उमेदवार पुरेशी काळजी घेत आहेत.

### माघारीनंतर चित्र स्पष्ट

नगरपरिषद निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया आज संपणार असली, तरी निवडणुकीचे खरे चित्र माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे. २ डिसेंबरला मतदान होणार आहे, त्यामुळे अवघ्या पंधरा ते बारा दिवसांचा कालावधी उमेदवारांना प्रचारासाठी मिळणार आहे. त्यामुळे उमेदवारांना कमी कालावधीत मतदारांपर्यंत आपली भूमिका पोहोचवावी लागणार आहे.

# नागरिकांकडून जाहीरनामा प्रसिद्ध

म. टा. वृत्तसेवा, मनमाड

निवडणूक कोणतीही असो, राजकीय पक्षांचा व उमेदवारांचा जाहीरनामा ठरलेलाच असतो. त्यातून मतदारांना वेगवेगळी आश्वासने दिली जातात. मात्र, मनमाड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील काही सुजाण नागरिकांनी 'जाहीरनामा मनमाडकरांचा' तयार करून ही आश्वासने पूर्ण करणाऱ्या उमेदवारालाच मत द्या, असे आवाहन केले आहे. हा जाहीरनामा आणि हे वेगळेपण शहरात चर्चेचा विषय झाले आहे.

मनमाडचे रहिवासी गेल्या अनेक वर्षांपासून नागरी सुविधांपासून वंचित आहेत. नगरपरिषदेच्या सर्व करांचा भरणा करूनही नागरी सुविधा योग्यरित्या मिळत नाहीत. आता निवडणुकीच्या निमित्ताने जो उमेदवार शहरातील मुलभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी आपल्याला शंभर टक्के आश्वासित करेल, अशाच उमेदवाराच्या पाठिमागे मतदारांनी उभे राहावे, असे आवाहन या जाहीरनाम्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

मनमाड व्यापारी महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र पारिक, सामाजिक कार्यकर्ते एस. एम. भाले, नरेंद्र कांबळे, मनमाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर सोनवणे, मनमाड ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रताप गुजराथी, साहित्यिक जनार्दन देवरे, ॲड. जावेद शेख, ॲड. क्षीरसागर, रेल्वे कामगार नेते सतीश केदारे आदींनी हा जाहीरनामा तयार करून प्रसिद्धीला दिला आहे.

**मनमाडमधील मतदारांची शक्कल**

**चर्चा तर होणारच**

## जाहीरनाम्यातील मुद्दे

- शहरातील सर्व विकासकामे उदा. सार्वजनिक रस्ते, पूल, शाळा, दवाखाना, स्वच्छतागृहांची बांधकामे दर्जेदार व्हावीत
- विकासकामांबाबत किमान १० वर्षांच्या हमीचे शपथपत्र असावे
- सार्वजनिक रस्त्यांची स्वच्छता दिवसातून दोनवेळा व्हावी
- महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची व्यवस्था असावी
- शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्हावा
- शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत, नद्या प्रदूषणमुक्त कराव्यात
- सर्वसामान्यांसाठी प्रत्येक प्रभागात आरोग्यवर्धनी केंद्र (सरकारी दवाखाना) सुरू करावा
- गोदावरी एक्स्प्रेस पूर्ववत सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत
- पुणे-इंदूर महामार्गासाठी बाह्यवळण रस्त्यासाठी प्रयत्न करावेत
- ग्रामसभेप्रमाणे नगरपालिकेने वर्षातून दोनवेळा १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी विशेष सभा घेऊन नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात

# कुष्ठरोग शोध अभियान; आजपासून व्यापक सर्वेक्षण

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

## २ डिसेंबरपर्यंत घरोघरी होणार तपासणी

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात मागील पाच वर्षांप्रमाणे यंदाही कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येत आहे. आजपासून (दि.१७) ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये व्यापक सर्वेक्षणाद्वारे कुष्ठरोगाचे रुग्ण शोधण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

ग्रामीण भागात प्रत्येक या मोहिमेसाठी नेमलेले एक पथक दररोज २० घरे, तर शहरी भागात २५ ते ३० घरांना भेट देऊन प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करणार आहे. प्रत्येक पथकात एक आशा स्वयंसेविका आणि एक पुरुष स्वयंसेवक सहभागी होणार आहे. ते सलग १४ दिवस सर्वेक्षण करतील. कुष्ठरुग्ण शोध अभियानाच्या राज्यस्तरीय जनजागरण समितीची बैठक आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला आरोग्य सेवा सहसंचालक (क्षयरोग व कुष्ठरोग) डॉ. राजरत्न वाघमारे, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचे सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, दूरदर्शन प्रतिनिधी डॉ. आलोक खोब्रागडे, आकाशवाणी मुंबईचे राजेश शेजवले, अलर्ट इंडियाचे वरिष्ठ प्रोग्रामर विन्सेंट के. ए., 'अपाल'च्या अध्यक्ष माया रणवरे, महाराष्ट्र कुष्ठ पीडित संघटनेच्या सदस्या मदिना शेख, जनसंपर्क अधिकारी विकास सावंत या बैठकीला उपस्थित होते.

**सरपंचांना लिहिणार पत्र**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना तसेच जिल्हाधिकारी व गावांच्या सरपंचांना पत्र लिहून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियानात जास्तीत जास्त कुष्ठरुग्णांचे निदान निश्चितीसाठी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना केल्या. आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे हे अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले.

# रिक्षाची 'कुंडली' अनिवार्य

## चालक-मालकांची माहिती रिक्षात करावी लागणार नमूद; पोलिसांची भूमिका

मटा पाठपुरावा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

बेशिस्त रिक्षाचालक व मालकांविरुद्ध पोलिसांनी धडक कारवाई केल्याने शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बऱ्यापैकी शिस्त लागली आहे. आता पुढील टप्प्यात प्रवाशांना ते प्रवास करीत असलेल्या रिक्षाची इत्थंभूत माहिती रिक्षातच उपलब्ध व्हावी, याबाबतचे नियोजन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

रिक्षाचा मालक, चालक, त्यांचे मोबाइल क्रमांक, रिक्षाचा क्रमांक, बॅच नंबर यासंदर्भातील माहिती आता रिक्षातील चालकाच्या सीटमागील बाजूस नमूद करण्याची भूमिका पोलिसांनी घेतली आहे. रिक्षा संघटनांनीही त्याला सहमती दर्शविल्याने पुढील टप्प्यात त्याची अंमलबजावणी होणार आहे. नाशिक शहरात खिळखिळ्या झालेल्या वाहतूक व्यवस्थेला वठणीवर आणण्यासाठी रिक्षाचालकांवर धडक कारवाई केल्यानंतर आता पोलिसांनी सर्व प्रकारच्या वाहनचालकांच्या दिशेने मोर्चा वळविला आहे. तत्कालीन पोलिस आयुक्तांनी बेशिस्तांकडून निबंध लेखनासह परीक्षा घेत शिस्त लावण्याच्या राबविलेल्या 'पॅटर्न'ची राज्यात चर्चा झाल्यानंतर आता पुन्हा 'बेशिस्तांचे वर्ग' भरणार आहेत. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना ट्रॅफिक एज्युकेशन पार्कमध्ये सक्तीने दोन तासांचे प्रशिक्षण देण्याच्या निर्णयाची आता अंमलबजावणी होणार आहे. त्या पाठोपाठ पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये वाहतूक पोलिस उपायुक्त किरितिका सी. एम. आणि सहाय्यक पोलिस आयुक्त अद्विता शिंदे यांची पथके शहरात बेशिस्त वाहनचालकांसह रिक्षाचालक व मालकांवर दंडात्मक कारवाईसह भारतीय न्याय संहितेनुसार (बीएनएस) गुन्हे नोंदवत आहेत. त्यानुसार गल्लीबोळात किंवा शहरातील कोणत्याही भागात बेशिस्त वाहतूक करणाऱ्या रिक्षाचा फोटो किंवा व्हिडीओ करून व्हॉट्सअॅप हेल्पलाइनवर येत आहेत. त्यानुसार कारवाई करण्याची सूचना सर्व पोलिस ठाण्यांसह वाहतूक शाखांना आयुक्तालयाने केली आहे.



### रात्रीही होणार धरपकड

शहरातील बस स्थानके, रेल्वे स्थानक, प्रमुख चौकांसह रस्त्यालगत असणाऱ्या रिक्षाथांब्यांवर पोलिसांनी कारवाई केल्याने रिक्षाचालकांना शिस्त लागल्याचे दिसते. मात्र, अजूनही सायंकाळी आठनंतर आणि मध्यरात्री बेशिस्त, तसेच संशयास्पद रिक्षा वाहतूक होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी आयुक्तालयाकडे केल्या आहेत. त्यामुळे आता दिवसभरातील कारवायांसह रात्रीदेखील रिक्षाचालकांसह संशयास्पद वाहनचालकांचीही धरपकड होणार आहे. यासंदर्भातील नियोजन आयुक्तालयाने सुरू केल्याचे समजते.

### शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीतील बेशिस्तपणा जैसे थे

रिक्षाचालकांना शिस्त लागली असली, तरी विविध शाळांतील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बहुतांश रिक्षा व व्हॅनचालकांचा बेशिस्तपणा अजूनही कायम आहे. रिक्षासह व्हॅनमध्ये शालेय विद्यार्थी कोंबण्यासह नियमभंग करून सुसाट वाहने चालविण्यात येत आहेत. त्यासंदर्भातही आयुक्तालयास तक्रारी प्राप्त होत आहेत. मात्र, अद्याप प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) व वाहतूक पोलिसांनी शालेय वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केलेली नाही. शालेय वाहतुकीलाही शिस्त लावण्याची अपेक्षा नाशिककर व्यक्त करीत आहेत.



> रिक्षासह चालक, मालकांसंदर्भातील माहिती प्रवाशांना ठाऊक असणे गरजेचे आहे. सिंहस्थात कोट्यवधी पर्यटक व भाविक येतील, त्यांच्या सुरक्षेसाठी रिक्षात संपूर्ण माहिती लावणे अनिवार्य करण्याचे विचाराधीन आहे. रिक्षा संघटनांसोबतही चर्चा झाली असून, लवकरच अंमलबजावणी होईल.
>
> -अद्विता शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतूक

# लसीकरणातील हलगर्जीपणा टाळा

## जिल्हा प्रशासनाचे यंत्रणांना आदेश

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

### महत्त्वाच्या सूचना...

- गाभा समितीअंतर्गत माता मृत्यू आणि बालमृत्यूचा कारणासहित आणि तालुकानिहाय आढावा घेण्यात आला
- एक्युएएस कार्यक्रमांतर्गत हॉस्पिटल व प्राथमिक आरोग्यकेंद्र, आयुष्मान आरोग्य केंद्र यांचे असेसमेंट वेळेत पूर्ण करा
- जिल्ह्यातील माता मृत्यू, बालमृत्यू कमी करण्यासाठी गरोदरपणाच्या तपासण्या व औषधे वेळेवर उपलब्ध करा

ज्येष्ठांसह माता व बालकांच्या आरोग्य व लसीकरणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. आतापर्यंत अपेक्षित लसीकरणाच्या याद्या अद्ययावत नसणाऱ्या तालुक्यातील अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन या विषयाचा पाठपुरावा करा, असे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

जिल्हा टास्क फोर्स व एनएचएम नियामक समितीच्या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आरोग्य यंत्रणेचे लसीकरणाच्या मुद्द्यावरून कान टोचले. कर्मचाऱ्यांनी एनक्यूएएस असेसमेंट वेळेत पूर्ण करावेत, अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या. कीटकजन्य आणि जलजन्य आजारांसह जिल्ह्यातील नागरिकांच्या मानसिक आरोग्याचाही आढावा या बैठकीत घेण्यात आला. या समितीमध्ये १५ व्या वित्त आयोग अंतर्गत आरोग्य केंद्रांच्या बांधकामाचा, राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत इन्फ्ल्यून्झा ए, एच१एन१, डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया इ. आजारांचा व कॉलरा, गॅस्ट्रोसारख्या आजारांचा मागील तीन वर्षांचा आढावा घेण्यात आला.

**'ज्येष्ठांची मदत घ्या'**

नागरी आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आरोग्य अभियानांचे आयोजन करून ज्येष्ठ नागरिक संघांची मदत घ्यावी, आजारांनिहाय ठराविक परिसर पिंजून काढत घराघरापर्यंत जागरुकता पोहोचवावी, मानसिक आरोग्य रक्षणार्थ आत्महत्या जास्त घडणारी ठिकाणे शोधून त्यानुसार सेवेत सुधारणा कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. या बैठकीत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहेते, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. दीपक लोणे, वैद्यकीय अधिकारी बाह्यरुग्ण डॉ. बाळू पाटील, जिल्हा टास्क फोर्स समितीचे इतर सभासद, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, समाज कल्याण अधिकारी उपस्थित होते.

# दिव्यांगांच्या संस्थांसाठी नोंदणी गरजेची

## सामाजिक संस्थांसाठी समाज कल्याणचे आदेश

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमानुसार दिव्यांग व्यक्तींच्या कल्याण, विकास, पुनर्वसन आणि सक्षमीकरणाच्या कार्यात सहभागी असलेल्या सर्व नागरी समाज संघटनांसाठी नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाने नुकत्याच काढलेल्या तातडीच्या सूचनेनुसार जिल्ह्यात कार्यरत सर्व संस्था व संघटनांनी तत्काळ नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. शासनाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी नोंदणी, तपासणी, देखरेख आणि नूतनीकरण प्रक्रियेसाठी मानक कार्यपद्धती निर्धारित केली आहे. नोंदणीसाठीचा अर्ज आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नवीन इमारत, एबीबी सर्कल, त्र्यंबकरोड, नाशिक येथे जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



" वैधनोंदणी प्रमाणपत्राशिवाय कोणतीही संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असल्याचे आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. दिव्यांग व्यक्तींच्या न्याय्य हक्कांसाठी कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी नोंदणी पूर्ण करावी.

– हर्षदा बडगुजर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जि.प.

### नोंदणीसाठी पात्र संस्थेसाठी निकष...

- संस्था सोसायटी नोंदणी कायदा, १८६०; बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० किंवा कंपनी कायदा, २०१३ (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक.
- संस्थेच्या नियमावलीत दिव्यांग सक्षमीकरण, प्रशिक्षण, पुनर्वसन इत्यादी उद्दिष्टांचा स्पष्ट उल्लेख असावा
- संस्थेकडे आरसीआय निकषानुसार पात्र मानवबल उपलब्ध असाव
- आर्थिकदृष्ट्या सक्षम असून, लेखापरीक्षण अहवाल उपलब्ध आवश्यक

# नाशिकचा पारा १०.१ अंशांपर्यंत

**म. टा. खास प्रतिनिधी**, नाशिक

शहरासह जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढत असून, रविवारी (दि. १६) सकाळी १०.१ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. चालू हंगामातील हे आतापर्यंचे नीचांकी तापमान नोंदविले गेले आहे. विशेष म्हणजे निफाडमध्ये नीचांकी आठ अंश सेल्सिअस तापमान नोंदविले गेले असून, थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरपेक्षाही नाशिक जिल्हा 'कूल'ठरला आहे. महाबळेश्वरमध्ये ११.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

सुपीक तालुका अशी ओळख असलेल्या निफाडमध्ये बहुतांश वेळा नाशिकपेक्षा किमान तापमान कमीच असते. आजही ८ अंश किमान तापमानाची नोंद झाली असून, हेदेखील निफाडमधील यंदाच्या हंगामातील सर्वांत कमी तापमान ठरले आहे. मालेगावात रविवारी ११ अंश, तर जळगावात ९ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

# लोकसहभागातून होणार शिवार रस्ते

**दळणवळणाची अडचण दूर करण्यासाठी पुढाकार**

म. टा. वृत्तसेवा, सिन्नर

रस्त्यांच्या शेतशिवार दुरुस्तीसाठी शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता गुळवंचकरांनी ग्रामपंचायत अधिकारी संजय गिरी यांच्या संकल्पनेतून १४ शेत शिवार रस्ते लोकसहभागातून दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ग्रामसभेने स्वतंत्र शेतरस्ता समिती तयार करण्यात आली आहे.



शिवार रस्त्यासंदर्भात आयोजित बैठकीस उपस्थित ग्रामस्थ.

## शेतकऱ्यांची गैरसोय होणार दूर

शिवारातील अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी चिखलातून, ओढ्यातून, वळणाच्या वाटेतून जावे लागते. पिके तयार होतात, पण रस्ता नसल्यामुळे शेतमाल बाजारात नेण्यास विलंब होतो, खर्च वाढतो आणि अनेकदा नुकसान होते. या आपल्या शिवारात चांगले रस्ते झाले, तर शेतमाल वाहतुकीत सुलभता येईल, विद्यार्थी, कामगारांना जाणे-येणे सोयीचे होईल. सर्वांचा गावाचा सर्वांगीण विकास होईल, असा आशावाद गिरी यांनी प्रास्ताविकात व्यक्त केला.

शासनाकडून काही निधी मिळतो, पण त्यातून एकाच वेळी अनेक कामे होत नाहीत. म्हणून ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकसहभागातून शिवार रस्ते दुरुस्त करण्याचा निर्धार आपल्याला करावा लागेल, असे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी संजय गिरी यांनी केले. उपस्थित शेतकऱ्यांनी या आवाहनाला भरघोस प्रतिसाद देत भाऊसाहेब [illegible] यांनी [illegible] ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याचे, संतोष [illegible] यांनी १०० तास जेसीबी उपलब्ध करून देण्याचे जाहीर केले. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.

**या रस्त्यांची होणार दुरुस्ती**

गुळवंच-किर्तांगळी रस्ता, जुना विठोबा मंदिर ते [illegible] रस्ता, [illegible] मळा रस्ता, नवीन विठोबा मंदिर ते [illegible] रस्ता, शिवडी ते जुना मुसळगाव रस्ता, [illegible] मळा ते [illegible] नाली रस्ता, [illegible] मळा ते [illegible] मळा रस्ता, [illegible] ते [illegible] मळा रस्ता, सिन्नर रस्ता ते [illegible] मळा रस्ता, गुळवंच ते [illegible] रस्ता, दगडवाडी ते वाकळ नाली रस्ता, [illegible] वस्ती ते जुना धारणगाव रस्ता, धारणगाव रस्ता ते खोपडी रस्ता व दगडवाडी धारणगाव रस्ता, अशा १४ रस्त्यांसाठी सर्वसंमतीने स्वतंत्र शेतरस्ता समिती तयार करून नियोजन करण्यात आले आहे.

# बिबट्यांसाठी 'एआय'

## यंत्रणा उभारण्याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांचे सूतोवाच

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक

बिबट्यांच्या दहशतीवर मार्ग काढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राच्या (एआय) आधारे यंत्रणा उभी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बिबट्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी नसबंदी हा शेवटचा पर्याय असल्याचे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी रविवारी नाशिकमध्ये स्पष्ट केले.

श्रीमद जगद्गुरू रामानंदाचार्य दक्षिणपीठ येथे वृक्षारोपण संकल्पपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने नाईक नाशिक दौऱ्यावर आले होते. पुणे, अहिल्यानगरसह नाशिकमध्ये बिबट्यांकडून झालेल्या हल्ल्यांविषयी त्यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, बिबट्यांकडून लहान मुले, माणसांसह जनावरांवरही हल्ले होत आहेत. हे हल्ले दु:खदायक आहेत. आपल्याकडे बिबट्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास कुत्रे फिरतात तसे बिबटे रस्त्यांवर फिरताना दिसतील. याच पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. १७) पुण्यात केवळ बिबट्यांच्या संदर्भातील उपाययोजनांवर बैठक बोलावल्याची माहिती नाईक यांनी दिली. बिबट्यांची नसबंदी हा उपायांमधला अंतिम टप्पा असून, गरज भासल्यास तसा निर्णय घेतला जाईल. तूर्तास या समस्येवर मार्ग काढण्यासाठी 'एआय'वर आधारित यंत्रणा उभी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. बिबट्यांना वनतारा किंवा आफ्रिकेत पाठविण्याचा निर्णय केंद्र सरकारच्या अखत्यारितील असल्याचे ते यावेळी म्हणाले.



वनमंत्री नाईक यांनी बिबट्याच्या हल्ल्यात जखमींची भेट घेतली.

### ..तर उष्माघाताने होतील मृत्यू

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून 'एक वृक्ष आईच्या नावे' राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाची जगभरात चर्चा होत आहे. अनेक देश भारताचे अनुकरण करत आहेत. आपल्याकडे महिनाभरात १ लाख ११ हजार ४२४ वृक्षांची लागवड करण्यात आल्याची माहिती नाईक यांनी दिली. वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. वृक्ष लागवड कमी झाल्यास भविष्यात उष्माघाताने नागरिकांचा मृत्यू होईल अशी भीती त्यांनी यावेळी व्यक्त केली. पर्यावरण रक्षणासाठी इलेक्ट्रिक वाहन हाच चांगला पर्याय असल्याचे ते म्हणाले.

### जखमींना दिला धीर

शहरातील गंगापूररोड लगतच्या कामगारनगर परिसरात शुक्रवारी बिबट्याने केलेल्या हल्ल्यात पोलिस, वनरक्षकासह इतर नागरिक जखमी झाले. नाशिक दौऱ्यावर आलेल्या वनमंत्री गणेश नाईक यांनी श्रीगुरुजी रुग्णालयात भेट देऊन सर्व जखमींच्या तब्येतीबाबत विचारपूस केली. त्यांच्या धाडसाचे कौतुक करून नातेवाइकांना धीर दिला. लोकवस्तीत आलेल्या बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाकडून शर्थीचे प्रयत्न सुरू होते. अखेरीस त्याला जेरबंद करण्यात यश आले. परंतु, यादरम्यान बिबट्याने दोन वनरक्षकांसह पाच जणांवर हल्ला करून त्यांना जखमी केले. परिसरात गस्त वाढवली असून, नागरिकांनी सावधानता बाळगावी असे आवाहन नाईक यांनी केले.

# नाशिकसह चार विभागांचे संघ उपांत्य फेरीत

**राज्य शालेय खो-खो स्पर्धा**

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, नाशिक यांच्या वतीने सुरू असलेल्या राज्य शालेय खो-खो स्पर्धेत रविवारी (दि. १६) झालेल्या सामन्यात नाशिकसह मुंबई, लातूर, कोल्हापूर, पुणे विभागांचे संघ उपांत्य फेरीत दाखल झाले.



नाशिकमध्ये १९ वर्षे मुले आणि मुली या वयोगटाच्या महाराष्ट्र राज्य आंतर विभागीय खो-खो स्पर्धेचे आयोजन मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलाच्या क्रीडांगणावर करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये मुंबई, पुणे, लातूर, अमरावती, कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या आठ विभागाच्या विजेत्या संघांच्या आठ मुले आणि आठ मुली या संघाचा समावेश आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी आठ संघामध्ये 'अ' आणि 'ब' असे दोन गट करून गटवार साखळी सामने खेळविले गेले. या साखळी सामन्यांच्या निकालानुसार मुलांच्या गटातून पुणे, लातूर, मुंबई आणि कोल्हापूर या चार संघांनी आपल्या गटामधून उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला, तर मुलींच्या गटामध्ये कोल्हापूर, मुंबई, लातूरसह यजमान नाशिकच्या संघाने उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. मुलींच्या 'ब' गटात नाशिक आणि कोल्हापूर यांच्यामध्ये खेळल्या गेलेल्या निर्णायक साखळी सामन्यात पहिल्या सत्रात दोन्हीही संघांची ५-५ अशी बरोबरी होती. दुसऱ्या सत्रात शेवटच्या दीड मिनिटात कोल्हापूर संघाने चांगला खेळ करीत दोन गुण मिळवीत हा सामना जिंकून गटामध्ये पहिल्या क्रमांकाने उपांत्य फेरी गाठली आणि नाशिकला दुसरा क्रमांक मिळाला. आता उपांत्य फेरीमध्ये मुलांच्या गटामध्ये पुणे विरुद्ध कोल्हापूर आणि लातूर विरुद्ध मुंबई अशा लढती रंगतील. मुलींमध्ये कोल्हापूर विरुद्ध लातूर आणि मुंबई विरुद्ध नाशिक असे चुरशीचे सामने बघायला मिळणार आहेत.

# 'आरोग्य'मार्फत प्रमाणपत्रे ऑनलाइन

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना तात्पुरते पदवी प्रमाणपत्र देण्यासाठी ऑनलाइन स्टुडंट पोर्टलचे उद्घाटन विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अजय चंदनवाले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. चंदनवाले म्हणाले की, विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व इतर काही कामांसाठी तात्पुरत्या पदवी प्रमाणपत्रासाठी अधिक काळ थांबावे लागत होते. विद्यापीठाच्या ऑनलाइन पोर्टलमुळे तात्पुरते पदवी प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना मूळ पदवी प्रमाणपत्रासाठी पदवी प्रदान समारंभापर्यंत थांबावे लागत असे. मात्र, या सुविधेमुळे विद्यार्थ्यांचा लाभ होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले की, निकालानंतर स्टुडंट पोर्टलवर तात्पुरते पदवी प्रमाणपत्र हजार रुपयांचे शुल्क भरून उपलब्ध होणार आहे. तसेच या ऑनलाइन पोर्टलमुळे विद्यार्थ्यांचा वेळ व पैशांची बचत होणार आहे.

दै.लोकसत्ता

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# पाडकामानंतरही बी. डी. भालेकर शाळेचीच उभारणी

## विश्रामगृह बांधण्याचा प्रस्ताव रद्द

लोकसत्ता प्रतिनिधी

**नाशिक :** आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवर्ती भागातील बी. डी. भालेकर माध्यमिक शाळा पाडून त्या ठिकाणी विश्रामगृह बांधण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने घेण्यात आला होता.

मराठी शाळा पाडून विश्रामगृह बांधण्यास माजी विद्यार्थी, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते यांनी कडाडून विरोध दर्शविला. शाळा वाचविण्यासाठी आंदोलन सुरू केले. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या भूमिकेने मनपा प्रशासनाला शाळेच्या ठिकाणी विश्रामगृह बांधण्याचा निर्णय अखेर रद्द करावा लागला.

बी डी भालेकर शाळा वाचवा समितीचे आंदोलन १६ दिवसांपासून सुरू होते. आंदोलकांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांची भेट घेत आपली भूमिका स्पष्ट करण्याचा आग्रह धरला होता.

भुसे यांनी शाळेच्या जागेवर शाळा होणे योग्य ठरेल, हे नमूद केले होते. शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख आणि माजी उपमहापौर अजय बोरस्ते यांनी आंदोलकांची भेट घेतली.

मंत्री भुसे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून आंदोलकांशी चर्चा घडवून आणली. यावेळी भुसे यांनी विश्रामगृह बांधण्याचा निर्णय रद्द झाल्याची माहिती दिली. बी. डी. भालेकर शाळा पुन्हा त्याच ठिकाणी अद्ययावत स्वरूपात सुरू करण्याची जबाबदारी माझी आहे, असे आश्वासन भुसे यांनी दिले. समितीची बैठक लवकरच उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आयोजित करून देण्याचेही त्यांनी मान्य केले.

अजय बोरस्ते यांनी, नाशिक भेटीदरम्यान सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनीही भालेकर शाळेसाठी निधी देण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले. यापुढे मनपा, नगरविकास विभाग आणि शिक्षण विभागाकडून सर्व पाठपुरावा करण्याचे आश्वासन बोरस्ते यांनी समितीला दिले.

समितीच्या आंदोलनामुळेच विश्रामगृहाचा प्रस्ताव रद्द झाला असून हा आंदोलनाचा विजय आहे, अशी भावना आंदोलकांनी व्यक्त केली. आंदोलन स्थगित करण्यात आले. आंदोलनात राजू देसले, दीपक डोके, तल्हा शेख, मनोहर पगारे, डॉ. ठकसेन गोराणे, ॲड. प्रभाकर वायचळे, पद्माकर इंगळे, वसंत एकबोटे आदींचा सहभाग होता.

17/11/2025 | Nashik | Page : 8
Source : https://epaper.loksatta.com

# जिल्हा अहिल्यानगर

दै.सकाळ

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

सकाळ

# शेवगावात वाहतूक कोंडी फुटेना

## आठवडे बाजारामुळे सर्वच रस्त्यांवर वाहनांच्या रांगा

■ सचिन सातपुते : सकाळ वृत्तसेवा

**शेवगाव, ता. १६ : शहरात रविवारी भरणाऱ्या आठवडे बाजारात नेवासे व नगर रस्त्यांच्या बाजूला बसलेल्या विक्रेत्यांमुळे व खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे रस्त्यांच्या दोन्ही बाजूला अस्ताव्यस्त लावलेली वाहने, रस्त्यावरून जाणारी उभाने चाललेली अवजड वाहने, रस्त्यांची झालेली दुरवस्था, यामध्ये आठवडे बाजारातील ग्राहक व विक्रेत्यांची भर पडत असल्याने शहरातील सर्व प्रमुख मार्गांवर दिवसभर वाहतूक कोंडी झाली. साखर कारखान्यांचा हंगाम, नगरपरिषदेची निवडणूक या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याची गरज आहे.**

[illegible]



शेवगाव : नेवासे रस्त्यावर बसलेले भाजी विक्रेते व ग्राहकांमुळे वाट काढताना उभाने चालणारे वाहन.

[illegible]

> [illegible]

मागणी


### वनविभागाकडून पिंजरा, आणखी पिंजरे बसविण्याची मागणी, शेतकऱ्यांमध्ये चिंता

# बिबट्याची जेऊर परिसरात दहशत; कामे खोळंबली

[illegible]

## चापेवाडी, शेटेवस्ती, गवारे वस्तीवर बिबट्या

[illegible]



## परिसरात नागरिकांमध्ये बिबट्याची भीती कायम

[illegible]

## जेऊर परिसरात पिंजरा लावण्याची मागणी

[illegible]



[illegible]

## जेऊरला विविध भागात वारंवार बिबट्याचे दर्शन

[illegible]

**दै.प्रभात** दि.१७ नोव्हेंबर,२०२५

प्रभात

# निधीअभावी ५५७ पाणीयोजनांची कामे ठप्प

## जलजिवनच्या पूर्ण योजनांपैकी अवघ्या ५४ गावात योजना सुरू

**अहिल्यानगर, दि. १६ (प्रतिनिधी)** - केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळख असलेल्या जलजीवन मिशनला गेल्या वर्षभरापासून निधीचे ग्रहण लागले आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील पाणीयोजनांची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. ठेकेदारांना देण्यासाठी निधीच नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. जवळपास ७० ते ८० कोटी रुपयांची बिले थकल्याने अनेक ठेकेदार आता आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांनी पाणीयोजनांची कामे थांबविल्याने सध्या ८३० पैकी ५५७ पाणीयोजनांची कामे बंद झाली आहेत.

प्रत्येक नागरिकाला ५५ लिटर मुबलक शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, हा उद्देश समोर ठेवून केंद्र सरकारने हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला. २०२० पासून या उपक्रमाला सुरुवात झाली. वास्तविक कामे पूर्ण झाली की तत्काळ बिले मिळत होती. त्यामुळे वेळेत बिल असल्याने गतीने कामे होत होती. मात्र, वर्षभरापासून जलजीवन मिशनला निधी मिळाला नसल्याने कोट्यवधी रुपयांची बिले अडकून पडली आहेत. जिल्ह्यात जलजीवनची ८३० कामे सुरू



करण्यात आली असून या योजनेमुळे १२७ गावांना नळाद्वारे शुद्ध पाणी मिळणार आहे. या सर्व योजनांसाठी १ हजार ३३८ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत २७३ पाणीयोजनांची कामे पूर्ण झाली असून त्यापैकी अवघ्या ५४ गावामध्ये योजना सुरू आहे. आतापर्यंत ८९१ कोटीहून अधिक निधी पाणीयोजनांवर खर्च झाला आहे. अर्थात हा खर्च २०२२-२३ ते २०२५-२६ या चार वर्षात याच कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यकाळात खर्च झाला आहे. जलजीवन मिशनची कामांना आतापर्यंत तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. २७३ पाणीयोजनांची कामे पूर्ण झाली असून आतापर्यंत अवघ्या ५४ पाणीयोजना ग्रामपंचायतींना हस्तांतरित करण्यात आल्या.

### कामे ८५ टक्के, खर्च मात्र ६१ टक्केच

पाणीयोजनांची कामे पूर्ण होण्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. त्या तुलनेत निधी आतापर्यंत ६१ टक्के खर्च झाला आहे. ८३० पाणीयोजनांसह आता त्यातील सुधारित ५४ पाणीयोजनांसाठी १ हजार ४५२ कोटींची तरतूद करण्यात आली असून आतापर्यंत झालेल्या कामांवर ८९१ कोटी रुपये खर्च झाले आहेत. हे प्रमाण झालेल्या कामांच्या तुलनेत ६१ टक्के आहे. तर पाणीयोजनांची कामे ही ८५ टक्के झाली आहेत, असा दावा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने केला आहे.

Ahilyanagar Edition
Nov 17, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

लोकमत
मस्ट READ

# कमी दाबाने वीजपुरवठा, रोहित्रांवर संक्रांत

## अरणगाव येथील शेतकरी आंदोलनाच्या तयारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**जामखेड :** तालुक्यातील अरणगाव येथील महावितरणच्या सबस्टेशनमध्ये पाच एमव्हीके केंद्राचे काम पूर्ण होऊन दोन महिने झाले, तरी त्यावरील लिंक लाईन जोडलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सध्या कमी दाबाने व दिवसाआड वीजपुरवठा होतो. रब्बी हंगामातील पेरण्या झाल्या असून, उसाला पाणी दिले जात आहे. त्यात कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने रोहित्र जळण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पाच एमव्हीके ट्रान्सफार्मर लाईनचे काम तातडीने पूर्ण करावे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा पंचायत समितीचे उपसभापती अंकुशराव ढवळे यांनी दिला आहे.

पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, अरणगाव उपकेंद्रातून कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने रोहित्र जळण्याचे प्रमाण वाढले आहे. पाणी असूनही पिकांना पाणी देता येत नाही. महावितरणकडून नवीन रोहित्र मिळण्यास महिना-दीड महिना जातो. तोपर्यंत पिके जळून जातील किंवा उत्पादनात घट होणार असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. पूर्ण दाबाने व दररोज वीजपुरवठा करण्यासाठी अरणगाव सबस्टेशनमध्ये नवीन पाच एमव्हीके ट्रान्सफार्मर बसवल्यास शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील, हे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले. विखे पाटील यांनी तत्काळ दखल घेत निधी दिला व पाच एमव्हीके केंद्राचे काम पूर्ण झाले; मात्र दोन महिने झाले तरी ट्रान्सफार्मरमधून लाईन जोडलेली नाही.



अरणगाव येथील उपकेंद्रात ५ एमव्हीके ट्रान्सफार्मरचे काम पूर्ण होऊनही ते कार्यान्वित नाही.

## बिबट्या, थंडी अन् विजेमुळे शेतकरी त्रस्त

अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला. आता रब्बी हंगामातील पिकांना, फळबागांना, तसेच ऊस, तुरीचे भरणे चालू आहे. वाढती थंडी व बिबट्याची भीती अन् दुसरीकडे दिवसाआड वीजपुरवठा, यामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. एक आठवडा रात्री व एक आठवडा दिवसा, असा वीजपुरवठा होतो. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.

नवीन ट्रान्सफार्मर चालू केल्यास शेतकऱ्यांच्या समस्या सुटतील. पिंपरखेड, हळगाव, पाटोदा, खामगाव वंजारवाडी, धानोरा, डोणगाव, अरणगाव परिसरातील वाड्या-वस्त्या व गावांना याचा फायदा होईल. महावितरण अधीक्षक अभियंत्यांनी दखल न घेतल्यास शेतकऱ्यांसह आंदोलन करण्याचा इशारा ढवळे यांनी दिला आहे.

लोकमत
अहिल्यानगर, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर २०२५

# श्रीगोंद्यामध्ये वनविभागाने लावले १७ पिंजरे, बिबट्या पिंजऱ्यात जाईना

## तालुक्यात बिबट्यांची संख्या शंभरावर : शेतकरी दहशतीखाली, वन विभागासमोर डोकेदुखी

लोकमत न्यूज नेटवर्क



**श्रीगोंदा :** तालुक्यात बिबट्यांच्या संख्या शंभराच्या वर गेली आहे, आपली भूक भागविण्यासाठी आता तो लोकवस्तीत घुसू लागला असून, शेळ्या, मेंढ्या, कुत्री फस्त करीत आहे. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने १७ पिंजरे लावले, मात्र तरीही बिबट्या हुशार निघाला. वनविभागाच्या हातावर तुरी देत बिबटे पिंजऱ्यांना हुलकावणी देत आहे.

राजापूर, दाणेवाडी, पारगाव, आढळगाव, गार, कौठा, बेलवंडी, वांगदरी, हंगेवाडी, लोणी व्यंकनाथ, मढेवडगाव परिसरात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोरून तो शेळ्या, मेंढ्या, कुत्री उचलू लागला आहे. रात्रीच्या वेळी शेतकऱ्यांसाठी शेतावर जाणे धोकादायक बनले आहे. श्रीगोंद्याच्या वन्यजीव विभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली १७ ठिकाणी पिंजरे लावण्यात आले आहेत. वर्षभरानंतर दोन महिन्यांपूर्वी ढवळगाव येथील पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला, मात्र त्यानंतर एकही बिबट्या पिंजऱ्यात अडकला नाही. आता बिबट्याही हुशार झाला आहे. पिंजरा दिसला, तर जवळून जातो, पण पिंजऱ्यात कधी तो जात नाही. नागरिक वनविभागाला बिबट्यावरून लक्ष्य करीत आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी सतर्क भूमिका घेत आहेत, पण बिबटे सापडत नसल्याने वनविभागाची डोकेदुखी वाढली आहे.

> उसाचे क्षेत्र कमी होऊ लागल्याने बिबटे आता मानवी वस्तीकडे येऊ लागले आहेत. तालुक्यात १७ ठिकाणी पिंजरे लावले आहेत. आणखी दहा नव्याने पिंजऱ्यांची मागणी केली आहे, पण बिबट्या पिंजऱ्याकडे येत नाही, ही मोठी समस्या आहे.
>
> **दीपाली भगत,**
> वनपरिक्षेत्र अधिकारी, श्रीगोंदा

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आफ्रिका देशातून चित्ते आयात केले, त्यासाठी कोट्यवधी रुपये मोजले. त्याच धर्तीवर ज्या देशांना बिबटे हवे आहेत, त्यांना बिबटे देऊन आंतरराष्ट्रीय व्यापार करावा, म्हणजे बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण येईल व भारताला त्यातून पैसे मिळतील.
>
> **बबनराव गव्हाणे,** आढळगाव

### ऊसतोडणी मजुरांची मुले असुरक्षित

ऊसतोडणी मजुरांच्या मुले सध्या असुरक्षित आहेत. या मुलांच्या रक्षणासाठी शासन व साखर कारखान्यांनी ऊसतोडणी मजुरांच्या राहुट्यांना सात ते आठ फूट उंचीचे नायलॉन जाळीचे कम्पाउंड करणे आवश्यक आहे. लेकरांचा जीव विचारात घेऊन शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

**महामार्गाची दुरावस्था** ● छत्रपती संभाजीनगर महामार्गावर होतेय वाहतुकीची कोंडी

# मनमाडचा 'अवजड बोजा' पुन्हा माथी

▶ **अहिल्यानगर (वा.)** छत्रपती संभाजीनगर महामार्गाची गेल्या पाच ते सहा महिन्यापासून अत्यंत दुरावस्था झाली आहे. महामार्गावर मोठ मोठाले खड्डे पडलेले आहेत. त्यातच गेल्या काही महिन्यांपासून मनमाड महामार्गावरील अवजड वाहतूक छत्रपती संभाजीनगर महामार्गावर वळविण्यात आली आहे. त्यामुळे छत्रपती संभाजी नगर महामार्गावर वाहतुकीचा बोजवारा उडाल्याचे दिसून येते. त्यातच ११ डिसेंबर पर्यंत मनमाड महामार्गावरील वाहतूक या महामार्गावर वळविण्यात आल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर महामार्गाची खड्ड्यांमुळे दयनीय अवस्था झालेली आहे. खड्ड्यांमुळे महामार्गाची चाळण झालेली असताना मनमाड महामार्गावरील अवजड वाहतूक छत्रपती संभाजीनगर महामार्गावर वळविण्याचा आदेश प्रशासनाकडून देण्यात आल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.



## रस्ता दुरुस्तीची नागरिकांची मागणी

मनमाड महामार्गावरील वाहतूक छत्रपती संभाजीनगर महामार्गावर वळविणाऱ्या अधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या अवस्था पहाण्याची गरज आहे. महामार्ग लगतचे नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. महामार्गाच्या दुरावस्थेमुळे प्रवासी, वाहन चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे महामार्गाची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

## अवजड वाहनांनी रस्त्यावर पडले खड्डेच खड्डे

छत्रपती संभाजीनगर महामार्गावर मोठमोठाली खड्डे पडलेली आहेत. मनमाड महामार्गावरील महामार्गाच्या दुरुस्तीचे काम १२ सप्टेंबर रोजी सुरू करण्यात आलेले आहे. तेव्हापासून मनमाड महामार्गावरील अवजड वाहतूक छत्रपती संभाजीनगर महामार्गाने वळविण्यात आली आहे. मनमाड महामार्गावरील अवजड वाहतूक ११ डिसेंबर पर्यंत छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून चालणार आहे. मनमाड महामार्गाची वाहतूक तसेच छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक यामुळे रस्त्यावर वर्दळ वाढली आहे. छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्यामुळे जेथे काम सुरू आहे तेथे एकेरी वाहतूक करण्यात येते. त्यामुळे वाहतूक कोंडी ही नित्याचीच बनलेली आहे. त्यातच मोठ मोठाले खड्डे असल्यामुळे कंटेनर, ट्रक ठिकठिकाणी नादुरुस्त होऊन महामार्गावर बंद पडलेले पहावयास मिळतात. त्यामुळे देखील वाहतुकीसाठी मोठी अडथळा निर्माण होत आहे.

## महामार्गावरून प्रवास करणे झाले खूपच अवघड !

मनमाड महामार्गावरील अवजड वाहतुकीमुळे छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून प्रवास करणे अवघड झाले आहे. ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र पहावयास मिळते. वर्दळ वाढल्याने तसेच रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याने नेहमीच वाहतुकीचा खोळंबा होत आहे. त्यामुळे प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने पहावे असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

राष्ट्र सह्याद्री
E-pepar - 17 Nov 2025 - Page 4

# राहुरी खुर्दमध्ये धुळीचा कहर

## महामार्ग कामामुळे नागरिक त्रस्त, अपघात वाढले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील सुरू असलेल्या रुंदीकरण आणि दुरुस्तीच्या कामामुळे राहुरी खुर्द परिसरात गेल्या काही दिवसांपासून धुळीचा तीव्र त्रास निर्माण झाला असून स्थानिक नागरिक, प्रवासी आणि व्यापारी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सतत मध्यभागी उखडलेल्या कोरड्या मातीतून सतत हवेत उडणारे धुळीचे ढग संपूर्ण वातावरण प्रदूषित करत आहेत.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत हवेत दाट धुळीचा थर साचत असल्याने घरातील दारे-खिडक्या बंद ठेवूनही धूळ आत शिरते, त्यामुळे छातीत जळजळणेपासून श्वसनाच्या समस्या, डोळ्यांची खाज, खोकल्यासारख्या त्रासाने लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. धुळीचा सर्वाधिक फटका महामार्गावरील मोटारसायकलस्वारांना बसत आहे. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या वेगामुळे उडणारी धूळ डोळ्यांसमोर पांढरा पट्टा निर्माण करते आणि दृश्य मर्यादा पूर्णपणे कमी होते. यामुळे अचानक समोरील वाहन दिसण्यास अडचण, हेल्मेटच्या काचेवर धुळीची पुटे अशा कारणांमुळे अपघातांचे प्रमाण गेल्या काही दिवसांत लक्षणीय वाढले आहे. प्रवाशांचे म्हणणे आहे की, धुळीच्या लोटात कधीही जीवघेणा प्रसंग ओढवेल, अशी भीती सतत वाटते. धुळीचा तडाखा व्यापाऱ्यांनाही तितकाच सहन करावा लागत आहे. दुकानांमध्ये सतत धूळ शिरत असल्याने दिवसात अनेक वेळा साफसफाई करावी लागते. ग्राहक दुकानात येऊन लगेचच बाहेर पडत असल्याने व्यापारावर मोठा परिणाम झाला आहे.एका व्यापाऱ्याने सांगितले, माल झाकून ठेवतो, साफ करतो, पण काही तासांतच सर्व वस्तूंवर धुळीची पुटे बसतात. ग्राहकांना उभेही राहवत नाही. महामार्गाचे काम सुरू असले तरी धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. पाण्याची फवारणी अत्यंत कमी किंवा नाहीच, त्यामुळे रस्त्यावरची धूळ वाहनांच्या वाऱ्याने हवेत उडते. संध्याकाळच्या वेळी धुळीची स्थिती आणखी बिकट होते. तसेच वाहतुकीचे नियंत्रण नसल्याने धूळ, कोंडी आणि आवाजाचा त्रासही वाढला आहे.

### तात्काळ उपाययोजनांची मागणी

राहुरी खुर्द परिसरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारांकडून धूळ नियंत्रणासाठी नियमित पाण्याची फवारणी, महामार्गावरील वाहतूक शिस्त, सार्वजनिक सुरक्षिततेसाठी कडक उपाय, यांची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. नागरिकांचे मत स्पष्ट आहे विकास महत्त्वाचा आहे, पण तो नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करून नको. वाढती धूळ, अपघातांचे प्रमाण, आणि व्यापाऱ्यांची आर्थिक पडझड या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तत्काळ हस्तक्षेप करून धूळ नियंत्रणासाठी ठोस उपाय करावेत, अशी सर्वत्र मागणी होत आहे.

# जिल्हा धुळे

दै.दिव्य मराठी

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

# तीन महिन्यांपासून रुग्णवाहिका नादुरुस्त, आरोग्य सेवा कोलमडली

प्रतिनिधी | कापडणे

येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका तब्बल तीन महिन्यांपासून बंद पडली आहे. त्यामुळे तब्बल ३५ हजार लोकसंख्या असलेल्या कापडणे गावासह परिसरातील १४ गावांची आरोग्य सेवा कोलमडली आहे.

रुग्णांना वेळेवर उपचार मिळावे यासाठी माजी आमदार कुणाल पाटील यांच्या प्रयत्नातून कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्राला रुग्णवाहिका देण्यात आली होती. या रुग्णवाहिकेमुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचले आहे. तीन महिन्यांपूर्वी कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्रातून गरोदर महिलेला धुळे जिल्हा रुग्णालयात घेऊन जात असताना मुंबई-आग्रा महामार्गावरील स्वागत पेट्रोल पंपाजवळ रुग्णवाहिका बंद पडली. त्यानंतर या महिलेला खासगी वाहनातून धुळे शहरात घेऊन जावे लागले. रुग्णवाहिकेची बॅटरी खराब झाली आहे. या घटनेला तीन महिने उलटले आहे. मात्र जिल्हा आरोग्य अधिकारी व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे अद्याप रुग्णवाहिकेची बॅटरी बदलण्यात आलेली नाही. त्यामुळे रुग्णवाहिका तीन महिन्यांपासून धूळखात पडून आहे. रुग्णवाहिका सुरू व्हावी यासाठी आरोग्य अधिकारी डॉ. शब्बीर पावरा यांनी तीन वेळेस पत्रव्यवहार केला आहे.

## गरोदर महिलांची गैरसोय

कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्रावर १४ गावांतील ५० हजार नागरिकांचा भार आहे. या आरोग्य केंद्रात रोज सर्पदंश, श्वानदंश, अपघातासह विविध प्रकारचे रुग्ण येत असतात. यात गरोदर महिलांची सर्वाधिक संख्या असते. मात्र, रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना खासगी वाहनांचा पर्याय शोधावा लागतो. अन्यथा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने दुसऱ्या रुग्णवाहिकेला पाचारण करण्यात येते. मात्र, त्यासाठी रुग्णांना काही वेळा अर्धा तास तर काही वेळा तासभर ताटकळत रहावे लागते.

## चौदा गावांतील रुग्णांना खासगी वाहनाचा पर्याय

कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्रात कापडणेसह देवभाने, सरवड, दापोरा, दापुरी, धनूर, लोणकुटे, तामसवाडी, कौठळ, विश्वनाथ, सुकवड, न्याहळोद, शिरडाणे, वडगाव गावांचा समावेश आहे. या गावांमधील ग्रामस्थांना कापडणे प्राथमिक आरोग्य केंद्र सोयीचे पडते मग पुढील उपचारासाठी येथून पुढे पाठवले जाते. मात्र रुग्णवाहिका तीन महिन्यांपासून बंद असल्याने या गावांमधील ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली आहे.

### फक्त बॅटरीसाठी अडले घोडे

*काही दिवसांपूर्वी लहान बालिकेवर कुत्र्याने हल्ला केला होता. या घटनेत बालिका गंभीर जखमी झाली होती. प्राथमिक आरोग्य केंद्रात बालिकेवर प्रथमोपचार केल्यावर तिला धुळ्याला नेण्यासाठी दुसरी रुग्णवाहिका येईपर्यंत ताटकळावे लागले होते. फक्त बॅटरीसाठी रुग्णवाहिका बंद असणे ही दुर्दैवी आहे.* **अक्षय भदाणे,** सामाजिक कार्यकर्ते

**हलगर्जीपणा** • जिल्हा रुग्णालयातील प्रकार, रुग्ण दीड तास ताटकळले

# एकीकडे रुग्णालयाच्या गैरसोयींबद्दल मंत्र्यांची बैठक, दुसरीकडे महालॅब बंद

प्रतिनिधी | धुळे

नाशिक विभागातील आरोग्याच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी एकीकडे अहिल्यानगर येथे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची बैठक सुरू होती. दुसरीकडे जिल्हा रुग्णालयाच्या आवारात असलेली महालॅब तब्बल पावणेदोन तास बंद होती. त्यामुळे रुग्णांना ताटकळत उभे राहावे लागले. या प्रकारातून महालॅबमधील कर्मचाऱ्यांना लेटलतीफपणा तसेच आरोग्यसेवेबद्दल असलेले गांभीर्य समोर आले आहे.

नाशिक, अहिल्यानगर तसेच धुळे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या तक्रारीनंतर शनिवारी बैठक बोलावण्यात आली होती. नाशिक विभागाची ही बैठक अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी या ठिकाणी झाली. बैठकीला आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर हजर होते. त्यांनी निष्काळजीपणाबद्दल कर्मचाऱ्यांची कानउघाडणी केली. एकीकडे आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठी सूचना दिल्या जात असताना धुळे जिल्हा रुग्णालयात मात्र त्याच्या विपरीत परिस्थिती होती. डॉक्टर-परिचारिका कामावर हजर असताना शनिवारी महालॅब चक्क बंद होती. गुरुवारी व शुक्रवारी या लॅबमध्ये रक्त तपासणी केल्यानंतर अनेक रुग्ण अहवाल घेण्यासाठी सकाळपासून थांबून होते. सकाळी ८ वाजता बाह्यरुग्ण विभाग व इतर विभाग सुरू झाले असताना लॅबला चक्क कुलूप होते. त्यामुळे गर्दी ही वाढत गेली. त्यानंतर सकाळी पावणेदहा वाजता लॅबचे प्रवेशद्वार उघडण्यात आले. तसेच कर्मचारी हजर झाले. या प्रकारातून महालॅबमधील कर्मचाऱ्यांचा लेटलतीफपणा व आरोग्यबद्दल कर्मचाऱ्यांना असलेले गांभीर्य पुन्हा एकदा समोर आले.

## सकाळी आठ वाजेची वेळ, कर्मचारी आले पावणेदहा वाजता


जिल्हा रुग्णालयात असलेल्या महालॅबचे बंद प्रवेशद्वार.

### तपासणीच्या ३०० अहवालांची प्रतीक्षा

ऋतुमानात बदलामुळे काही दिवसांपासून साथीचे आजार वाढले आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात रुग्णांची गर्दी होते आहे. दिवसभरातून रोज सरासरी ९०० ते हजार रुग्ण तपासणीसाठी येत आहे. त्यापैकी किमान ५० ते ७० रुग्णांची रोज रक्त तपासणी होते आहे. त्याही गुरुवार व शुक्रवारी झालेल्या सुमारे ३०० पेक्षा अधिक रुग्णांच्या रक्त तपासणीचे अहवाल शनिवारी दिले जाणार होते. पण रुग्णांना ताटकळत थांबावे लागले.

**३७ दिवसांनी तोच किस्सा :** अगदी अशाच पद्धतीने गेल्या महिन्यात ८ ऑक्टोबरला लॅब चक्क दीड तास बंद होती. त्याची दखल घेत रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी संबंधितांना खडे बोल सुनावले होते. त्यानंतर ही लेटलतीफपणा संपलेला नाही.

**वरिष्ठांकडे केली तक्रार**

*• रुग्णसेवेबद्दल डॉक्टर व स्टाफला सूचना दिल्या आहे. रुग्णालयातील कर्मचारी सूचनांचे पालन करतात. संबंधित लॅब खासगी कंपनी मार्फत चालवली जाते. रुग्णसेवा विस्कळीत होणार नाही. यासाठी लॅबमधील कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना केल्या आहे. तसेच या प्रकरणी वरिष्ठांकडेही तक्रार केली आहे. डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा शल्यचिकित्सक*

लोकमत

मस्ट READ

# कागदी घोडे नाचवणार की मोकाट कुत्र्यांना आवरणार ?

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** शहरात भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या अपघातांच्या आणि चावण्याच्या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत, सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक महत्त्वपूर्ण आणि कडक आदेश दिला आहे. सर्व शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडांगणे, बसस्थानके, रेल्वेस्थानके आणि महामार्ग यांसारखी सार्वजनिक ठिकाणे तातडीने 'श्वानमुक्त' करावीत, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत. तसेच, या ठिकाणांच्या परिसरांना कुंपण घालून कुत्र्यांचा प्रवेश रोखण्याची स्पष्ट सूचना करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी धुळे शहर प्रशासनाने त्वरित पावले उचलणे आवश्यक आहे.

शहरात महापालिकेच्या आरोग्य विभागाने ... महिन्यात ६ हजार भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले आहे. ... कारवाई करणे व निर्बीजीकरणाचा वेग वाढवणे आणि लक्ष्य पूर्ण करणे तसेच आधुनिक निवारागृहांची व्यवस्था करणे अपेक्षित आहे. कुत्रे पुन्हा परिसरात येणार नाहीत यासाठी या जागांना तातडीने कुंपण घालावे किंवा सुरक्षा उपाययोजना कराव्या.

पकडलेल्या भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करून त्यांना नियुक्त केलेल्या निवारागृहांमध्ये हलवावे. ज्या ठिकाणाहून कुत्रे पकडले आहेत, त्याच ठिकाणी त्यांना परत सोडू नये. आदेशाचे पालन न झाल्यास संबंधित नोडल अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाचे प्रमुख वैयक्तिकरित्या जबाबदार असतील.



## सर्वोच्च न्यायालयाचे असे आहेत निर्देश...

शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, बसस्थानके, रेल्वे स्थानके आणि क्रीडांगणे ही सार्वजनिक ठिकाणे तातडीने 'श्वानमुक्त' करावीत. कुत्र्यांचा प्रवेश रोखण्यासाठी परिसराला कुंपण घालणे बंधनकारक. पकडलेल्या कुत्र्यांना निवारागृहांमध्ये हलवावे.

## शहरात कुत्र्यांची दहशत, नागरिक भयभीत..

शहरातील ... परिसर, ... येथे कुत्र्यांचे कळप ... दुचाकीस्वारांना अचानक ... पाठलाग करणे या घटना ... झाल्या आहेत. रात्रीच्या वेळी ही दहशत अधिक वाढते.

## कुत्र्यांना ठेवण्यासाठी निवारागृह आहे कुठे?

महानगरपालिकेकडे ... कुत्र्यांना ठेवण्यासाठी पुरेसे निवारागृह उपलब्ध नाही. शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या २० हजारांवर असून, त्यांच्या निवाऱ्यासाठी जागेचा अभाव आहे. त्यामुळे नाहक नागरिकांना कुत्र्यांच्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते.

## वर्षभरात १७ हजार नागरिकांना चावा

१. सरकारी व खासगी रुग्णालयांमध्ये मागील एका वर्षात १७ हजारांहून अधिक नागरिकांना कुत्रे चावल्याची नोंद झाली आहे. यामुळे प्रतिदिन सरासरी ४८ नागरिकांना उपचारासाठी जावे लागते.

२. कुत्रे चावण्याच्या घटनांमध्ये लहान बालके ... आणि ज्येष्ठ नागरिक मॉर्निंग वॉक किंवा मंदिरात जाताना हे सर्वाधिक बळी ठरत आहेत.

३. उघड्यावर टाकलेला कचरा ... हे कुत्र्यांचे मुख्य खाद्यस्रोत बनले आहे. तसेच, निर्बीजीकरण कार्यक्रमात आलेले ... यामुळे त्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

# जिल्हा जळगाव

दै.साईमत

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

साईमत

# मुक्ताईनगरमध्ये दीड कोटींचा रस्ता गायब

## दोन-अडीच वर्षांपासून रस्ता दुरुस्ती ठप्प; काम कागदोपत्री, नागरिक मात्र त्रस्त

**मुक्ताईनगर । प्रतिनिधी ।**

**तालुक्यात मंजूर झालेल्या रस्ते दुरुस्तीच्या कामांची प्रत्यक्षात कोणतीही प्रगती न दिसता ती फक्त कागदोपत्री दाखवली जात असल्याचे धक्कादायक चित्र उघडकीस आले आहे. तालुक्यातील अनेक भागांत विकासकामांची नुसतीच घोषणा केली गेली, परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र होत नसल्याचे चित्र आता अधोरेखित झाले आहे. रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था असून, नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.**



सन २०२३-२४ मध्ये सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग, जळगाव अंतर्गत मुक्ताईनगर तालुक्यातील विविध रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता तब्बल १५० लाख रुपये (दीड कोटी) निधी विद्यमान आमदार चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला होता. या कामाचे भूमिपूजनही आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. मंजूर रस्त्यात जुने कुंड, जुने घोडसगाव, तरोडा, पिंप्रीअकाराऊत, नवे घोडसगाव ते राष्ट्रीय महामार्ग ७५३ एल. ते मुक्ताईनगर नवीन कोथळी ते रा.म.प्र. जि.मा.-२३ कि.मी. १/०० ते ४/०० या मार्गाच्या सुधारीत दुरुस्तीचा समावेश होता.

यापैकी स्मशानभूमी ते जुने घोडसगाव या रस्त्याचे काम ठेकेदाराने काही प्रमाणात सुरू केले होते. अर्धा ते एक किलोमीटर रस्ता जेसीबीने उखडून कामाला सुरुवात केली गेली. मात्र, त्यानंतर तब्बल दोन ते अडीच वर्षे उलटूनही रस्त्याच्या कामाला गती मिळालेली नाही. विशेष म्हणजे, रस्ता दुरुस्तीसाठी कडेला टाकण्यात आलेली गिट्टी देखील काही दिवसांनी उचलून नेण्यात आली, अशी स्थानिकांची तक्रार आहे.

रस्त्याची कामे पूर्ण झाली असती, तर ढोलारखेडा, सुकळी, नांदवेल, वायला, चिंचखेडा, महालखेडा, कुऱ्हा, वडोदा अशा २० ते २५ गावांचा ४ ते ५ किलोमीटरचा अंतर वाचला असता. आजपर्यंत लोकप्रतिनिधी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने या अर्धवट कामाकडे लक्ष दिले नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. काम कधी पूर्ण होणार? मंजूर झालेले १५० लाख रुपये प्रत्यक्षात खर्च झाले आहेत का? की काम केवळ कागदोपत्री पूर्ण दाखवण्यात आले आहे? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

नागरिकांनी संबंधित विभाग तसेच लोकप्रतिनिधींनी याप्रकरणी तत्काळ लक्ष घालावे, रस्त्याचे काम पुन्हा सुरू करून पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
17 Nov 2025 - Page 5

# बंद पडलेली राज्यातील औष्णिक केंद्रे तातडीने सुरू करा

## पॉवर स्टेशन बचाव कृती समितीची मुख्यमंत्री फडणवीसांना मागणी

**फेकरी, ता.भुसावळ । वार्ताहर**

राज्यातील अनेक औष्णिक विद्युत केंद्रांना कृत्रिमरीत्या बंद ठेवून विजेचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात असल्याचा गंभीर आरोप पॉवर स्टेशन बचाव कृती समिती, महाराष्ट्र प्रदेशने केला आहे. समितीचे अध्यक्ष अरुण दामोदर यांच्या स्वाक्षरीसह मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात या धोरणाविरुद्ध तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला आहे.

समितीने केलेल्या निदर्शनास असे नमूद आहे की, महाराष्ट्रात २१ ते २२ हजार मेगावॅट विजेची दैनंदिन गरज असताना राज्याची उत्पादनक्षमता १३ हजार ६०० मेगावॅटपेक्षा अधिक आहे. तरीही विजेची मागणी नसल्याचे कारण पुढे करून अनेक केंद्रे बंद ठेवण्यात आली आहेत. यामुळे कामगार-अधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून सार्वजनिक वीज निर्मिती कमकुवत करून खाजगी कंपन्यांना लाभ देण्याचा संशय कर्मचाऱ्यांत वाढत आहे. परवडणारे दर, निर्मिती खर्च आणि अंतर्गत व्यवस्था याबाबत व्यवस्थापनाकडे कोणतीही ठोस कार्ययोजना नसल्याचेही समितीने निदर्शनास आणून दिले. कंपनी आर्थिकदृष्ट्या सक्षम करावयाची असेल तर सरकार-व्यवस्थापन-संघटना यांच्यात तातडीने चर्चा व्हावी अशी मागणी समितीने केली आहे. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनास भिमराव भजनघाटे, धनाजी माने, जे.एस. वराडे, विजय पाटील, एस.के. कुंभारे यांच्यासह वर्कर्स फेडरेशन, श्रमिक सेवा संघटना, ग.युनियन आदी विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी समर्थन दिले आहे. संबंधित प्रत उर्जा विभाग, महानिर्मिती आणि राज्यातील सर्व औष्णिक केंद्रांच्या मुख्य अभियंत्यांना पाठविण्यात आली आहे.

लोकमत

# ८१०० भाव तरी सीसीआय केंद्रे ओस; आर्द्रता, नोंदणीचा अडथळा

## खासगी बाजारात भाव वाढीची शेतकऱ्यांची अपेक्षा; भावांतर योजनेसाठी दिल्लीत बुधवारी बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जिल्ह्यात कापूस खरेदीसाठी भारतीय कापूस महामंडळाची केंद्रे सुरू झाली असली तरी, सीसीआयच्या केंद्रावर शेतकऱ्यांचा प्रतिसाद अत्यंत थंड असल्याचे चित्र आहे. खासगी बाजारात कापसाला ६८०० ते ७१०० पर्यंतचा भाव मिळत असताना, सीसीआयच्या केंद्रावर ७७०० ते ८१०० पर्यंतचा चांगला दर मिळत आहे. मात्र, आर्द्रता, शेतकऱ्यांची नोंदणी आणि स्लॉट जाहीर होण्याच्या प्रक्रियेमुळे शेतकरी आपला कापूस येथे आणणे टाळत आहेत.

सीसीआयच्या केंद्रावर शेतकऱ्यांना आपला माल घरूनच भरून घेऊन जावा लागतो, त्यात शेतकऱ्यांना वेगळा खर्च येतो. यासह केंद्रावर जाऊन तो माल घेतलाच जाईल याचीही शाश्वती नसते, त्या तुलनेत जिल्ह्यात अनेक व्यापारी थेट शेतकऱ्यांच्या घरातून माल उचलत आहेत.



### भावांतर योजना राबविण्याची मागणी

कापूस उत्पादकांना दिलासा देण्यासाठी कॉटन असोसिएशन इंडियातर्फे कापसासाठी भावांतर योजना राबवून, शेतकऱ्यांना क्विंटलमागे ५०० चे अनुदान देण्याची मागणी करण्यात आली आहे. या महत्त्वाच्या मागणीवर १९ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे बैठक होणार असून, या बैठकीच्या निर्णयाकडे जळगावच्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. जर ही योजना मंजूर झाली तर शेतकऱ्यांसह खासगी जिनर्सलाही फायदा होणार आहे.

**त्यामुळे अनेक शेतकरी व्यापाऱ्यांना आपला माल ७ हजार ते ७१०० रुपयांच्या भावात विक्री करत आहेत.**

### सीसीआयच्या केंद्रावर या आहेत अडचणी

**१ १२ टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता नको :** सीसीआयच्या केंद्रावर १२ टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता असलेला कापूस स्वीकारला जात नाही. सध्या काढणी सुरू असलेल्या आणि घरात साठवून ठेवलेल्या कापसामध्येही आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्याने शेतकरी नाइलाजाने कमी दरात खासगी बाजारात माल विकत आहेत.

**२ नोंदणीची प्रक्रिया आवश्यक :** ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांना आपला माल विकण्यासाठी प्रथम नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रियेकडे दुर्लक्ष केल्यानेही केंद्रावर गर्दी दिसत नाही.

**३ खासगी बाजारात काही प्रमाणात खरेदी :** आतापर्यंत खासगी बाजारात २ ते ३ लाख गाठींची खरेदी झाली आहे, ही खरेदी गेल्या वर्षाच्या तुलनेने कमीच आहे. मात्र, शेतकरी सीसीआयच्या केंद्रापेक्षा व्यापारी व खासगी जिनर्सकडे माल देण्यामागे हेच दिसते की शेतकऱ्यांना चांगला भाव असूनही अटी-शर्तींचे पालन करणे अधिक कठीण वाटत आहे.

**अनेक शेतकरी खासगी बाजारात भाव वाढतील, या अपेक्षेने आपला माल विक्रीस काढत नसल्याचेही चित्र आहे.**

लोकमत

# कृषी अधिकाऱ्यांना मिळणार लॅपटॉप; बांधावरूनच होणार ऑनलाइन कामे

## जिल्ह्यातील २६० अधिकाऱ्यांसाठी सुविधा ; शेतकऱ्यांचे तालुका कार्यालयाचे हेलपाटे वाचणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कृषी विभागाच्या कामांना अधिक गती देण्यासाठी आणि शेतकऱ्यांची ऑनलाइन कामे सुलभ करण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपातळीवर काम करणाऱ्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांना लवकरच लॅपटॉप मिळणार आहेत. या सुविधेमुळे आता शेतकऱ्यांची सर्व ऑनलाइन कामे गावातच पूर्ण होणार आहेत.

कामानिमित्त विविध गावात जाणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांना असलेल्या ठिकाणाहूनच शेतकऱ्यांची ऑनलाइन कामे पूर्ण करता येणार आहेत. त्यामुळे मंडळ किंवा तालुका कृषी कार्यालयात जाऊन ऑनलाइन माहिती भरण्याचे हेलपाटे वाचणार आहेत. राज्य सरकारने अखेर लॅपटॉप देण्याचा निर्णय घेत, त्यासाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता करण्यात येणार आहे. निर्णयावर येत्या महिन्याभरात अंमलबजावणीला सुरुवात होणार आहे.



सहायक कृषी अधिकारी, तसेच उप कृषी अधिकाऱ्यांना दैनंदिन कामांसाठी लॅपटॉप मिळावा, अशी मागणी संघटनांकडून केली जात होती.

### या अडचणी दूर होणार..

कृषी विभागाचे अधिकारी ग्रामपातळीवरील माहिती भरण्यासाठी मुख्यतः मोबाइलचा वापर करत होते. मोबाइलद्वारे काम करताना अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या. अधिकाऱ्यांचा बराचसा वेळ प्रवासातच जायचा, त्यामुळे कामांना विलंब होत होता.

### शेताच्या बांधावरच कामे झटपट 'अपडेट' होणार

लॅपटॉप मिळणार असल्याने कृषी अधिकाऱ्यांसाठी आता कामाची पद्धत अधिक सोपी होणार आहे. अधिकाऱ्यांना शेताच्या बांधावर किंवा गावातच शेतकऱ्यांची ऑनलाइन माहिती अपडेट करणे शक्य होणार आहे.

**महाडीबीटी आणि अन्य शासकीय योजनांशी संबंधित शेतकऱ्यांची सर्व ऑनलाइन कामे झटपट मार्गी लागणार आहेत.**

या बदलामुळे शेतकऱ्यांचाही मोठा वेळ वाचणार आहे. त्यांना आता वेगळ्या ऑनलाइन कामासाठी तालुका कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही.

> कृषी कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून मागणी होत होतीच, आता शासनानेही हा निर्णय घेतला आहे. कृषी विभागातील कर्मचाऱ्यांसाठी लॅपटॉप मिळणार असल्याने कामात निश्चितच अचूकता आणि वेग येईल. आता शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन माहिती भरण्याची प्रक्रिया सुलभ होईल आणि त्यांची कामे तत्काळ मार्गी लागतील. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि त्रास दोन्ही वाचेल.

**कुर्बान तडवी,** जिल्हा कृषी अधीक्षक

### जळगाव जिल्ह्यात ५३० अधिकाऱ्यांना मिळणार लॅपटॉप

जिल्ह्यातील सुमारे ५३० कृषी अधिकाऱ्यांना ही सुविधा उपलब्ध होईल. या निर्णयामुळे शेतकऱ्यांची ऑनलाइन माहिती भरण्याची कामे पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांचे मंडळ किंवा तालुका कृषी कार्यालयात जाण्याचे हेलपाटे वाचणार आहेत. मात्र, ही तरतूद अद्याप अधिकृतरीत्या झालेली नाही.

# ग्रंथालय कर्मचाऱ्यांची उपेक्षा; मिळणारे वेतन अपुरेच

## तुटपुंज्या पगारात घरखर्च भागविणे झालेय कठीण

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी ग्रंथालये तुटपुंज्या अनुदानावर मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम करीत असून, वर्षानुवर्षे शासन दरबारी ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वाट्याला उपेक्षाच येत आहे. ना वेतनात वाढ होत आहे, ना इतर मागण्या मान्य होत आहेत.

ग्रंथालयांना मिळणाऱ्या अनुदानात ५० टक्के रक्कम वेतनासाठी आणि ५० टक्के वेतनेतर खर्चासाठी असते. परंतु, यातून ग्रंथालय कर्मचाऱ्यांना कुटुंबाच्या उदरनिर्वाहापुरतेही वेतन मिळत नाही. किमान वेतन मिळावे, वेतनात वाढ करावी यासह विविध मागण्या वर्षानुवर्षे शासनाकडे प्रलंबित आहेत. राज्यात ११ हजार १५० ग्रंथालये आणि २० हजार ३२१ ग्रंथालय कर्मचारी कार्यरत आहेत.



## अनुदानाची रक्कम वर्षातून दोनदा मिळते

शासकीय अनुदान मिळाल्यावर, त्यात १० टक्के रक्कम वाचनालय चालविणाऱ्या संस्थेने टाकावी असते.

**शासन अनुदान व १० टक्के असा एकूण रकमेतून निम्मी रक्कम वेतन व निम्मी वेतनेतर कामावर खर्च करायची असते.**

वाचनालयाला अ ते ड या दर्जानुसार कमाल ११,५२,००० ते किमान ४८ हजार रुपये अनुदान आहे.

**अनुदानाची रक्कम वर्षातून दोनदा देण्यात येते.**

## जळगाव जिल्ह्यातील वाचनालयांची संख्या

| दर्जा | संख्या |
|---|---|
| अ | १३ |
| ब | ८० |
| क | १११ |
| ड | २१० |

## शासनाकडून घोषणा होतात पण हातात काहीच मिळत नाही

२००४ मध्ये राज्य शासनाने ग्रंथालयांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात दुप्पट वाढ केली होती. त्यानंतर २०१२ मध्ये ग्रंथालयांच्या अनुदानात दीडपट वाढ करण्यात आली आहे.

याच्या १० वर्षांनी २०२३ मध्ये ६० टक्के वाढ केली गेली. २०२५ मध्ये ४० टक्के अनुदान वाढीची घोषणा करण्यात आली होती. प्रत्यक्षात याचा शासकीय अध्यादेश जारी करण्यात आलेला नाही. राज्यात ग्रंथालय कायदा अस्तित्वात आहे तरीही कर्मचारी वर्ग दुर्लक्षित आहे.

> महाराष्ट्रात जवळपास प्रत्येक जिल्ह्यात शासकीय ग्रंथालय आहेत. तेथील ग्रंथपालांचे वेतन दरमहा १ लाखांच्या जवळपास आहे. त्यांच्याप्रमाणेच शासनाने सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथपालांच्या वेतनातदेखील वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र शासकीय निधी ठेवला हवा. सध्याचे जीवनमान आणि वाढलेला खर्च पाहता वेतनात वाढ होणे गरजेचे आहे.
>
> **अनिल अत्रे,** ग्रंथमित्र

## दोन हजारात काय होते ?

अ वर्ग ग्रंथालयातील ग्रंथपालाला दरमहा १८,००० तर ड वर्गासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्याला २ हजार २०० रुपये वेतन मिळते. तेही अनुदान मिळाल्यावर सहा महिन्यांनी एकत्रित मिळते. आजचे जीवनमान, वाढलेले खर्च आणि महागाई लक्षात घेता दोन हजार रुपये एवढ्या कमी वेतनात कुटुंबाचा चरितार्थ कसा चालवायचा हा प्रश्न ग्रंथालय कर्मचाऱ्यांसमोर असतो.

दै.नवराष्ट्र

दि.१७ नोव्हेंबर,२०२५

navarashtra.com

# वाळू चोरीकडे दुर्लक्ष भोवणार!

## प्रांताधिकारी गोसावींनी पोलिस पाटलाला केले निलंबित, तलाठ्यांना तंबी

जळगाव (प्रा.) । गिरणा नदीपात्रातील भानोस पैकील वाळू उपसाप्रकरणी पोलीस पाटील पुनम देवराज सोनवणे यांना प्रांताधिकारी विनय गोसावी यांनी तडकाफडकी निलंबित केले आहे. त्याचप्रमाणे ग्राममहसूल अधिकारी (तलाठी) महसूल सेवक यांना वाळू चोरी झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याची तंबी दिली आहे. तालुक्यातील खेडी खुर्द व भानोस शिवारातील गिरणा नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा झाल्याची तक्रार करण्यात आली होती. अवैधरित्या उपसा करण्यासाठी वाहतुकीसाठी रस्ते लावण्यात आले होते. या अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध तक्रार करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी पदावरून जाण्याचे निर्देश दिले होते.

### खुलाशानंतर जबाबदारांवरही होणार कारवाई

गिरणा नदीपात्रातील भानोस, खेडी खुर्द पैकील वाळू उपसाप्रकरणी मंडळअधिकाऱ्यांसह तलाठ्यांवरही कारवाई होणार आहे. नोटीसा देऊन त्यांना खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांचे खुलासे प्राप्त झाल्यानंतर याप्रकरणात पुढील कारवाई होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



### कारवाईचा बडगा

त्याअनुषंगाने अपर जिल्हाधिकारी डॉ.श्रीमंत हारकर, गौण खनिज विभागाच्या नायब तहसीलदार यांनी रुपाली काळे यांच्यासह मंडळाधिकारी व तलाठ्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. गिरणा पात्रात हजारो ब्रास वाळू साठा आढळून आल्याने प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला.

### पथकाची नियुक्ती....

पथकाची नियुक्ती नदीपात्रातून उपसा केलेला वाळू साठ्याची चौकी ठेवून नये यासाठी प्रांताधिकारी विनय गोसावी यांनी तहसीलदार शितल राजपूत यांना पथक नियुक्तीचे निर्देश दिले. त्यापार्श्वभूमीवर तहसीलदारांनी १४ मंडळाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ४२ तलाठ्यांचे तिन व ६ पथक घटनास्थळी नियुक्त करण्यात आले आहे.

### लिलाव प्रक्रिया होणार.....

गिरणा नदीपात्रातील भानोस व खेडी खुर्द परिसरात आढळून आलेल्या वाळूचा लिलाव करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालानुसार लिलावाची प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया काढण्यात येणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# जिल्हा नंदुरबार

दै.दिव्य मराठी　　　　　　　　　　　　　　　　　　　　दि.१७ नोव्हेंबर,२०२५

दिव्य मराठी　धुळे सिटी 17-11-2025

**बेपर्वाई •** वेळ मारून नेण्याचा प्रकार; प्रत्यक्ष रस्ता काम सुरू करण्याची मागणी

# महामार्गावरील खड्ड्यांना पुन्हा दिला जातोय खडीसह डांबराचा तोच मुलामा

प्रतिनिधी | नंदुरबार

शेवाळी-नेत्रंग या राष्ट्रीय महामार्गावरील शहर हद्दीतून जाणाऱ्या साधारण तीन किलोमीटरच्या महामार्गावरील खड्ड्यांचे 'राज' आता कायमस्वरूपी झाले आहे. शहरातील वसाहतींचे सांडपाणी, पालिकेच्या पाइपलाइनमधील गळती, वॉल्व्हमधून होणारी गळती होऊन रस्त्यावर येणारे पाणी तसेच पाणी सांडत जाणारी वाळू वाहतुकीची अवजड वाहने आदी सर्व कारणांचा परिणाम थेट रस्त्याच्या स्थितीवर होत आहे. पाणी साचणाऱ्या ठिकाणी रस्त्यावर काही दिवसांतच गुडघाभर खोल खड्डे तयार होतात. या खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल तर होतातच मात्र महामार्ग प्राधिकरणाच्या दुरुस्तीचा दिखाऊ कारभारही चव्हाट्यावर येत असल्याने तीव्र नाराजीचा सूर आहे.

खड्ड्यांची संख्या वाढली, स्थानिकांकडून तक्रारी वाढल्या की महामार्ग प्राधिकरण नेहमीप्रमाणे आपली 'तात्पुरती' उपाययोजना सुरू करते. खडी टाकून त्यावर थोडेसे डांबर ओतून खड्डे बुजवण्याची ही पद्धत गेल्या तीन वर्षांपासून सुरू आहे. पण या कामाची गुणवत्ता नसल्याने व मोठ्या वाहनांच्या रहदारीत हे डांबरी लेप काही तासांतच उखडून निघतात. त्यामुळे लवकरच खड्डे पूर्ववत होतात. त्यात अजून पाणी मिसळले की खड्ड्यांची व्याप्ती वाढून अपघातांना सामोरे जावे लागते.



नंदुरबार शहराबाहेरील राष्ट्रीय महामार्गाची नेहमीप्रमाणे सुरू असलेली डागडुजी.

## निव्वळ खड्डे बुजवण्यावर लाखोंचा खर्च

महामार्ग प्राधिकरण वेळोवेळी लाखो रुपये खड्डे बुजवण्यावर खर्च करते. मात्र हा खर्च 'काम झाले' असे दाखवण्यापुरतीच असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. ठोस दुरुस्ती, मजबूत डांबरी थर, पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना, पाइपलाइनची कायमस्वरूपी दुरुस्ती या करावयाच्या मूलभूत गोष्टी कोणत्याही कामात दिसत नाहीत. परिणामी, काही महिन्यांनी त्याच ठिकाणी तेच खड्डे पुन्हा पुन्हा उखडतात. त्यामुळे नागरिक, वाहनचालक आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

## ६ रुग्णालये अन् पाच चौफुलींचा रस्ता

हा बायपास मार्ग असला तरी शहरातून जातो. या रस्त्यावर किमान पाच ते सहा मोठी रुग्णालये आहेत. तसेच जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी याच मार्गाचा वापर होतो. तळोदा, अक्कलकुवा, शहादा शहरांकडून येणारी सर्व वाहने याच मार्गाने पुढे रवाना होतात. हा रस्ता शेवाळी फाटा ते नेत्रंग असा दुहेरी, चौपदरी मंजूर आहे. शेवाळी फाटा ते नंदुरबार जिल्हा रुग्णालयापर्यंत काँक्रिटीकरण झाले आहे. मात्र येथून पुढे काम होत नसल्याने रस्त्याची अवस्था वारंवार दयनीय होते. आणि त्यामुळे नागरिकांसह वाहनधारकांचे प्रचंड हाल होतात.

लोकमत

# नंदुरबार जेलमध्ये नेताना दोन आरोपींचे पलायन

## चक्कर येत असल्याचे नाटक करून साधली संधी

**धुळे :** अमळनेर पोलिसांच्या ताब्यात असलेले आणि नंदुरबार कारागृहात नेत असलेल्या दोन सराईत आरोपींनी दोंडाईचा तालुक्यातील धावडे गावाजवळ शनिवारी भरदुपारी 'चक्कर' येत असल्याचे नाटक करून पोलिसांना बेड्या काढण्यास भाग पाडले आणि संधी साधून सरकारी वाहनातून पलायन केले. हिंमत रहिंजा पावरा (वय ३२) आणि अबिलाल ऊर्फ अंबालाल बुरड्या खर्डे (वय २७, दोघे रा. सातप्रिंप्री, शहादा) अशी त्यांची नावे आहेत.

न्यायालयीन कोठडी मिळाल्यानंतर पोकॉ. अमोल पंडित करडईकर आणि यशकुमार रवींद्र सपकाळे हे या दोघांना घेऊन सरकारी वाहनातून नंदुरबार मध्यवर्ती कारागृहाकडे जात होते. धावडे गावापुढील हॉटेल नयनजवळच्या चहाच्या टपरीजवळ गाडी आली असता, आरोपी हिंमत पावरा याने अचानक 'चक्कर येत आहे' असे सांगून बेशुद्ध पडल्याचे नाटक केले. पोलिसांनी त्याला बाटलीतून पाणी पाजले आणि तोंडावर पाणी मारले. तरी तो शुद्धीवर येत नसल्याचे पाहून, पोलिसांनी त्याच्या हातातील बेडी काढली. याचवेळी अंबालाल खर्डे यानेसुद्धा तसाच प्रकार केला. पोलिस पाणी पाजून मदत करण्याचा प्रयत्न करत असताना, अंबालालने अचानक सरकारी वाहनाचा दरवाजा उघडला आणि बेडीला झटका देऊन पळ काढला. तो पळत असताना, हिंमत पावरा यानेही दुसऱ्या पोलिस कर्मचाऱ्याला धक्का दिला आणि पळून गेला. पोलिसांनी तत्काळ त्यांचा पाठलाग केला; परंतु दोन्ही आरोपी गर्दीचा आणि परिसराचा फायदा घेऊन फरार होण्यात यशस्वी झाले. पोकॉ. अमोल करडईकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून दोंडाईचा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत

# पपई दरांवरून संघर्षाची ठिणगी; व्यापारी व शेतकऱ्यांत ताणाताण!

## शहादा तालुक्यात पपई तोड बंद, सोमवारी जिल्हाधिकारी यांच्यासमोर बैठक, तोडग्याची शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**शहादा/नंदुरबार :** भारतात पपईची लागवड करण्यात महाराष्ट्र राज्याचा क्रमांक तिसरा आहे. यातील नंदुरबार जिल्ह्यात यंदा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे पपई लागवडीचे क्षेत्र हे नंदुरबार जिल्ह्यात आहे. जिल्ह्यात यंदा साडेसहा हजार एकरावर पपईची लागवड करण्यात आली आहे. या पपईचे उत्पादन निघण्यास प्रारंभ झाला असून दरांवरुन शेतकरी आणि व्यापारी यांच्यात संघर्षाची ठिणगी पडली आहे.

महाराष्ट्रात जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, जालना, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर व सातारा या जिल्ह्यात पपई पिकाची लागवड केली जाते. कमी कालावधीत, कमी खर्चात चांगले उत्पन्न पपई या पिकातून मिळते. पपईचा उपयोग फळ म्हणून खाण्यासाठी तसेच टुटी-फ्रुटी, जॅम, जेली इ. पदार्थ तयार करण्यासाठी होते. पपईच्या पेपेनपासून औषधे, च्युईंगम तयार करतात. नंदुरबार जिल्ह्यातील पपईच्या खरेदीसाठी दिल्ली, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि पंजाब राज्यातील व्यापारी सध्या दाखल होत आहेत. या व्यापाऱ्यांनी ११ नोव्हेंबर रोजी पपई दर नियंत्रण समितीसोबत घेतलेल्या बैठकीत ८ रुपये ११ पैसे प्रतिकिलो दर देण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतू १५ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या फेरीतील चर्चेतून दर कमी करण्याची मागणी व्यापाऱ्यांनी केली होती. यामुळे शेतकऱ्यांनी पपई तोड बंद करण्याचा निर्णय घेत व्यापाऱ्यांची वाहने जप्त करण्याचा इशारा दिला आहे.

**६**
हजार ९०० एकर पपई लागवड जिल्ह्यात आहे.


शहादा येथील बैठकीत दर निश्चिती आणि पपई दरांबाबत चर्चा करताना व्यापारी आणि शेतकरी.

### पणनमंत्री रावल यांची भेट घेत मांडली समस्या

पपई दरांचा तिढा सुटावा यासाठी शेतकऱ्यांनी रविवारी (दि.१६ नोव्हेंबर) रोजी पणनमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेत समस्या मांडली होती. त्यावर मार्ग काढत जयकुमार रावल यांनी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांना सोमवारी दुपारी शेतकरी व व्यापारी यांची बैठक घेत दर निश्चिती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामुळे सोमवारी पपईचे दर निश्चित होणार की संघर्ष पुन्हा वाढणार याकडे लक्ष लागून आहे.

पणनमंत्री रावल यांच्या सूचनेनुसार शेतकरी आणि व्यापारी यांची बैठक नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. पपई उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने भाऊभाई पाटील, डॉ. प्रफुल्ल पाटील, सागर इंदानी, गौतम पाटील, संदीप पाटील, समाधान पाटील आदी पपई दर नियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पणनमंत्री जयकुमार रावल यांना निवेदन दिले होते. बैठकीत जिल्ह्यातील पपई उत्पादक उपस्थित राहणार असल्याची माहिती पपई दर नियंत्रण समितीच्यावतीने कळविण्यात आले आहे.

**८ रुपये**

११ पैसे भाव व्यापारी नाकारत आहेत. परंतु परराज्यात पपईला २२ रुपये दर मिळत असल्याचा दावा शेतकरी करत आहेत. यामुळे शेतकरी आता १४ रुपये प्रतिकिलो दर मागणी करत आहेत.

**परराज्यातील भाव अधिक मग इथेच कमी का..?**

### चार दिवसातच व्यापारी वर्गाने बदलला निर्णय

**१** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पपई दर नियंत्रण समितीचे पदाधिकारी व व्यापाऱ्यांची ११ नोव्हेंबर रोजी बैठक होऊन पपईला प्रति किलो ८ रुपये ११ पैशांचा दर निश्चित करण्यात आला होता. यामुळे तालुक्यात बंद असलेली पपई तोड सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**२** निर्णयाला पाच दिवस उलटल्यानंतर शनिवारी पुन्हा व्यापारी व पपई दर नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी व्यापाऱ्यांनी भाव कमी करा, अन्यथा चिट्ठी काढून शेतकऱ्यांच्या माल खरेदी करू, असे सांगत बैठकीतून माघार घेतली होती. व्यापाऱ्यांच्या या असमन्वयी भूमिकेनंतर पपई उत्पादकांनी १६ नोव्हेंबरपासून पपई तोड बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पपई खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या गाड्या दिसल्यास त्या अडवून जमा करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

लोकमत

# ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत बोकळझर, कळंबू ग्रामपंचायतींची तपासणी

## जळगाव येथील विभागीय पथकाने घेतला आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत बोकळझर ता. नवापूर प्रथम तर कळंबू ता. शहादा ही ग्रामपंचायत द्वितीय आली आहे. या ग्रामपंचायतींची विभागस्तरीय तपासणी जळगाव जिल्हा परिषदेचे जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक राहुल जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली.

यावेळी बोकळझर सरपंच सुमन गावित, उपसरपंच अनिल गावित, राहुल गावित, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजीत मावची, डॉ. अनिल वळवी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी जगदीश गावित उपस्थित होते. कळंबू येथे सरपंच रामराव बोरसे, उपसरपंच हिरालाल देवरे, हरीश भोई, बी. के. पाटील, महेंद्र नाईक, योगेश साळवे, बी. ए. पाटील उपस्थित होते.

दोन्ही गावात स्वच्छतेच्या विविध योजना चांगल्या पद्धतीने राबविल्याचे दिसून आले.



बोकळझर ता. नवापूर येथे विविध कामांच्या पाहणीसाठी जाताना राहुल जाधव. सोबत सुमन गावित यांच्यासह अधिकारी व कर्मचारी.

## नियमानुसार पुरस्कारप्राप्त ग्रा.पं.ची होते तपासणी

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक आर. बी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. २०२३-२०२४ या वर्षात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात नंदुरबार जिल्ह्यात बोकळझर ता. नवापूर या ग्रामपंचायतीने प्रथम तर कळंबू ता. शहादा या ग्रामपंचायतीने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त ग्रामपंचायतींची विभागस्तरीय तपासणी करण्यात येते. तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी दोन्ही ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्यासोबत संवाद साधला. जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका व आशांकडून शिक्षण आणि आरोग्याची माहिती जाणून घेण्यात आली.

## दोन्ही गावात पाहणी

जळगाव जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक राहुल जाधव, सहाय्यक प्रशासन अधिकारी ऋषिकेश महाजन, समाजशास्त्रज्ञ भीमराव कुटाळ यांच्या समितीने दोन्ही गावांना भेटी देऊन तपासणी केली. यावेळी नवापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी देविदास देवरे, सहायक गटविकास अधिकारी किरण गावित, शहादा पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी विकास गवळे, क्षमता बांधणी तज्ज्ञ योगेश वाघमारे, समाजशास्त्रज्ञ कैलास काळोखे आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

समितीने बोकळझर आणि कळंबू ग्रामपंचायत अंतर्गत शाळा, अंगणवाडी तसेच सार्वजनिक ठिकाणी भेटी देऊन तेथील वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेची पाहणी केली. तसेच गावातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन कामांची पाहणी केली. समितीचे अध्यक्ष राहुल जाधव यांनी उपस्थित ग्रामस्थांना अभियानाविषयी मार्गदर्शन करून गावात स्वच्छतेचे सातत्य ठेवण्याचे आवाहन केले.

लोकमत

मस्ट READ

# आचारसंहितेच्या अंमलासाठी आता प्रशासनाचे निर्बंधास्त्र !

## राजकीय पक्षांच्या बैठकांचा सिलसिला काही संपेना

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : राज्य निवडणूक आयोगाने नगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम घोषित केल्यानंतर नगरपालिकेच्या हद्दीमध्ये आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. प्रशासनाने अनेक निर्बंधांचे आदेश काढून आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीला सुरुवात केली आहे.

जिल्ह्यात नंदुरबार, शहादा, नवापूर व तळोदा अशा चार नगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने या नगरपालिकांसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्यामुळे या नगरपालिकांच्या हद्दीत आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज अंतिम झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने निवडणुकीत रंगत भरणार आहे. त्यामुळे या काळात आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, याची खबरदारी प्रशासनाकडून घेतली जात आहे. आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने प्रशासनाने निर्बंध घातले आहेत. त्याचे उल्लंघन केल्यास प्रशासनाकडून कारवाई देखील केली जाणार आहे. त्यामुळे निवडणूक काळात प्रशासनाने ही निर्बंधांचे काटेकोर [illegible] आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी राजकीय पक्षांचे पदाधिकारी, उमेदवार आणि कार्यकर्त्यांना घ्यावी लागणार आहे. सभेत प्रचारासाठी वाहनांवर ध्वनिक्षेपक लावण्यासाठीही पोलिसांची परवानगी आवश्यक आहे. जाहीर प्रचाराच्या वेळा उमेदवारांनी पाळणे आवश्यक असून नियमांचा भंग झाल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

निवडणूक कार्यक्रम घोषित होताच जिल्हास्तरावर निवडणूक अधिकाऱ्यांनी तयारी सुरू केली आहे.



## सध्या हालचाली थंडच

नगरपालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी अद्याप राजकीय हालचाली थंड आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाल्यानंतर हालचालींना वेग येईल. अर्ज माघारीनंतर आणि अंतिम उमेदवार निश्चित झाल्यानंतर खऱ्या अर्थाने निवडणुकीत रंग भरणार आहे.

## सार्वजनिक इमारतीही वापरता येणार नाहीत

राजकीय पक्षांना त्यांचे झेंडे, बॅनर, फलक सार्वजनिक इमारतींवर लावण्यावरही निर्बंध घातले आहेत. रहदारीस अडथळा होऊन अपघात होण्याची शक्यता असल्याने हे निर्बंध घालण्यात आले.

## मोटार गाड्या, वाहनांच्या ताफ्यावरही घातले निर्बंध

उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना मोटार गाड्या, वाहनांचा ताफा वापरण्यावरही निर्बंध घातले आहेत. उमेदवारांना प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची माहिती प्रशासनाला द्यावी लागणार आहे. धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्थांच्या आवारात तात्पुरते पक्ष कार्यालय उघडण्यास निर्बंध घातले आहेत.

## काय आहेत निर्बंध?

राजकीय पक्षांना त्यांचे झेंडे, फलक खासगी जागा, इमारत किंवा आवारात जागा मालकाच्या परवानगीशिवाय लावता येणार नाहीत.

## ध्वनिक्षेपकाचा वापर

वाहनावर ध्वनिक्षेपक लावण्यासाठी पोलिसांची परवानगी घ्यावी लागेल. सकाळी ६ वाजेपूर्वी व रात्री १० वाजेनंतर ध्वनिक्षेपक वापरता येणार नाही.

## आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी पथकांची स्थापना

आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळ्या पथकांची स्थापना केली आहे. नगरपालिकेच्या हद्दीत ही पथके कार्यरत राहणार आहेत. आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास येताच, पथकांकडून कारवाई केली जाणार आहे.

सकाळ



**बोरद** : येथील आरोग्य उपकेंद्राची मध्यवर्ती इमारत.

# बोरद उपकेंद्राचे रूपांतर ग्रामीण रुग्णालयात करा

## ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांची मागणी

**सकाळ वृत्तसेवा**

तळोदा, ता. १६ : तालुक्यातील बोरद येथील प्राथमिक उपकेंद्र हे ब्रिटिशकालीन असून, सर्वात जुने प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. या उपकेंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करावे, अशी अपेक्षा परिसरातील अनेक गावांच्या सरपंच व पदाधिकाऱ्यांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

बोरद येथील प्राथमिक उपकेंद्रास बोरद, मोड, करडे, मालदा, लाखापूर फॉरेस्ट, गोंडाळे, बन, छोटा धनपूर, मोहिदा, कढ्ढमसरे, रांझणी, खरवड, तऱ्हावद, गंगानगर पुनर्वसन, खेडले, खिवानी, धडगावी आदी अतिदुर्गम व सपाटीवरील गावे जोडलेली आहेत. दररोज या प्राथमिक आरोग्य केंद्रातून दोनशे रुग्णांची तपासणी केली जाते. तसेच, परिसराच्या सपाटीवर हे गाव असल्याने कुटुंब नियोजनाच्या केसेस मोठ्या प्रमाणात याच प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात. प्रत्येक शिबिर या आरोग्य केंद्रातून होतात. रक्तदान शिबिर क्षयरोगाबाबत जनजागृती असे विविध आरोग्याबाबतचे उपक्रम याच केंद्रातून होत असतात. तळोदा तालुक्यात बोरद, प्रतापपूर, सोमावल, वाल्हेरी असे प्राथमिक आरोग्य केंद्र असून, सर्वात जास्त रुग्णांची संख्या याच केंद्रात आहे. बोरद प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर व्हावे, अशी परिसरातील सरपंच, विविध क्षेत्रात काम करणारे पदाधिकारी तसेच सदस्यांची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे.

### 'रुग्णांना आरोग्य सुविधा जलद गतीने मिळावी'

बोरद केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर झाले तर परिसरातील जनतेला चांगल्याप्रकारे अजून जास्त आरोग्य सेवा मिळेल. तसेच, विविध आजारांचे लवकर उकलन होईल, डॉक्टरांची संख्या वाढेल, संबंधित अधिकारी कर्मचारी वाढतील. गेल्या तीन वर्षांपूर्वी बोरद प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत सुद्धा बांधण्यात आली आहे. या सर्व बाबींचा विचार करता या जनतेला आरोग्य सुविधा जलद मिळावी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

Dhule, Nandurbar-Today
17/11/2025 Page No. 4

सकाळ

# पपई दरातील तिढा तत्काळ सोडवा

## मंत्री जयकुमार रावल : आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

■ सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. १६ : पपईच्या दरासंबंधी तोडगा काढण्यासाठी पपई दर नियंत्रण समितीतर्फे राज्याचे पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. मंत्री रावल यांनी तत्काळ जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधकांना सूचना करीत बैठक घेऊन योग्य तोडगा काढण्याविषयी सूचित केले. दरम्यान, सोमवारी (ता. १७) नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात पपईच्या दरासंदर्भात दुपारी दोनला बैठक आयोजित करण्यात आल्याचे समितीतर्फे सांगण्यात आले.**



दोंडाईचा : पणनमंत्री जयकुमार रावल यांना पपई दराचा तिढा सोडविण्यासंबंधी निवेदन देताना पपई दर नियंत्रण समितीचे सदस्य.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पपईची लागवड होते. त्यात शहादा तालुक्यात सर्वाधिक लागवड असल्याने येथील जाहीर झालेला दर जवळपास जिल्ह्यात तोच राहत असल्याने येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पपई दर नियंत्रण समिती पदाधिकारी, पपई उत्पादक शेतकरी व व्यापारी यांच्यात चार- पाच दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत आठ रुपये ११ पैसे प्रतिकिलो दराप्रमाणे पपईचा दर ठरला होता. त्या आधारावर तालुक्यात बंद झालेली तोड पुन्हा सुरू करण्यात आली. मात्र, शनिवारी (ता. १५) झालेल्या बैठकीत व्यापाऱ्यांनी भाव कमी करा, अन्यथा आम्ही चिठ्ठी काढून शेतकऱ्यांच्या पपईचा माल काढू, असे सांगत बैठकीतून निघून गेले. त्यामुळे संतप्त पपई उत्पादक शेतकऱ्यांनी रविवार (ता. १६)पासून व्यापाऱ्यांच्या गाड्या शेतात आल्यास त्या अडवण्यात येतील, असा इशारा पोलिस निरीक्षक नीलेश देसले यांना निवेदनाद्वारे दिला होता.

> यंदा शेतकऱ्यांचे अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे आधीच मोठे नुकसान झाले असून, आता दरातील नुकसान परवडणारे नाही. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पपईच्या दरवाढीचा प्रश्न सोडवावा.
>
> **- हमन पाटील,**
> पपई उत्पादक शेतकरी, मोहिदा त. श.

दरम्यान, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनाही पपई दर नियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन देऊन आपण पपई दरवाढीच्या प्रश्नात हस्तक्षेप करून तोडगा काढावा. येथील बाजार समिती सोडून इतर बाजार समित्यांना पपईला अधिक भाव दिला जात आहे. आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून दर वाढीबाबत सामंजस्य ठेवत नाही. व्यापाऱ्यांच्या गाड्या पपई तोडीसाठी आल्यास त्या अडवून जमा केल्या जातील, असे सांगण्यात आले. या वेळी नियंत्रण समितीचे भाऊभाई पाटील, डॉ. प्रफुल्ल पाटील, सागर इंदानी, गौतम पाटील, संदीप पाटील, समाधान पाटील उपस्थित होते.